• पुणे, मंगळवार, ०८ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 299 • वर्ष ३ रे, अंक २९९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



कात्रज- कोंढवा वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उपाययोजनांची गरज P3



पाकिस्तानविरुद्ध विजय, पण कर्णधार कौरला दुखापत P12

## At a Glance

### अम्ब्रोस, रुवकुन यांना 'नोबेल' जाहीर



**नवी दिल्ली :** वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकन शास्त्रज्ञ व्हिक्टर ॲम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना मायक्रो RNA वरील संशोधन कार्यासाठी वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. सूक्ष्म RNA वर केलेल्या या संशोधनांमुळे जनुके मानवी शरीरात कसे कार्य करतात आणि ते मानवी शरीराच्या विविध गोष्टींना कसे निर्माण करतात हे स्पष्ट करण्यात मदत झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल विजेत्यांची निवड स्वीडनच्या कॅरोलिंस्का इन्स्टिट्यूटच्या नोबेल असेंब्लीद्वारे केली जाते. शास्त्रज्ञांनी म्हटले आहे की त्यांच्या या शोधामुळे जनुके नियमनाचे एक नवीन तत्त्व समोर आले आहे.

### नक्षलवादाचा खात्मा लवकरच होईल!

**नवी दिल्ली :** देशातून नक्षलवादाला हद्दपार करण्यासाठी केंद सरकारने कंबर कसली आहे. नक्षलींचा प्रभाव असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी मोठी घोषणा केली. मार्च 2026 पर्यंत देशातून नक्षलवादाचा खात्मा होईल, असे शहांनी स्पष्ट केले. दिल्लीत झालेल्या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते. बैठकीत बोलताना अमित शाह यांनी युवकांनाही आवाहन केले.

### अकोल्यात तणाव! दोन गटात राडा

**अकोला :** अकोल्यामध्ये दोन गटामध्ये तुफान राडा झाल्याची माहिती आहे. जमावाने तुफान दगडफेक करत जाळपोळ केली. जमावाने काही चारचाकी गाड्या पेटवल्याची माहिती आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एका ऑटो रिक्षाला दुचाकीचा धक्का लागला त्यानंतर दोन्ही चालकांमध्ये झालेल्या बाचाबाचीनंतर मोठा वाद झाल्याची माहिती आहे.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय : 'धनगड' असलेली सात प्रमाणपत्रे रद्द

# धनगर आरक्षणाचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात धनगर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. सध्या भटक्या जमातीत समावेश असलेल्या धनगर समाजाकडून अनुसूचित जमाती संवर्गातून आरक्षण देण्याची जोरदार मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच धनगर आरक्षणासंदर्भात मोठं पाऊल उचललं आहे. धनगरांना आरक्षण मिळण्यात असलेला सर्वात मोठा अडथळा दूर करण्यात आला आहे. राज्यात धनगड असा उल्लेख असलेली सात प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. यामुळे धनगरांचा आरक्षणाचा मार्ग मोकळा होणार असल्याचे बोलले जात आहे.

मराठा व ओबीसी आरक्षणाचा वाद पेटला असतानाच धनगर समाजाने आदिवासीमधून आरक्षण देण्याची मागणी केली होती. आता महायुती सरकारने धनगर आरक्षणासंदर्भात मोठा निर्णय घेत धनगरांना एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळण्यात असलेला सर्वात मोठा अडथळा दूर करण्यात आला आहे. राज्यात धनगड असा उल्लेख असलेली सात प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत.

जात पडताळणी समितीने एकदा दिलेला जात वैधता दाखला रद्द करण्याचा अधिकार जात पडताळणी समितीला नव्हता. सरकारने तो अधिकार जात पडताळणी समितीला दिला आहे. जे बोगस धनगडांचे दाखले काढले होते. ते ७ दाखले रद्द केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार. यामुळे धनगर एसटी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिली आहे. धनगर किंवा धनगड यापैकी कोणताही उच्चार असला तरी त्याचा अर्थ समान असल्याचा दावाही धनगर समाजाकडून केला जात आहे.

### काय आहे धनगर समाजाची मागणी?

सध्या धनगर समाजाला भटक्या विमुक्त संवर्गातून (NT) आरक्षण आहे. मात्र आम्हाला अनुसूचित जमाती संवर्गातून (एसटी) आरक्षण द्यावं, अशी धनगर समाजाची जुनी मागणी आहे. अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट धनगड आणि धनगर हे एकच असून इंग्रजीमध्ये R ऐवजी D असा शब्द वापरण्यात आला आहे. 'ड' ऐवजी 'र' असा उल्लेख आल्याने धनगरांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये झाला नाही, असा दावा धनगर समाजातर्फे करण्यात येतो.




### अंधारेंचा 'मास्टरस्ट्रोक' पवारांना धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**हडपसर :** महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या मॅरेथॉन बैठका सध्या मुंबईत सुरू आहेत. या बैठकांमध्ये ज्या ठिकाणी ज्या पक्षाचा आमदार ती जागा त्याची अशा सूत्रावर जागांचे वाटप होत असल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघ हा ठाकरे गटाला मिळाला असून या मतदारसंघातून थेट माजी आमदार महादेव बाबर यांची उमेदवारी जाहीर केली. पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघामध्ये जास्तीत जास्त जागा आपल्या वाट्याला याव्यात, म्हणून महाविकास आघाडीतील मित्र पक्षांमध्ये चढाओढ पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने हडपसर, पर्वती, वडगाव शेरी आणि खडकवासला या जागांवर प्रामुख्याने दावा सांगितला आहे.

# उमेदवारीसाठी पुणे भाजपात संघर्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभेच्या उमेदवारीसाठी पुणे भाजपात मोठा संघर्षाला तोंड फुटले.



एकेकाळी भाजपचा बालेकिल्ला असलेल्या कसबा विधानसभा मतदारसंघात उमेदवार मिळवण्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी झाली. कसबा मतदारसंघातून उमेदवारीसाठी कुणाल टिळक, हेमंत रासने आणि धीरज घाटेंनी दंड थोपटले. तिघेही आपणच उमेदवार असा दावा करतायेत.

दुसरीकडं कोथरुडमधून चंद्रकांतदादांनाही भाजपच्या अमोल बालवडकरांनी आशीर्वाद यात्रा काढून आव्हान दिलं आहे.

पोटनिवडणुकीत पराभूत झालेल्या हेमंत रासनेंनी पुन्हा उमेदवारीसाठी देव पाण्यात ठेवलेत. तर माजी आमदार आणि स्वर्गीय भाजप नेत्या मुक्ता टिळक यांचे पूत्र कुणाल टिळक यांनी उमेदवारी मिळवण्यासाठी कंबर कसलीय. त्यांनी मतदारसंघाच बॅनरबाजी सुरु केलीय. गेल्या दीड वर्षांपासून कसबा मतदारसंघाची बांधणी करत असल्याचा दावा कुणाल यांनी केलाय.

हेमंत रासने यांनीही उमेदवारीसाठी आपल्याच नावाला पसंती असल्याचा दावा केलाय. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनीही कसबा मतदारसंघावर दावा केला.

» पान ७ वर

### अजित पवार गटाचा कोथरूड मतदार संघावरच दावा

• आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वीच राष्ट्रवादी (अजित पवार) गटाने चिंचवड पाठोपाठ आता कोथरूड मतदार संघावरच दावा ठोकला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश प्रतिनिधी विजय डाकले यांनी कोथरूडमधून विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केल्याने महायुतीत पुण्यातील जागांवरून तिढा निर्माण झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.कोथरूडमधून निवडणूक लढवण्यासाठी मी इच्छूक असल्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना कळविले असल्याची माहिती विजय डाकले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### दहा लाखांचे बक्षिस जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात बोपदेव घाट येथे एका तरुणीवर तिघांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना गुरुवारी रात्री घडली होती. या घटनेमुळे संपूर्ण राज्य पुन्हा हादरले. या घटनेला तीन दिवस उलटूनही अद्याप आरोपींचा शोध लागलेला नाही. पोलिसांची विविध पथके त्यांचा शोध घेत असून तब्बल बोपदेव घाट परिसरातील ६ ते ७० किमीची सीसीटीव्ही शोधले जात आहेत. दरम्यान, या प्रकरणी राज्य सरकार आणि गृह मंत्रालयाने महत्वाचे पाऊल उचलतं आहे. या प्रकरणी आरोपींची माहिती देणाऱ्यास १० लाख रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच आरोपींची नावे व माहिती देण्याऱ्याबाबत गुप्तता देखील पाळली जाणार आहे.

# इंदापूरनंतर पवारांचे फलटणकडे कूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** अजित पवार यांच्या पक्षात असलेले माजी मंत्री व विधान परिषदेचे माजी उपसभापती रामराजे नाईक निंबाळकर हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. खुद्द शरद पवार यांनीच इंदापूरच्या सभेत ही बातमी दिली. '१४ तारखेला फलटणला बोलावलंय! समजलं का?,' असे शरद पवार म्हणाले. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज शरद पवार यांच्यासह पक्षाच्या सर्व मोठ्या नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. यावेळी जमलेल्या जनसमुदायाला संबोधित करताना शरद पवार यांनी निंबाळकर यांच्या प्रवेशाचे सांगितले.



'राज्यातील राजकीय चित्र सध्या बदलत आहे. आज ह्या कार्यक्रमासाठी घरून निघायच्या वेळेला आणखी एका ठिकाणाहून फोन आला. त्यांनी हट्ट केला की आज इंदापूरला चाललाय, १४ तारखेला आमच्याकडं आलंच पाहिजे. काय कार्यक्रम काढलाय असे मी विचारले तर ते म्हणाले, इंदापूरला आहे तोच कार्यक्रम आमच्याकडं आहे. म्हटले कुठं? तर ते म्हणाले फलटणला,' असं शरद पवार म्हणाले. हे सांगताना त्यांनी उपस्थितांना उद्देशून समजलं का? असा प्रश्नही केला. फलटण झाल्यानंतर सगळे दिवस बुक झाले असल्याचे सांगितले.

### टाटांच्या तब्येती बाबतचा विपर्यास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** 'टाटा सन्स'चे माजी अध्यक्ष रतन नवल टाटा (८६) यांना रुग्णालयात दाखल झाल्याच्या वृत्तानंतर सांगितले की, ते बरे आहेत. तसेच वृद्धापकाळामुळे ते नियमित तपासणीसाठी रुग्णालयात गेले होते. काळजी करण्यासारखे काही नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या आधी काही 'मीडिया रिपोर्टस्'मध्ये असा दावा करण्यात आला होता, की रतन टाटा ब्रीच कँडी हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल झाले आहेत. सोमवारी त्यांना रुग्णालयात आणण्यात आले. त्यांचा रक्तदाब बराच कमी झाला होता; मात्र आता या संदर्भात गौप्यस्फोट करण्यात आला आहे.

## राज ठाकरे : मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

# नाठाळ राजकारण्यांवर दबाव साहित्यिकांनी निर्माण करावा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राची आज सर्कस झाली आहे. राजकारणाच्या क्षेत्रात सध्या बोलल्या जाणाऱ्या भाषेला धरबंध राहिलेला नाही. अशा परिस्थितीत नाठाळ राजकारण्यांचे कान धरून त्यांना वठवणीवर आणण्याचे, खडे बोल सुनविण्याचे काम साहित्यिकांनी करावे, असे मत नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. राजकारणी व्यक्तींना साहित्य संमेलनांमध्ये साहित्यिकांचे विचार ऐकायला बोलवावे, बोलायला नको असे सांगून पूर्वीच्या मराठी साहित्यिकांच्या अंगात, मनात मराठी बाणा रुजलेला दिसत होता, परंतु ती धमक आज कमी झालेली जाणवते, अशी टिप्पणीही त्यांनी केली.



सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण राज ठाकरे यांच्या हस्ते झाले.

त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात कार्यक्रम झाला. महाराष्ट्राची ओळख दर्शविणारी राजमुद्रा व लेखणी असे बोधचिन्हाचे स्वरूप आहे. दिल्ली येथे दि. २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत साहित्य संमेलन होत आहे. सरहद पुणेचे अध्यक्ष संजय नहार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, विनोद कुलकर्णी, साहित्य संमेलनाचे

» पान ७ वर

## अनावरण...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**पुणे:** अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण मनेसे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते झाले. संजय नहार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, विनोद कुलकर्णी, डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीपाल सबनीस, लक्ष्मीकांत देशमुख, साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष प्रकाश पागे, गुरय्या स्वामी, डॉ. शैलेश पगारिया आदी .

### तरुणाला लुटणारा केला गजाआड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** : पाषाण-सूस टेकडीवर फिरायला गेलेल्या महाविद्यालयीन तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून लुटणाऱ्या चोरट्यांना चतु:श्रृंगी पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून दुचाकी आणि कोयता जप्त करण्यात आला. अजिंक्य अशोक बोबडे (वय १८, रा. गुरुकृपा बिल्डींग, वाघजाई चौकाजवळ, नवी सांगवी), निखिल बाबासाहेब डोंगरे (वय १८, रा. साकेत सोसायटी, डीपी रस्ता, औंध) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पौजेंदाई कामेई (वय १९, सध्या रा. गंगानगर, जुनी सांगवी) याने चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. कामेई मूळचा नागालँडचा आहे. तो पुण्यात शिक्षणासाठी आला आहे. औंध भागातील एका महाविद्यालयात तो शिक्षण घेत आहे.

## विद्यापीठाने बुडवला राज्य सरकारचा महसूल ?

# कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे. विविध विभागांसाठी साहित्य खरेदीमध्ये जीएसटी न दाखविता वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी राज्य सरकारचा महसूल बुडवला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने निर्धारित केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने खरेदी करून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची धक्कादायक माहिती या प्रकरणात समोर आली आहे.



वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी जीएसटी न दाखवता टेबल, खुर्च्या, संगणक, एसी, स्टेशनरी, वॉटर प्यूरिफायर यांसह कार्यालयीन वापरासाठी लागणाऱ्या अनेक वस्तूंची खरेदी चढ्या दराने केली. ज्या संस्थेकडून खरेदी केली आहे, त्यांच्याकडे जीएसटी नोंदणी नसल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. सिनेट सदस्यांनी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडून केल्या गेलेल्या खरेदी घोटाळ्याची पोलखोल केली आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना लेखी पत्र देत खरेदी प्रक्रियेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी केली आहे.यासंदर्भात बोलताना सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर म्हणाले, "विद्यापीठाच्या विविध विभागांना आवश्यक असलेल्या साहित्यांची कोट्यवधींची खरेदी झाली आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून खरेदीसाठी नियम आणि अटी ठरवून दिल्या आहेत. परंतु निर्धारित दरांपेक्षा जास्त दराने खरेदी करून आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे.

#रा

### महायुतीला तीन अंकी संख्याही गाठता येणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कराड :** महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते अशी स्थिती आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोहोंतील पक्षांनी विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे.

लोकसभा निवडणुकीत उत्तम यश मिळाल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. आता महाविकास आघाडीला १८३ जागा मिळतील असे भाकीत पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे. तसेच महायुतीला तीन अंकी संख्याही गाठता येणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

» पान ७ वर

# सत्तेची चावी नायब राज्यपालांच्या हाती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीत काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्स आघाडी बहुमताच्या जवळ जाऊ शकते, असा अंदाज बहुतेक एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. पण त्यानंतरही आघाडीची धडधड वाढलेली आहे. निवडणुकीच्या निकालात आघाडीचे आमदार काटावर निवडून आल्यास सत्तेची चावी नायब राज्यपालांच्या हाती असणार आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर होईल. एकूण ९० जागांसाठी मतदान झाले आहे. त्यापैकी ४६ आमदार निवडून आलेल्या पक्षाची सत्ता येईल, असे साधे गणित आहे, असे तुम्हाला वाटत असेल. पण काश्मीरमधील स्थिती वेगळी आहे. नायब राज्यपालांकडून पाच आमदार नियुक्त केले जाणार आहेत. त्यामुळे विधानसभेतील एकूण आमदारांचा आकडा ९५ होईल. त्यामुळे बहुमताचा आकडाही ४८ वर पोहचणार आहे. पण या आमदारांच्या नियुक्तीवरून वाद निर्माण झाला आहे. जो पक्ष सरकार बनवेल, त्या पक्षाचे मत

» पान ७ वर

## मागील तीन वर्षांत खर्च सुमारे : २० हजार ३७५ कोटींनी वाढला

# रिंगरोडच्या खर्चात दुपटीने वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) रिंगरोडचा खर्च मागील तीन वर्षांत सुमारे २० हजार ३७५ कोटींनी वाढला असल्याचे दिसून आले आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याच रिंगरोडच्या कामासाठी ४२ हजार ७११ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. रिंगरोडच्या खर्चात दुपटीने वाढ झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी एमएसआरडीसीने रिंगरोड प्रकल्प हाती घेतला आहे. एमएसआरडीसीने रिंगरोडचे काम दोन टप्प्यांत हाती घेतले आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामध्ये सहा कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या कंपन्यांनी रस्त्याच्या कामांचे पूर्वगणनपत्रकातील (इस्टिमेट) रकमेपेक्षा चाळीस ते पंचेचाळीस टक्के जादा दराने निविदा भरल्या आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रिया वादग्रस्त ठरली.

निविदांची छाननी करण्यासाठी एमएसआरडीसीने तीन त्रयस्थ संस्थांची नेमणूक केली होती. त्या कंपन्यांनी सादर केलेल्या अहवालातही जादा दराने निविदा भरल्याचे राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे एमएसआडीसीकडून फेरनिविदा प्रक्रिया राबविली जाण्याची अपेक्षा व्यक्त होत होती. प्रत्यक्षात तसे न घडता राज्य सरकारने रिंगरोडच्या सुधारित खर्चास मान्यता दिली आहे.

### त्या तीन मोठ्या कंपन्यांची निविदा

- रिंगरोडच्या कामासाठी ज्या कंपन्यांनी निविदा भरल्या आहेत. त्यामध्ये देशभरात गाजत असलेल्या कथित निवडणूक रोखे घोटाळ्यात नावे पुढे आलेल्या तीन मोठ्या कंपन्यांचा समावेश आहे. या तिन्ही कंपन्यांनी सर्वाधिक पॅकेजसाठी निविदा भरल्या आहेत.

### पूर्व रिंगरोड

- रिंगरोडच्या पूर्व भागातील ऊर्से – सोलू ते सोरतापवाडी या रस्त्याच्या कामासाठी २०२१ मध्ये १० हजार १५९ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली होती.याच रस्त्याच्या कामासाठी आज १९ हजार ९३२ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. त्यामुळे पूर्व भागाच्या रिंगरोडच्या कामात ९ हजार ७७३ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे.

### पश्चिम रिंगरोड

- पश्चिम भागातील ऊर्से ते वरवे बुद्रुक या रस्त्याच्या कामासाठी १२ हजार १७६ कोटी रुपयांचा खर्चास मान्यता देण्यात आली होती. आजच्या बैठकीत याच रस्त्यासाठी २२ हजार ७७८ कोटी रुपयांच्या सुधारित कामास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या भागाच्या रस्त्याच्या कामात तीनच वर्षांत १० हजार ६०२ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे.


### पूर्व रिंगरोड चार टप्पे

- पहिला टप्पा – ११.८५ कि.मी
- दुसरा टप्पा – १३.८० कि.मी
- तिसरा टप्पा – २१.२० कि.मी
- चौथा टप्पा - २४.५० कि.मी

### पश्चिम रिंगरोड पाच टप्पे

- पहिला टप्पा – १४ कि.मी
- दुसरा टप्पा – २० कि.मी
- तिसरा टप्पा – १४ कि.मी
- चौथा टप्पा - ७.५० कि.मी
- पाचवा टप्पा - ९.३० कि.मी

### पुणे रिंगरोड प्रकल्प



### वाद निर्माण होण्याची शक्यता...

- 'एमएसआरडीसी'ने रिंगरोडचे काम दोन टप्प्यांत हाती घेतले आहे. त्यासाठी टेंडर प्रक्रिया राबविली. त्यामध्ये सहा कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या कंपन्यांनी रस्त्याच्या कामांचे पुर्वगणनपत्रकातील (इस्टिमेट) रकमेपेक्षा ४० ते ४५ टक्के जादादराने टेंडर भरले आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रिया वादग्रस्त ठरली होती. कंपन्यांच्या निविदांची छाननी करण्यासाठी एमएसआरडीसीने तीन त्रयस्थ संस्थांची नेमणूक केली होती. त्या कंपन्यांनी सादर केलेल्या अहवालात कंपन्यांनी जादादराने टेंडर भरल्याचे राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे एमएसआडीसीकडून रिटेंडर प्रक्रिया राबविली जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात होती. प्रत्यक्षात तसे न घडता राज्य सरकारने रिंगरोडच्या सुधारित खर्चास मान्यता दिल्याने नव्याने वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

Selected

## महात्मा गांधी जयंती निमित्त पुणे रेल्वे स्थानकात स्वच्छता मोहीम



**पुणे :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त डीवाईन जैन ग्रुप आणि भारतीय रेल्वे पुणे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयआरटीएस चे संचालक मदनलाल मीना यांचा मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम व मिठाईवाटप करण्यात आले. सर्व रेल्वे कर्मचारी आणि प्रवाशांसाठी पुणे रेल्वे स्थानकावर या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

डिवाइन जैन ग्रुपचे अध्यक्ष संकेत शहा म्हणाले, समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. सामूहिक प्रयत्नांमुळे सामाजिक एकात्मता आणि सहकार्याची भावना दृढ होते. या स्वच्छता मोहिमेत आयईएस चे वरिष्ठ सल्लागार राम वर्मा, हार्दिक शहा, चेतन जैन, उत्तम धोका या सर्वांचे कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुलाचे सहकार्य लाभले.

## नवरात्रीनिमित्त बापूसाहेब पवार शाळेच्या विद्यार्थ्यांकडून भक्तिगीतांचे सादरीकरण



**पुणे :** नवरात्रातील ललित पंचमीनिमित्त भवानीपेठेतील भवानी मातेच्या मंदिरात देवीच्या गाण्यांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणपती स्तवन, महालक्ष्मी अष्टक, भजन, परड्या घेऊन देवीचा जोगवा, गोधळ सारखी भक्तिगीते विद्यार्थ्यांनी सादर केली. तसेच देवीच्या गाण्यावर टिपऱ्या घेऊन विद्यार्थ्यांनी तालही धरला. दर्शनासाठी आलेल्या भक्तांनी व मंदिराचे पुजारी मेढेकर यांनी विद्यार्थ्यांना भेटवस्तू दिल्या.

शाळेच्या मुख्याध्यापिका हेमलता कुऱ्हाडे, माजी मुख्याध्यापिका स्मिता पुजारी, ढगारे, बनसोडे यांनी विद्यार्थ्यांबरोबर कार्यक्रमात भाग घेतला. तसेच या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव कविता पवार, सुजाता पवार, प्राजक्ता पवार, सीमा वाघुलकर यांची उपस्थिती होती.

## नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेची तारीख जाहीर, ऑनलाईन अर्ज सुरु

**पुणे :** नवोदय विद्यालय समितीच्या वतीने इयत्ता ९ वी आणि ११ वी प्रवेशासाठी ८ फेब्रुवारी २०२५ रोजी निवड चाचणी परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

प्रवेश अर्ज भरताना उमेदवारांनी त्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, पालकांची स्वाक्षरी, शैक्षणिक मार्कशीट, वैध फोटो आयडी अपलोड करणे आवश्यक आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रवेश निवड चाचणी परीक्षा ही सकाळी ११ ते दुपारी १.३० पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. या निवड परीक्षेचा कालावधी २ तास ३०मिनिटांचा असेल. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त वेळ दिला जाईल. प्रवेश परीक्षेत वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश असेल. एकूण १०० प्रश्न असणार आहेत.

## कौटुंबिक वादातून पतीकडून पत्नीचा खून; आरोपी पसार

**पुणे :** पुण्यात दिवसेंदिवस खूनांचा घटना वाढत आहे. नुकतीच कौटुंबिक वादातून पतीने डोक्यात हत्याराने वार करून पत्नीचा खून केल्याची घटना हडपसर येथील शिंदे वस्तीमध्ये घडली. या घटनेनंतर आरोपी पती त्याच्या लहान मुलाला घेऊन पसार झाला आहे. आरती देबीलाल सरेन (वय ३२, रा. शिंदे वस्ती, हडपसर) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी दत्तात्रेय चौधरी यांनी (वय ५५, रा. तुकाई दर्शन, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून पती देबीलाल लक्ष्मणचंद्र सरेन (वय ४०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरेन दांपत्य पश्चिम बंगालमधील आहे. ते हडपसर परिसरातील शिंदे वस्ती परिसरात चौधरी यांच्या चाळीत राहतात. आरोपी देबीलाल आणि पत्नी आरती मजुरी करतात. त्यांच्यात कौटुंबिक कारणावरून रविवारी मध्यरात्री वाद झाला. त्या वेळी देबीलालने पत्नीच्या डोक्यात हत्याराने वार केला. त्यात गंभीर जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी देबीलाल त्याच्या सहा वर्षांच्या मुलाला घेऊन पसार झाला. शेजाऱ्यांनी शनिवारी सकाळी आरती सरेन रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहिले. याबाबत चौधरी यांनी पोलिस ठाण्यात माहिती दिली.

राष्ट्रसंचार परीक्षा रा

## शिष्यवृत्ती योजना परीक्षा २२ डिसेंबरला

### ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येणार

**पुणे :** राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (एनएमएमएस) २२ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे. त्यासाठीची अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, नियमित शुल्कासह ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे.

एनएमएमएस परीक्षेतून शिष्यवृत्ती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक बारा हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येते. वार्षिक उत्पन्न साडेतीन लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांची मुले या परीक्षेसाठी पात्र असतात. शिष्यवृत्तीसाठी निवड लेखी परीक्षेमधून करण्यात येते. बौद्धिक क्षमता चाचणी, शालेय क्षमता चाचणी अशा दोन विषयांचा परीक्षेत समावेश असतो. विद्यार्थ्यांना आठ माध्यमातून परीक्षा देता येते.

विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह ४ नोव्हेंबरपर्यंत, विलंब शुल्कासह ५ ते ९ नोव्हेंबरदरम्यान, तर अतिविलंब शुल्कासह १० ते १४ नोव्हेंबरदरम्यान अर्ज भरता येणार आहे. शाळेमार्फत अर्ज करण्याची प्रक्रिया **https://www.mscepune.in** आणि **https://mscenmms.in** या संकेतस्थळाद्वारे करता येणार आहे. २२ डिसेंबरला राज्यभरात ही परीक्षा होणार आहे. तर परीक्षेचा निकाल फेब्रुवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याचेही परीक्षा परिषदेने स्पष्ट केले.



## सन्मान स्त्री शक्तीचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट च्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात महिला न्यायाधीश व वकिलांचा सन्मानसोहळा पार पडला. यावेळी महिलांचा हस्ते देवीची आरती देखील करण्यात आली.

## महालक्ष्मी मंदिरातर्फे महिला न्यायाधीश व वकिलांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज देशामध्ये नवीन कायदे आले आहेत. या देशात जे कायदे आलेले आहेत, हे कायदे स्थापित करण्यामागचा उद्देश पाहिला तर महिला हा केंद्रबिंदू सरकारने ठेवला आहे. संस्कार देणारी आई, संसाराला मार्गदर्शन करणारी मार्गदर्शिका ही महिला असते. त्यामुळे महिला संरक्षण दृष्टीने हे नवीन कायदे करण्यात आले आहेत, असे मत व्यक्त करीत महिला न्यायाधिश व महिला वकिलांच्या शक्तीचा जयजयकार करण्यासाठी मी आवर्जून या कार्यक्रमाला आलो, असे विशेष सरकारी वकिल पद्मश्री ॲड. उज्वल निकम यांनी सांगितले.



श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट च्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात महिला न्यायाधीश व वकिलांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, डॉ. तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम देखील उत्सवात आयोजित करण्यात आले आहेत.

महेंद्र महाजन म्हणाले, भारतातील नारीशक्तीचे कौतुक होणे आवश्यक आहे. सध्याच्या न्यायालयीन व्यवस्थेत ३८ टक्के न्यायाधीश महिला आहेत. पुणे जिल्ह्यात वकील संघात पुरुषांबरोबर स्त्रिया देखील महत्वाचे खटले लढवितात, हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे या महिला न्यायाधीश व वकिल भगिनींचा सन्मान श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे होणे हे भूषणावह आहे.

ॲड. प्रताप परदेशी म्हणाले, नारीशक्तीचा सन्मान करुन नवरात्रीची पूजा बांधण्याचा प्रयत्न ट्रस्टतर्फे करीत असतो. त्याअंतर्गत लोकशाहीतील महत्वाचा स्तंभ म्हणजे न्यायव्यवस्था. त्यामुळे त्या व्यवस्थेतील न्यायाधिश व वकिलांचा सन्मान करण्यात आला.

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या धडाडीच्या पत्रकारितेने सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच, समाजातील असंख्य वंचितांना न्याय मिळवून देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार आणि संपादकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने करण्यात आले होते. या पत्रकारांनी तीन दशकांहून अधिक कालावधीत शोध पत्रकारिता करीत, चुकीच्या गोष्टींचा प्रखर विरोध केला. त्याचप्रमाणे विविध मुद्द्यांवर अग्रलेखाद्वारे समाजाच्या भावना मांडल्या आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक मुद्द्यांवर परखडपणे लिखाण केले आहे. त्यांच्या प्रती आदर व्यक्त करण्यासाठी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार आणि संपादकांना समर्पित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये ज्येष्ठ पत्रकार मृणालिनी नानिवडेकर (मुंबई), ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे (पुणे), बाळासाहेब बडवे (पंढरपूर), आचार्य प्रा. डॉ. रतनलाल सोनाग्रा (अहमदनगर), डॉ.सुकृत खांडेकर (मुंबई), जयप्रकाश दगडे (लातूर), राजा माने (मुंबई), डॉ. सुब्रतो रॉय (पुणे), विनायक प्रभू (मुंबई) आणि मोहम्मद वजीरुद्दिन (मुंबई) यांचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह आणि पदक देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकारांचा सन्मान करून, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीने एकप्रकारे समजाचा सत्कार करण्याचे काम केले आहे. यावेळी पत्रकारितेचे शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी उपस्थित असल्याने, त्यांना या क्षेत्रात काम करण्यासाठी प्रेरणा मिळाल्याची भावना प्रातिनिधिक स्वरूपात मान्यवरांनी व्यक्त केली

यावेळी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. एम. चिटणीस आणि या परिषदेचे मुख्य समन्वयक प्र. कुलगुरू प्रा. डॉ. मिलिंद पांडे उपस्थित होते.

डॉ. संजय उपाध्ये यांनी प्रास्ताविक करीत, कार्यक्रमाची भूमिका विषद केली. प्रा. डॉ. मिलिंद पत्रे यांनी सूत्रसंचालन केले.

MIT-WPU

## डेक्कन कॉलेजचा दीक्षांत समारंभ उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था, अभिमत विद्यापीठाचा १३ वा दीक्षांत समारंभ आणि २०३ वा स्थापना दिवस एकत्रितपणे साजरा करण्यात आला. यावेळी भाषाशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व, तसेच संस्कृत आणि कोषशास्त्र विभागातील १६५ विद्यार्थ्यांना पदवी आणि पी.एच.डी. प्रदान करण्यात आली. या समारंभात शैक्षणिक आणि संशोधनातील उत्कृष्टतेसाठी सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर रोख पारितोषिकासह प्रतिष्ठित सन्मानांसह उत्कृष्ट विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दीक्षांत समारंभाच्या दिवशी, कुलगुरू, प्रमुख पाहुणे आणि विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या, नेतृत्वाखाली औपचारिक मिरवणूक नवीन दीक्षांत सभागृहात दाखल झाली.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. प्रसाद जोशी, प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत ढाकेफालकर, पुणे येथील आघारकर संशोधन संस्थेचे संचालक उपस्थित होते. यावेळी विरासत या डिजिटल ग्रंथालयाचा डेटाबेस आणि डेक्कन कॉलेज ग्रंथालय ॲप औपचारिकपणे प्रसिद्ध करण्यात आले.

### ४७ लाख २७ हजार खर्च करणार

## छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यावर मेघडंबरी उभारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेक्कन जिमखाना येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यावर मेघडंबरी उभारण्यात येणार आहे. यासाठी ४७ लाख २७ हजार रुपयांचा खर्च येणार असून, या टेंडरला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने नुकतीच मान्यता दिली.या ठिकाणी दगडी बांधकामामध्ये सुशोभीकरण केले जाणार आहे. यासाठी भवन



> "या कामात मेघडंबरीसह, जिने व चौथऱ्याच्या कामाचा समावेश आहे. या कामासाठी ४७ लाख २७ हजार खर्च येणार आहे. कामाची मुदत तीन महिन्यांची आहे."
>
> — वीरेंद्र केळकर, कार्यकारी अभियंता

विभागाने टेंडर प्रक्रिया राबविली. त्यात तीन टेंडर आले. त्यापैकी पूर्वगणनपत्रकाच्या रकमेपेक्षा साडेपाच टक्के कमी दराने आलेल्या टेंडरला महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

संभाजी महाराजांच्या या पूर्णाकृती पुतळ्याच्या वर मेघडंबरी उभारण्यात यावी, अशी मागणी शहरातील विविध संघटनांनी महापालिकेकडे केली होती.

त्यानंतर महापालिकेच्या भवन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जागा पाहणी करून त्याचा प्रस्ताव तयार केला. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती चौथरा उभारण्यात येणार आहे. त्यावर पॉलिस्टर रेझिनचा वापर करून आकर्षक मेघडंबरी उभारण्यात येणार आहे. पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना उभे राहता यावे, यासाठीही व्यवस्था केली जाणार आहे.

#रा

## प्रा. दिपाली कदम यांचे यश; पीएच्डी अभ्यासासाठी आयआयटीची ऑफर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी) च्या प्राध्यापिका दिपाली कदम यांना गुणवत्ता सुधार कार्यक्रम अंतर्गत 2025-26 शैक्षणिक वर्षासाठी पीएचडी अभ्यासासाठी प्रतिष्ठित आयआयटी संस्थांमधून ऑफर मिळाल्या आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना आयआयटी रुरकी, आयआयटी इंदौर, आणि आयआयटी धारवाड या प्रमुख संस्थांकडून निमंत्रण मिळाले आहे.

प्रा. कदम यांनी पीआयसीटी मध्ये अध्यापन आणि संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या नवकल्पनात्मक संशोधन आणि तंत्रज्ञानातील कामगिरीमुळे त्या या नामांकित पीएचडी कार्यक्रमासाठी पात्र ठरल्या आहेत. यामुळे पीआयसीटी संस्थेचे नाव राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले आहे. आयआयटी रुरकी, आयआयटी इंदौर, आणि आयआयटी धारवाड या संस्थांपैकी कोणत्याही एका आयआयटीमध्ये प्रा. कदम पीएचडी करतील, ज्यामुळे त्यांना तंत्रज्ञानाच्या नव्या संधी मिळणार आहेत. या यशामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. प्रा. दिपाली कदम यांचे हे यश पीआयसीटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी गौरवाचे आहे, तसेच शैक्षणिक क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करणारे ठरले आहे.

## महापालिका, पीएमपी आणि वाहतूक पोलिस : प्रशासनाच्या सहकार्याची अपेक्षा


# कात्रज- कोंढवा वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उपयोजनांची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे गर्डर टाकण्याचे काम मुख्य चौकात आले आहे. हे काम करण्यासाठी वाहतूक वळविणे गरजेचे असून वाहतुकीला पर्यायी व्यवस्था नसल्याने वाहतूक अडचण निर्माण झाली आहे. वाहतूक पोलिस आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाला या समस्यांची कोंडी फोडून काम पुढे घेऊन जाण्यासाठी महापालिका, पीएमपी आणि वाहतूक पोलिस प्रशासनाच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

उड्डाणपुलाच्या कामाची मुदत फेब्रुवारी २०२४मध्ये संपल्यानंतर पुन्हा डिसेंबर २०२४पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, विविध अडचणींचा सामना करत असताना सदर उड्डाणपुलाचे काम डिसेंबरमध्येही पूर्ण होणार नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे सदर अडचणींवर मात करत उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्यासाठी आणखी किती दिवस लागणार हा प्रश्न अनुत्तरित आहे.

### वाहतूक वळविण्यासाठी या उपाययोजनांची गरज




- उड्डाणपुलाचे काम करण्यासाठी पर्यायी रस्त्यांची गरज
- कात्रज चौकातील वादात असलेल्या जागांचे भूसंपादन महापालिकेकडून युद्धपातळीवर करणे
- चौक, पर्यायी रस्ते आणि आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात असणारी अतिक्रमणे हटविणे
- सातारा रस्त्यावरून स्वारगेटला आणि स्वारगेटवरून सातारामार्गे जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसेस काही काळासाठी नवलेपूलमार्गे वळविणे
- बहुसंख्य पीएमपी बसेस कात्रज चौकात न येऊ देता विभाजन करुन मोरेबाग, कात्रज डेअरी, कात्रज डेपो परिसरातून परत वळविणे
- नवलेपुलाकडून स्वारगेट परिसरात जाणारी वाहने वंडरसिटी कात्रज डेअरीमार्गे वळविणे
- सातारा रस्ता परिसरातून कोंढव्याकडे जाणारी वाहने गुजरवाडी फाट्यावरून वळविणे
- साताऱ्याकडून येणारी स्वारगेटच्या बाजूला येणारी सर्व वाहने कात्रज घाटातून चौकात न येऊ देता नवलेपूलमार्गे वळविणे



### » उपाययोजना

महामार्गाकडून वाहतूक वळविण्याची दोनवेळा चाचण्या घेतल्यानंतर आता त्यांच्याकडून त्रुटीवर अभ्यास सुरु आहे. दोन्ही चाचण्यांच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटींवर काम करुन लवकरच पुढील काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग खात्याकडून देण्यात आली आहे. उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या

> "दोनवेळा प्रोयोगिक तत्वावर वाहतूक वळवून पाहिले आहे. यावेळी विविध शक्यतांची चाचपणी करण्यात आली आहे. या तपासणीनंतर विविध शक्यता समोर आल्याने काय उपायोजना करायला हव्यात याचा अंदाज आता आला आहे. त्यामुळे तिसऱ्यांदा आम्ही आणखी एक चाचणी घेऊ, त्यानंतर पुलाचे पुढील काम सुरु करण्यात येईल. एवढ्या वाहतूककोंडीत काम करणे हे आव्हानात्मक असून यासाठी आम्हाला सामान्य नागरिकांसह सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे."
> — श्रुती नाईक, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग



## पुणे मेट्रो तर्फे 'नॉन केवायसी कार्ड' लॉंच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोने प्रवाशयांच्या सुविधेसाठी **'एक पुणे कार्ड'** आणि विद्यार्थ्यांसाठी **'विद्यार्थी पास कार्ड'** या दोन कार्डांच्या मार्फत सेवा सुरु केलीआहे. आजतागायत ४६,६५९ एक पुणे कार्ड आणि १५,८६५ विद्यार्थी पास कार्ड प्रवाश्यानी खरेदी केली आहेत. काल दिनांक ७ ऑक्टोबर रोजी पुणे मेट्रोने नॉन केवायसी **'एक पुणे ट्रान्सीट कार्ड'** लॉंच केले आहे.




पुणे मेट्रोच्या 'एक पुणे कार्ड' आणि 'विद्यार्थी पास कार्ड' यापैकी कोणतेही कार्ड खरेदी करण्यासाठी नागरिकांना केवायसी करणे अनिवार्य होते. पण एक पुणे ट्रान्सीट कार्ड खरेदी करण्यासाठी नागरिकांना केवायसी करण्याची गरज नाही. हे कार्ड खरेदी करण्यासाठी कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता पडणार नाही. तसेच हे कार्ड फक्त प्रवासासाठी असून याचा उपयोग एक पुणे कार्ड प्रमाणे प्रवासाव्यतिरिक्त इतरत्र करता येणार नाही. एक पुणे ट्रान्सीट कार्डची वैधता ५ वर्ष किंवा कार्ड वर नमूद केल्याप्रमाणे असेल. हे कार्ड खरेदी करण्यासाठी १०० रुपये + १८ % जीएसटी (११८ रुपये) आकार पडेल. या कार्ड मध्ये एकावेळेस ३००० रुपये पर्यंत अधिकतम रक्कम टॉप अप करता येऊ शकते. या कार्डचे टॉप अप आपण पूर्वी प्रमाणे पुणे मेट्रो अँपद्वारे अथवा मेट्रो स्थानकांवर जाऊन ग्राहक सेवा केंद्रातून करू शकता. एक पुणे ट्रान्सीट कार्ड टॉप अप सुविधेसाठी 'एक पुणे कार्ड' प्रमाणेच शुल्क असणार आहे.

## 'बिग बॉस मराठी'चा विजेता सूरज चव्हाण झळकणार मोठ्या पडद्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीजनचा विजेता सूरज चव्हाण लवकरच एका मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'राजाराणी' असे या चित्रपटाचे नाव आहे. सत्य घटनेवर आधारित प्रेम कथा या चित्रपटातून पाहायला मिळणार असून सूरजची या चित्रपटात महत्त्वाची भूमिका आहे. येत्या १८ ऑक्टोबरला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात प्रमुख भूमिकेत रोहन पाटील आणि वैष्णवी शिंदे , भारत गणेशपुरे, सुरेश विश्वकर्मा, माधवी जुवेकर, भक्ती चव्हाण, शिवाजी दोलताडे, तानाजी गलगुंडे झळकणार आहेत. 'सोनाई फिल्म क्रिएशन' प्रस्तुत 'राजाराणी' या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, गीतलेखन व निर्मिती गोवर्धन दोलताडे यांनी केली आहे. तर चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी शिवाजी दोलताडे यांनी सांभाळली आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE




### क्रिएटिव्ह फाउंडेशन तर्फे विविध मंडळाना स्पीकरसेट भेट

**पुणे :** गणेशोत्सवात सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही अश्या पद्धतीने मिरवणूक काढणाऱ्या विविध मंडळाना क्रिएटिव्ह फाउंडेशन व वेस्टर्न इंडिया फोर्जिंग प्रा. लि. कंपनीच्या वतीने स्पीकर सेट भेट देण्यात आले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमांस क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर, विश्वस्त मंजुश्री खर्डेकर, कै.विश्वनाथ भेलके प्रतिष्ठान चे अध्यक्ष विशाल भेलके, उमेश भेलके,तसेच महिला उत्सव प्रमुख कल्याणी खर्डेकर, अक्षदा भेलके, श्वेताली भेलके, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रशांत हरसूले, बाळासाहेब टेमकर, दिलीपराव उंबरकर,आर पी आय ( आठवले ) चे वसंतराव ओव्हाळ, केशवराव पवळे मान्यवर उपस्थित होते. तसेच दिवाळी दरम्यान काही स्वयंसेवी संस्थांना देखील अशीच भेट देणार असल्याचे ही संदीप खर्डेकर यांनी जाहीर केले.

### ओंकारेश्वर मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी फोडली; तपास सुरु

**पुणे :** पेशवेकालीन ओंकारेश्वर मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यांनी सहा हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्या चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत कौस्तुभ उल्हास गाडे (वय ४०, रा. ओंकारेश्वर मंदिर, शनिवार पेठ) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ओंकारेश्वर मंदिरात शनिवारी मध्यरात्री शिरलेल्या चोरट्याने गाभाऱ्यातील दानपेटीचे कुलूप तोडून सहा हजार रुपये चोरुन नेले. रविवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. त्यानंतर गाडे यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी मंदिराच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले असून, चोरट्याचा माग काढण्या येत आहे.



# माझ्या मराठीचा टिळा...

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, या गत दशकभरातील मागणीला यश आले असून अखेर केंद्र सरकारने त्यावर गुरुवारी शिक्कामोर्तब केले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली. मराठी भाषिकांचा स्वाभिमान वाढवणारा असा हा निर्णय आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मराठी भाषिकांची प्रदीर्घ काळापासूनची मागणी होती. साहित्यिक आणि राजकीय नेत्यांसह सर्वांनी ती लावून धरली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठीसह पाच क्षेत्रीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. यात बंगाली, आसामी, पाली आणि प्राकृत भाषांचा समावेश आहे. केंद्र सरकारने यापूर्वी तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम आणि उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला होता. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या भाषांची एकूण संख्या ११ झाली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक तोंडावर आली असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची घोषणा करण्यात आली आहे.भारत सरकारच्या भाषातज्ज्ञ समितीकडून कोणत्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा यासंबंधीचा निर्णय घेतला जातो. गेली किमान १०-१२ वर्षांपासून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून लढा सुरू होता. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे खूप वर्षांपासूनची मराठी माणसाची मागणी पूर्ण झाली आहे. आता मराठी माणूस अभिमानाने म्हणू शकेल-

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहले खरेच धन्य ऐकतो मराठी**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी**

आजवर अनेक राज्य सरकारांनी अभिजात दर्जा देण्याची मागणी लावून धरली होती. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही महाराष्ट्राच्या खासदारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. केंद्र सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषा सातासमुद्रपार जगभरात आणखी वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचणार आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय महाराष्ट्रातील साहित्यिकांना प्रोत्साहन देणारा ठरेल. भाषेला अभिजात दर्जा मिळणे म्हणजे त्या भाषेचा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि साहित्यिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण असा दर्जा मान्य करणे होय. भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. सर्वप्रथम ती भाषा अत्यंत प्राचीन आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व असावे लागते. ती भाषा इतर भाषांच्या विकासात योगदान दिलेली असावी तसेच त्या भाषेतील साहित्यिक संपदा अत्यंत वैविध्यपूर्ण असावी आणि ते साहित्य किमान दीड ते दोन हजार वर्षांपूर्वीचे असावे. शिवाय ती भाषा सध्याच्या बोलीभाषेपासून वेगळी असावी, म्हणजेच आज ती लोकांच्या दैनंदिन वापरात नसावी. तरीही तिचे सांस्कृतिक महत्त्व अबाधित असेल. त्यामुळे भाषेला ऐतिहासिक ठेवा मानला जातो. एखाद्या भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यावर त्या भाषेला अनेक फायदे मिळतात. त्या भाषेच्या संशोधनासाठी विशेष निधी उपलब्ध होतो. भाषा शास्त्रज्ञ व साहित्यिक त्या भाषेवर विस्तृत संशोधन करू शकतात. त्या भाषेतील साहित्य, लेखन, इतर दस्तऐवजांचे अनुवाद, प्रकाशन आणि पुनर्प्रकाशन करणे शक्य होते. त्याचबरोबर विद्यापीठे आणि इतर शिक्षण संस्थांमध्ये त्या भाषेच्या अभ्यासासाठी विशेष विभाग स्थापन करता येतात. त्यामुळे भाषेच्या अध्ययन आणि संशोधनाला नवी दिशा मिळते आणि ती भाषा पुढील पिढ्यांसाठी जतन होते. भाषा फक्त संवादाचे माध्यम नसते तर ती संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असते. जेव्हा भाषेला अभिजात दर्जा मिळतो तेव्हा त्या भाषेतून जन्मलेली संस्कृती, तिचे तत्त्वज्ञान आणि विचार अधिक ठळकपणे समाजासमोर येतात. अशा भाषेचे जतन होते, तिचा अभ्यास वाढतो आणि तिच्या वारशाचे संवर्धन होण्यासाठी सरकारकडून आणि समाजाकडून प्रयत्न केले जातात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती १० जानेवारी २०१२ रोजी गठित केली होती. या समितीने बरेचसे इतिहास संशोधन केले असून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ आदी प्राचीन दस्तावेज तपासले असून त्यांचा आधार घेऊन ५०० पानांचा पुराव्यासह एक परिपूर्ण अहवाल शासनाला सादर केला होता.समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल २०१३ मध्ये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीतील अहवालही केंद्र शासनाकडे १६ नोव्हेंबर २०१३ रोजी पाठविण्यात आला. त्यानंतर सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळावा म्हणून पत्र मोहीमही राबविण्यात आली होती. या संदर्भात राष्ट्रपतींना सुमारे एक लाख पत्रेही पाठविण्यात आली होती. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी जो लढा सुरू होता तो आता केंद्र शासनाच्या निर्णयामुळे पूर्ण झाला आहे. आता भाषा समृद्धीसाठी केंद्राच्या अनेक योजनांमधून निधी उपलब्ध होऊ शकेल. मराठी भाषा ही चांगल्या पद्धतीने ज्ञानभाषा होऊ शकेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास उशीर झाला असला तरी निर्णय झाला याचा आनंद आहे. त्याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन करून शरद पवार यांनी दिवसेंदिवस मराठी शाळांची संख्या कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. मराठी भाषा शिकणा-या मुलांची संख्याही कमी होत आहे. याकडे राज्य शासनाने लक्ष देण्याची गरज आहे असेही ते म्हणाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद महाराष्ट्रासह जगभरातील मराठी माणसाला झाला आहे. 'माझा मराठीचि बोलु कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके' असे संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. एका अर्थाने मराठी भाषेने अभिजात दर्जा मिळण्याची पैज जिंकली असे म्हणता येईल. ■

हमासचा म्होरक्या इस्माईल हनियेपाठोपाठ हिजबुल्लाचा प्रमुख नेता हसन नसरुल्लालाही इस्राईलने नुकतेच ठार मारले. यानंतर इराणने इस्राईलवर २०० बॅलेस्टिक मिसाईल्स डागली आहेत. यामुळे आखातातील युद्ध नव्या वळणावर आले आहे. वास्तविक, इस्राईलकडून हुती, हिजबुल्ला आणि हमास या इराणपुरस्कृत संघटनांवर केल्या जाणाऱ्या आक्रमक कारवायांमुळे आणि दक्षिण लेबनॉनमधील ८०० हून अधिक पेजरस्फोटांनंतर इराणला कारवाई करणे अपरिहार्य होते. पण दीर्घकाळापासून चालत आलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे इराणकडून फार मोठी आक्रमक कारवाई केली जाण्याची शक्यता दिसत नाही. तसेच हिजबुल्लाही संघटनाही आता कमकुवत झाली आहे. इस्राईलवरही अमेरिकेचा दबाव आहे. परिणामी आखातातील युद्धाची व्याप्ती फार वाढण्याच्या शक्यता कमी आहेत. पण संघर्ष आणि तणाव कायम राहील असे दिसते.

# आखातातील युद्धाचे पुढे काय होणार?

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर,** परराष्ट्र धोरण विश्लेषक

आठ ऑक्टोबर हा दिवस पश्चिम आशियात अनेक वर्षांपासून सुरू असणाऱ्या इस्राईल-पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्षाच्या इतिहासात एक प्रमुख दिवस ठरला. याचे कारण बरोबर वर्षभरापूर्वी म्हणजेच ८ ऑक्टोबर २०२३ रोजी हमास या दहशतवादी संघटनेने इस्राईलवर अत्यंत भीषण स्वरुपाचा दहशतवादी हल्ला केला होता. जगातील सर्वांत प्रभावी, निष्णात गुप्तहेर संघटना म्हणून ओळख असलेल्या मोसादला चकवा देत आणि संरक्षण साधनसामग्रीतील अद्ययावत तंत्रज्ञानाने निर्माण केलेले अभेद्य सुरक्षाकवच भेदत हमासने इस्राईलमध्ये मोठा संहार घडवून आणला. या हल्ल्यामुळे आखातात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या शांतता प्रक्रियेला मोठा सुरुंग लागला. वर्षभरापासून सुरु असलेल्या हमास, हिजबुल्लाह, हुती व इराण विरुद्ध इस्राईल यांच्यातील घनघोर संघर्षामुळे गाझापट्टीवर प्रचंड मोठी जीवित व वित्तहानी तर होत आहेच; पण आखातातील अशांततेचे आर्थिक पडसाद संपूर्ण जगालाही भोगावे लागत आहेत. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या यंदाच्या आमसभेदरम्यान इस्राईलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन नेतन्याहू यांनी हे युद्ध पुढेही सुरूच राहणार असल्याचे ठणकावून सांगितले आहे. त्यामुळे इस्राईलने आपल्या शत्रूंविरुद्ध म्हणजेच हिजबुल्ला, हमास, हुती या दहशतवादी संघटनाच नव्हे तर त्यांच्या पाठीशी असणाऱ्या इराण, सिरीया या राष्ट्रांविरुद्ध आर या पारची लढाई सुरु केली आहे हे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षभरामध्ये इस्राईलने गाझापट्टीवर प्रचंड मोठ्या प्रमाणावर हल्ले केले असून यामध्ये हजारो नागरिकांचा मृत्यू झाला आहे; तर अनेकांना विस्थापित व्हावे लागले आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यात घडलेल्या घडामोडी पाहिल्यास त्या या संघर्षात पडद्यामागचा सूत्रधार असणाऱ्या इराणपुढील अडचणी वाढवणाऱ्या होत्या. इराणची राजधानी तेहरान येथे नवनियुक्त राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधीला उपस्थित राहण्यासाठी आलेला हमासचा म्होरक्या इब्राहीम हनिये याला इस्राईलने मारणे असो, त्यापाठोपाठ दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेचा सर्वोच्च नेता असणाऱ्या हसन नसरुल्ला यासह अनेक नेत्यांची हत्या असो किंवा लेबनॉनमध्ये घडून आलेले हजारो पेजर स्फोट असोत; इस्राईलकडून केल्या जाणाऱ्या या आक्रमक कारवायांमुळे इराण पूर्णपणाने बॅकफूटवर गेल्याचे दिसून आले होते. हसर नसरुल्ला याच्याविषयी जगभरातील शिया पंथियांमध्ये अत्यंत आदर होता. त्यामुळे इराणला या सर्वांविरोधात प्रत्युत्तरादाखल कारवाई करणे अपरिहार्य बनले होते. कारण इराणच्या राजधानीमध्ये घुसून इस्राईलकडून कारवाया केल्या जात आहेत. हमास, हिजबुल्ला, हुती या इराणच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या संघटनांचे अस्तित्वच पुसून टाकण्यासाठी इस्राईल वाटचाल करत आहे. अशा स्थितीत इराणकडून दिखावा म्हणून का होईना इस्राईलविरुद्ध एखादा हल्ला होणार याची अपेक्षा होतीच. त्यानुसार इराणने अलीकडेच इस्राईलवर १५० हून अधिक बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा केला.

इराणच्या या हल्ल्यामुळे आखातात सुरू असलेले युद्ध चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी खोलात जाऊन विचार केल्यास वेगळेच चित्र समोर येते. आज इराणची अर्थव्यवस्था अमेरिकेसह जगाने टाकलेल्या निर्बंधांमुळे डबघाईला आली आहे. दुसरीकडे आखातातील सर्व सुन्नी मुस्लिम देश इस्राईलकडून होणाऱ्या कारवायांबाबत कमालीचे शांत आहेत. हमासचा नेता हनिये मारला गेला तेव्हाही या देशांनी कसलीही प्रतिक्रिया दिलेली नव्हती. आताही हसर नसरुल्लाला ठार मारल्यानंतरही हे देश शांत आहेत. किंबहुना सुन्नी मुस्लिम देशांमध्ये समाधानकारक भावना आहे. याचे कारण आखातामधल्या एकूणच हिंसाचारामध्ये आणि दहशतवादामध्ये या दोन नेत्यांचा मोठा हात होता. त्यामुळे इस्राईलविरुद्धच्या लढ्यात इराण एकटा पडल्याचे दिसत आहे. तसेच हे युद्ध वाढवणे इराणला आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाहीये. इस्राईल हा अण्वस्त्रधारी देश आहे. तसेच इराणकडेही अणुबॉम्ब असण्याच्या शक्यतेमुळे अमेरिका व पश्चिम युरोपियन देशांनी त्यांच्यावर निर्बंध टाकलेले आहेत. सामान्यतः जेव्हा दोन देश अण्वस्त्रधारी असतात तेव्हा त्यांच्यामध्ये 'बॅलन्स ऑफ टेरर' असतो. म्हणजेच आपण एकमेकांवर हल्ला केल्यास 'मॅड' म्हणजेच म्युच्युअली ॲश्युअर्ड डिस्ट्रक्शनची स्थिती ओढावू शकते याची दोघांनाही कल्पना असते. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादेपलीकडे ते आपापसातील संघर्ष चिघळू देत नाहीत. हाच प्रकार इस्राईल-इराण संघर्षात दिसून येतो. आपण पोसलेल्या दहशतवादी संघटनांचे मनोबल टिकून राहावे यासाठी इस्राईलवर हल्ला करताना इराणने लो इंटेन्सिटी मिसाईल्स डागले आहेत. याला इस्राईलकडून याला फार मोठे प्रत्युत्तर दिले जाण्याची शक्यता दिसत नाही.

गेल्या वर्षभरातील युद्धसंघर्षाचा फटका इस्राईललाही बसला आहे. अमेरिका व युरोपियन देश रशिया-युक्रेन संघर्षात गुंतलेले आहेत. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका आता काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. अशा वेळी कोणत्याही प्रकारची मदत अमेरिकेकडून इस्राईलला केली जाणे शक्य होणार नाहीये. मुळातच इस्राईलकडे आयरन डोम नावाचे अत्याधुनिक तंत्रज्ञान असून याद्वारे आकाशातून मारा करणारी क्षेपणास्त्रे हवेतच निष्प्रभ करण्यात येतात. त्यामुळेच इराणकडून २०० क्षेपणास्त्रे डागूनही इस्राईलमध्ये कसलीच जीवितहानी झालेली नाहीये. तसेच हा संघर्ष अधिक चिघळू देऊ नये याबाबत इस्राईलवर अमेरिकेचाही दबाव आहे. सबब इस्राईल टप्प्याटप्प्याने या दहशतवादी संघटना उद्ध्वस्त करण्याची रणनीती कायम ठेवेल असे दिसते.

तिसरीकडे लेबनान या देशाची निर्मिती मुळात आखातीतल ख्रिश्चन लोकांसाठी करण्यात आली. पूर्वी लेबनान ही फ्रान्सची वसाहत होती. सुरुवातीला लेबनानमधील ७५ टक्के लोकसंख्या ख्रिश्चन होती. पण अलीकडील काळात तेथे इस्लामिक लोकसंख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. हिजबुल्ला ही केवळ दहशतवादी संघटना नसून तो लेबनानमधील राजकीय पक्ष आहे. तेथील सरकारमध्ये हिजबुल्लाचे मंत्रीदेखील आहेत. या संघटनेकडे जवळपास एक लाखांहून अधिक संख्येचे सैन्य आहे. दोन लाखांहून अधिक संख्येने क्षेपणास्त्रे आहेत. २००५ मध्ये इस्राईल आणि हिजबुल्ला यांच्यात प्रचंड मोठा संघर्ष झाला होता. त्यानंतरच्या काळात या संघटनेने लेबनानमध्ये बंकर्सही विकसित केले आहेत. विशेषतः दक्षिण लेबनानमधील हिजबुल्लाच्या नेत्यांच्या व नागरिकांच्या घरांमध्ये शस्त्रास्त्रांचे तळ बनवण्यात आले आहेत. त्यामुळे इस्राईलकडून होणाऱ्या हल्ल्यांमध्ये अनेकदा सामान्य नागरीक मारले जातात. या शियापंथिय संघटनेला आर्थिक, राजकीय आणि नैतिक पाठबळ इराणकडून मिळते. इस्राईलला नामोहरम करण्यासाठी इराण हिजबुल्लाचा वापर करत आला आहे. त्यामुळेच इस्राईलने या संघटनेचे अस्तित्वच पुसून टाकायचे या इराद्याने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. इस्राईलने अलीकडेच ग्राऊंड स्ट्राईक करण्यासाठी लेबनानमध्ये आपले सैन्य घुसवले आहे. आजघडीला हिजबुल्ला ही दहशतवादी संघटना दक्षिण लेबनॉनमध्ये झालेल्या ८०० हून अधिक पेजर ब्लास्टमुळे आणि आपल्या म्होरक्यासह अनेक नेत्यांची हत्या झाल्याने कमकुवत झाली आहे. त्यामुळे त्यांच्याकडूनही मोठी कारवाई होण्याची शक्यता दिसत नाहीये.

पॅलेस्टाईन हा मूलतः सुन्नी पंथिय देश आहे. संयुक्त अरब आमिराती, सौदी अरेबिया, कतार यांसारखे सुन्नीपंथिय देश पॅलेस्टाईनच्या पाठिशी उभे राहणे गरजेचे होते. पण तसे न घडता इराणसारखा शिया पंथिय देश यामध्ये पॅलेस्टाईनसाठी लढतो आहे. याचे कारण सर्व सुन्नी पंथिय देशांना इस्राईलसोबत जुळवून घ्यायचे आहे. अरब राष्ट्रे आणि इस्राईल यांनी एकत्र यावे यासाठी अमेरिकाही प्रयत्नशील आहे. त्यातूनच भारत, अमेरिका, युएई आणि इस्राईल यांच्यात 'अब्राहम ॲकॉर्ड' हा करार अस्तित्वात आला. पण इराणचा याला विरोध आहे. त्यामुळेच अरब राष्ट्रांचे नेतृत्व करण्यासाठी इराण हमासच्या पाठिशी उभा असल्याचे दिसत आहे. पण अन्य देश याबाबत शांत आहेत. इराणला सिरीयाकडून थोडी फार मदत मिळत आहे. कारण सिरीयाही शिया पंथिय देश आहे. तो वगळता अन्य इस्लामिक राष्ट्रे कमालीची शांत आहेत. हसन नसरुल्ला हा शिया आणि सुन्नी या दोन्ही पंथियांमध्ये लोकप्रिय होता. असे असूनही त्याची हत्या झाल्यानंतर इस्लामिक राष्ट्रातून फार मोठ्या प्रतिक्रिया उमटल्या नाहीत. इराण हा गेल्या काही वर्षातील आर्थिक निर्बंधांमुळे प्रचंड मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. इराणमध्ये बेरोजगारी, बेकारी, गरीबी, उपासमार यांसारख्या अनेक समस्यांनी जनता त्रस्त आहे. अशा स्थितीत इराणला हे युद्ध लांबवणे परवडणारे नाही. ही सर्व परिस्थिती पाहता इस्राईल-इराण संघर्षाची व्याप्ती वाढण्याची शक्यता दिसत नाहीत. अर्थात इस्राईलकडून होणाऱ्या गाझापट्टी बाहेरील हल्ल्यात सामान्य नागरिकांचा बळी जाऊ लागल्यास आजवर निष्क्रिय राहिलेले इस्लामिक देश सक्रिय होऊ शकतात. ■

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग
**मंगळवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु.५, ज्येष्ठा श्री शके १९४६, भारतीय वायुसेना दिन, श्री त्र्यंबोली यात्रा, करवीर सेवादास महाराज यात्रा, आष्टा जि.नांदेड, श्री जनार्दनस्वामी जयंती, बेटकोपरगाव जि.नगर, पंचरात्रोत्सवारंभ विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
**नक्षत्र** : ज्येष्ठा, योग : आयुष्मान, करण : कौलव
**सूर्योदय :** स.०६.०९ **सूर्यास्त :** सायं.०५.५३ वा.
राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०

### दिनविशेष
▶१६५६: धूमकेतूमुळे प्रसिद्ध असलेल्या एडमंड हॅले या खगोल शास्त्रज्ञाचा जन्म. ▶१७५४: 'टॉम जोन्स'या गाजलेल्या कादंबरीचा लेखक हेन्री फील्डिंग याचे निधन. ▶१८४४ : काँग्रेसच्या आद्य संस्थापकांपैकी एक बद्रुद्दिन तैय्यबजी यांचा जन्म. ▶१८७१: द ग्रेट फायर ऑफ शिकागोची सुरवात. ही आग चार दिवस टिकून होती. ▶१८८८: राजा शिवाजी या महाकाव्याचे कवी महादेव मोरेश्वर कुंटे यांचे निधन. ▶१८९१: किर्लोस्कर मासिकाचे संस्थापक संपादक शंकर वासुदेव किर्लोस्कर यांचा जन्म, ते उत्कृष्ठ व्यंगचित्रकार होते. ▶१९०५: विलायती कापडांची पहिली होळी. ▶१९२६: विनोदी कथालेखक व पटकथा लेखक शंकर पाटील यांचा जन्म. ▶१९३२: भारतीय वायू सेना दिन ▶१९३६: हिंदी साहित्य सम्राट मुन्शी प्रेमचंद्र स्मृतीदिन. ▶१९६७: क्लेमंट ॲटली या माजी ब्रिटिश पंतप्रधानाचे निधन. ▶१९८६: कोकणात आढळणाऱ्या लाल बिचवांच्या दंशावर हाफकिन संस्थेने लस निर्माण केली.

### राशीभविष्य
▲ **मेष** : प्रतिष्ठा वाढेल. ▲ **वृषभ** : चांगली बातमी कळेल. ▲ **मिथुन** : विनाकारण खर्च होईल. ▲ **कर्क** : नवीन अनुभव घ्याल. ▲ **सिंह** : हितशत्रूंपासून सावध राहा. ▲ **कन्या** : घरगुती कार्यक्रम ठरवाल. ▲ **तुळ** : जीवलग साथदार भेटतील. ▲ **वृश्चिक** : अनपेक्षित पत्रे येतील. ▲ **धनु** : जुनी येणी येतील. ▲ **मकर** : कामात मदत मिळेल. ▲ **कुंभ** : आश्वासने देऊ नका. ▲ **मीन** : हितचिंतकांची मदत मिळेल.

### चिंतन
मनुष्याचे सुख दु:ख हे तत्वज्ञानावर किंवा वेदांतावर अवलंबून नसते. इतर प्राण्यांप्रमाणेच मनुष्य हा एक प्राणी आहे. त्याचे सुख त्याच्या शरीरावरच अवलंबून आहे. हे म्हणणे जरा चमत्कारीकच किंवा विचित्र वाटते. पण ते खरे आहे. जे स्वत:ला दु:खी समजतात त्यांनी रोज चार सहा मैल चालण्याचा व्यायाम सुरु केला तर त्यांना सुखाचा शोध लागल्याशिवाय राहाणार नाही.

### व्यक्तीविशेष
## मुन्शी प्रेमचंद
हिंदी साहित्यविश्वात उपन्यास सम्राट म्हणून गौरविलेल्या मुन्शी प्रेमचंद यांचा जन्म ३१ जुलै १८८० रोजी झाला. लमही, जि. पांडेपूर, या उत्तर प्रदेशातील गावी जन्मलेल्या या प्रतिभावंताने नबाबराय या टोपणनावाने लेखन सुरु केले होते. पण १९०९ मध्ये प्रसिद्ध झालेला सोजे वतन हा त्यांचा उर्दू काव्यसंग्रह त्यातील प्रखर राष्ट्रवादी विचारसरणीमुळे ब्रिटिशांनी जप्त केला आणि मग आपले मित्र दया नारायण निगम यांच्या सूचनेवरून त्यांनी प्रेमचंद हे नाव धारण केले. शिक्षण खात्यात नोकरी करणाऱ्या प्रेमचंदांनी १९२१ मध्ये गांधीजींच्या प्रभावामुळे नोकरी सोडली. असरारे मआविद (देवालयाचे रहस्य) ही त्यांची पहिली कादंबरी आवजे खल्क या बनारसच्या उर्दू साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली. १५ कादंबऱ्या आणि ३०० कथा लिहिणाऱ्या प्रेमचंदांच्या सेवासदन, प्रेमाश्रम, रंगभूमी, निर्मला, कायाकल्प, गबन, कर्मभूमी, गोदान या महत्त्वाच्या कादंबऱ्या. गोदानही त्यांची अमर कलाकृती भारतीय कृषक जीवनाचे महाकाव्य म्हणून ओळखली जाते. संग्राम, कर्बला, प्रेम की वेदी ही त्यांची तीन नाटके. अशा या उपन्यास सम्राटाचे ८ ऑक्टोबर १९३६ रोजी निधन झाले.

### बोधकथा
## पक्षांचीही भाषा एकच
आदित्यच्या घरातील माळ्यावर चिमण्यांची ये जा सुर होती. दुपारच्या वेळी घर शांत झालं की, चिमण्यांच्या पंखांची फडफड सुरु होत असे. शाळेतून आल्यानंतर आदित्यला चिमण्यांची लगबग बघायला मिळत असे. 'चिमण्या येजा का करतात' असे त्याने आईला विचारले. आई म्हणाली, 'आता या चिमण्या घरटं तयार करत आहेत.' आदित्यला मोठी गंम्मत वाटली. तो म्हणाला, म्हणजे चिमण्या स्वत:च त्यांचं घरटं बांधतात. आपल्यासारखं आधी घराचा प्लॅन बनवत नाहीत? त्यावर आई म्हणाली, अरे बाळां प्लॅन तर त्या बनवतात, पण आपल्यासारखा कागदावर नाही. कुठलाही पक्षी घर बांधताना, सर्व प्रथम सुरक्षित जागा शोधतो. माणसांचा, इतर प्राण्यांचा त्रास होणार नाही अशी जागा पक्षी निवडतात. जागा निश्चित झाल्यानंतर एकेक काडी, धाग्यांचे तुकडे, कापूस, गवतं चोचिमध्ये धरुण ते एकमेकांवर ठेवतात आणि सुबक घरटे बनवतात. घरटे बनवून झाल्यानंतर काही दिवसांनी पक्षांची मादी त्यामध्ये अंडी घालते. अंड्यातून पिले बाहेर येईपर्यंत एक पक्षी त्यांची राखण करत असतो. नंतर पिल्ले बाहेर आल्यानंतर त्यांच्या पंखात बळ येईपर्यंत पक्षी आणि पक्षीन त्यांना दाणा-पाणी देतात नंतर मात्र पिल्ले घरट्यातून उडून जातात. हे सगळ ऐकून आदित्यला आश्चर्य ही वाटत होतं आणि गंम्मत ही वाटत होती. शाळेतून आल्यावर आदित्य रोज त्या पक्षांचं आणि तयार होणाऱ्या घरट्याचं निरीक्षण करु लागला. (पूर्वार्ध)

### जिज्ञासा
## इलेक्ट्रॉनिक चष्म्याचा शोध
कोणताही दृष्टीदोष असल्यास चष्मा वापरावा लागतो. ज्या व्यक्तींना चष्मा लावावा लागतो त्यांनाच चष्मा म्हणजे काय संकट आहे याची जाणीव असते. काहींना तर दोन-दोन चष्म्याची गरज असते. एक लिहिण्या-वाचण्यासाठी आणि दुसरा जवळचे बघण्यासाठी.

चष्म्याच्या या समस्येवर उपाय म्हणून बहुतेक लोक एकाच फ्रेममध्ये दोन वेगवेगळ्या लेन्स असलेल्या म्हणजे बायफोकल लेन्सचा चष्मा लावणे पसंत करतात. हा चष्मा सांभाळायला सोपा असला तरी त्यापासून काही समस्याही उद्‌भवत असतात. बायफोकल लेन्समधून व्यक्ती दूरचे बघते त्यावेळी लांबची वस्तू स्वच्छ तर दिसते. मात्र जवळची वस्तू अंधूक दिसू लागते. कारण बायफोकल लेन्समधील जवळची लेन्स केवळ १६ ते १८ इंचामध्येच फोकस करत असते. यामुळे लांबचे आणि जवळचे बघणाऱ्यांना हा अनुभव हमखास येतोच. (क्रमश:)

### सामान्यज्ञान
## ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम
प्रत्येक उपग्रह एका दिवसामध्ये दोनदा पृथ्वीला फेरी मारतो. हे उपग्रह सतत पृथ्वीकडे सिग्नल्स पाठवत असतात. आपल्याकडे जीपीएस रिसिव्हर असेल, तर तो या उपग्रहांपैकी तीन किंवा त्यापेक्षा जास्त उपग्रहांचे सिग्नल्स पकडून आपली अचूक स्थिती किंवा पोझिशन सांगतो. या प्रक्रियेला 'ट्रायलॅटरेशन' असं म्हणतात. उपग्रहानं पाठवलेला सिग्नल आणि आपल्या रिसिव्हर मध्ये आलेला सिग्नल यांच्यातील वेळेच्या तफावतीचं गणित मांडून हा रिसिव्हर आपली अचूक पोझिशन सांगतो. याचा आणखी एक फायदा म्हणजे केवळ एका जागी उभं असतानाचीच माहिती हा रिसिव्हर सांगत नाही. (क्रमश:)

### सोडवा सुडोकू
सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटींमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४६०**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | | | |
| | | 3 | |
| | 4 | | |
| | | | 1 |

**क्रमांक ४५९ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 3 | 1 |
| 2 | 4 | 1 | 3 |
| 3 | 1 | 2 | 4 |

### हास्यविनोद
पोलिस अधिकारी नवोदित चोराला जोरजोरात ओरडत होते, अरे लाज वाटली पाहिजे तुला, दिवसाढवळ्या चोरी करतोस? तुला भीती नाही वाटत? आमचा वचक नाही राहिला तुम्हाला?'' तेवढ्यात त्यांचं बोलणं थांबवून चोर म्हणाला, 'अहो साहेब मला रात्री झोप येते म्हणून मी दिवसाढवळ्या चोऱ्या करतो. तुम्ही एवढं मनाला लावून घेऊ नका.'

### म्हणींचे अर्थ
## भित्यापाठी ब्रह्मराक्षस
ज्याच्या मनात भीती असते त्याला सर्वत्र आपल्याला संकटच आहे, असे वाटत असते, अशा अर्थाने ही म्हण वापरली जाते. म्हणूनच, कोणतंही चांगलं कार्य करताना सर्वप्रथम भीती मनातून काढून टाकणे आवश्यक आहे.

### महिलायन
## मधुमेही स्त्रियांसाठी आहार
दिवसभरात तीन-चार थोड्या थोड्या अंतराने खावीत. फळांमध्ये चेरी, स्ट्रॉबेरी, सफरचंद, संत्रे, डाळींब, पपई, मोसंबी इत्यादी फळे खावीत. तर भाज्यांमध्ये कारले, काकडी, टोमॅटो इत्यादी खावे. रोज थोडा सुका मेवाही खावा. यामध्ये बदाम आणि अक्रोडचा समावेश करता येईल. कमी फॅट असणारे दही घ्यावे. तसेच ग्रीन टी घ्यावा. चहासोबत हायफायबर बिस्कीटे घ्यावीत. रक्तदाब नसल्यास खारे बिस्कीटही खाता येईल. काळे चणे, मूग डाळ आणि जांभळेदेखील लाभदायक ठरतात. रोज ताजे ताक प्यावे. त्यामध्ये काळे मीठ घालावे. तसेच नारळपाणी, घरात बनवलेले सूप याही गोष्टी उपयुक्त ठरतात. मधुमेह झालेल्या व्यक्तींनी साखर, दूध, मध, चॉकलेट, पेस्ट्री, केक, आयस्क्रीम यांसारखे गोड पदार्थ टाळावेत. तसेच हाय ग्लायसेलिंग इंडेक्स असणारे पदार्थ टाळावेत. कारण त्यांचे ग्लुकोजमध्ये लवकर रुपांतर होते. त्यामुळे शरीरातील साखर एकदम वाढते. अशा वेळी इन्सुलिन साखर नियंत्रणात आणण्यासाठी असमर्थ ठरते. अशा पदार्थांमध्ये प्रामुख्याने मैदा, सफेद तांदूळ, व्हाईट ब्रेड, पिझ्झा, बिस्कीटे, टरबूज, द्राक्ष, चिक्कू, केळी, आंबा, लिची इत्यादींचा समावेश होतो. तळलेले पदार्थ, पुरी, भजी किंवा तुपातले पराठे खाऊ नये. यामुळे वजन वाढते आणि कोलेस्ट्रॉलही वाढते. ज्यूस पिण्याऐवजी ताजी फळे खाणे अधिक लाभदायक ठरते. भाज्यांमध्ये बटाटा, गाजर, बीट खाऊ नयेत. कारण यामध्ये स्टार्च आणि कार्बोहायड्रेट्स अधिक प्रमाणात असतात. या भाज्या खायच्याच असतील तर उकडून खाव्यात. पण तळून अजिबात खाऊ नयेत. पॉलिश केलेल्या तांदळाऐवजी ब्राऊन राईस खावा. तसेच लोणी, पनीर, मटण यांसारख्या पदार्थांचे प्रमाण खूप मर्यादित ठेवावे. मधुमेहावर उपचार करताना आहाराचा भाग ६० टक्के असतो. तर व्यायाम, औषधे आणि तणावनियंत्रण हा भाग ४० टक्के असतो. म्हणूनच आहाराचे महत्त्व मधुमेहींनी लक्षात ठेवावे. (उत्तरार्ध)

### बालांगण
## न्यूयॉर्क
हे एक आदर्श नैसर्गिक बंदर आहे. येथे भरती आणि ओहोटीमधील तफावत फक्त १.५ मीटर असल्याने आणि किनाऱ्यालगतच खोल पाणी असल्यामुळे जेट्या बांधून बंदरात जहाजांची उत्तम सोय केली आहे. बंदराचे दोन भाग पडल्यासारखे असून बाहेरील बंदर न्यू जर्सीचा किनारा आणि सँडी हूक या भूभागांनी एका बाजूने आणि लाँग आयलंडने दुसऱ्या बाजूने चांगले संरक्षित आहेत. आतील बंदरासाठी प्रवेश न्यू जर्सीचा किनारा एका बाजूने आणि ब्रुकलीनचा किनारा दुसऱ्या बाजूने अशा पन्हाळीतून आहे. आतील बंदरामध्ये खोल पाण्याचा उपसागर असून त्यात मॅनहॅटन बेटास वेगळे करणारे हडसन नदीचे मुख आणि अनेक लहानमोठ्या खाड्यांचा समावेश होतो. न्यूयॉर्क बंदराला एकूण सुमारे ७७० किलोमीटर लांबीचा किनारा असून याचे क्षेत्रफळही खूप मोठे आहे. या बंदरामध्ये जहाजांसाठी एकूण सुमारे २४० किलोमीटरहून अधिक लांबीचे धक्के आणि जेट्या बांधलेल्या आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

करसंकलन विभागाकडून 'क्यूआर कोड'चा वापर करण्याचे मालमत्ताधारकांना आवाहन

# 'ऑनलाइन' स्वरूपात मालमत्तेबाबत हरकतींचा निपटारा सुखकर!

**पिंपरी :** शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये ८,५५,१०२ मालमत्तांना सलग अनुक्रमांक (जिओ सिक्वेन्सिंग) देण्यात आले असून ५,३२,३०७ मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप करण्यात आले आहे. मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत करण्यात आलेल्या मोजमाप प्रक्रियेमध्ये नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांपैकी ५२,७८७ मालमत्तांपर्यंत विशेष नोटिस १ चे वाटप करण्यात आले असून यामधील २२,५८२ मालमत्ताधारकांनी हरकती दाखल केल्या असून त्यापैकी १६,९५३ मालमत्ताधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून त्यांना अंतिम बिल मिळाले आहे. यामधील ४,२६१ मालमत्ताधारकांनी ८,९९५४,२८९ रुपये कराचा भरणा केला असून ४,१३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरुपात कर भरुन त्यावरील सवलतींचा लाभ घेतला आहे.

### ऑनलाइन पद्धतीने हरकत दाखल करणे आहे 'सोपे'

● आत्तापर्यंत विशेष नोटिस १ मिळालेल्या मालमत्ताधारकांपैकी २२,५८२ मालमत्ताधारकांनी



हरकती दाखल केल्या असून यापैकी २०,४७५ मालमत्ताधारकांनी ऑफलाइन पद्धतीने, तर २,१०६ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात हरकती दाखल केल्या आहेत. नागरिकांनी मिळालेल्या नोटिसवरील 'क्यूआर कोड' स्कॅन करून ऑनलाइन पद्धतीनेच नोटिस मान्य करून आपले बिलसुद्धा प्राप्त करावे व त्यानंतर आपला मालमत्ताकराचा भरणाही ऑनलाइन स्वरूपात करण्यासाठी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासोबतच ज्या नागरिकांना मालमत्तेबाबत हरकत दाखल करावयाची असेल त्यांनी ऑनलाइनरीत्या हरकत दाखल केल्यानंतर त्यावर तत्काळ निपटारा आणि हरकतीवर सुनावणीसुद्धा ऑनलाइन स्वरूपात घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे. नागरिकांनी हरकत दाखल करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर हरकतीवर सुनावणीची प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे.




### नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेकडून ऑनलाइन पद्धतीने तत्काळ निपटारा!

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागामार्फत शहरात सर्वच मालमत्तेचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणांर्गत नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांना विशेष नोटिस १ वाटप करण्यात येत आहे. ज्या मालमत्ताधारकांना आपल्या नोटिसवर हरकती नोंदवायच्या असतील, अशा मालमत्ताधारकांनी नोटिसवर दिलेल्या 'क्यूआर कोड'द्वारे ऑनलाइन पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करावी. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेकडून ऑनलाइन पद्धतीने जलद गतीने निपटारा करण्यात येत असून त्याचा लाभ घ्यावा.

- **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड – महानगरपालिका

### विशेष नोटिस १ प्राप्त झाल्यानंतर हरकतींसाठी २१ दिवसांची मुदत...

● ज्या मालमत्ताधारकांना विशेष नोटिस १ प्राप्त झाल्यानंतर नोटिस अमान्य असल्यास हरकत दाखल करण्यासाठी २१ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्तेबाबत, करयोग्य मूल्य मान्य नाही, आकारणी दिनांक मान्य नाही, करपात्र क्षेत्रफळ मान्य नाही, मालमत्तेवरील नावामध्ये चूक, मालमत्तेवरील पत्ता चुकीचा, मोबाइल क्रमांक व ई-मेल आयडी चुकीचा इत्यादीबाबत हरकती दाखल करता येत आहेत. नागरिकांनी अशा हरकतींबाबत आवश्यक कागदपत्रांची ऑनलाइन पद्धतीनेच पूर्तता करून हरकतीवर सुनावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष नोटिस प्राप्त झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत वरील हरकती असतील तर त्या दाखल करणे आवश्यक असणार आहे, असे आवाहन करसंकलन विभागामार्फत करण्यात आले आहे.

» Selected



## रेल्वे स्थानकात राबविले स्वच्छता अभियान

**चिंचवड :** चिंचवड प्रवासी संघटनेच्या वतीने पुणे-लोणावळा परिसरातील रेल्वे स्थानके, लोकल व एक्सप्रेस गाड्यांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. चिंचवड रेल्वे स्थानकातील स्वच्छता मोहिमेत महाविद्यालयीन विद्यार्थिही सहभागी झाले. चिंचवड रेल्वे स्थानकांचे फलाट, आरक्षण केंद्र व पश्चिमेकडील टिकीट घर व परिसरात स्वच्छता केली. यात प्रतिभा महाविद्यालय, चिंचवड प्रवासी संघ, स्व. श्रीमती दरूबाई सोशल फाऊंडेशन सहभागी झाले. चिंचवड रेल्वे स्थानक प्रमुख मॅथ्यु जॉर्ज यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वच्छता व शपथ सोहळा पार पडला. प्रतिभा महाविद्यालयाचे प्रा. सुखलाल कुंभार, प्रा. सुप्रिया गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे साठ स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चिंचवड प्रवासी संघाचे मुकेश चुडासमा, तसेच, स्व. श्रीमती दरूबाई सोशल फाऊंडेशनच्या निर्मला माने, दादासाहेब माने समवेत चिंचवड रेल्वे स्थानकाचे व्यवस्थापक आर. के. तांबे, कर्मचारी मनोहर बोडके, अरविंद कुमार, किरण लगड उपस्थित होते. आपण ज्याप्रमाणे आपले घर स्वच्छ ठेवतो. त्याप्रमाणे पुणे-लोणावळा परिसरातील रेल्वे स्थानके, लोकल व एक्सप्रेस गाड्यांमध्ये स्वच्छता ठेवावी, असे आवाहन मान्यवरांनी केले. प्रा. कुंभार, डॉ. दिपक शहा तसेच, प्राचार्य डॉ. अरुणकुमार वाळुंज यांनी मनोगत व्यक्त केले. रेल्वे स्थानक प्रमुख मॅथ्यु जॉर्ज यांनी रेल्वे स्थानक व परिसर स्वच्छता केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## वायसीएम रुग्णालयात दंत उपचार उपलब्ध करुन द्या

**पिंपरी :** गेल्या अनेक वर्षापासून महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात दंत उपचाराच्या पूर्ण सुविधा मिळत नाहीत. दंत रुग्णांची केवळ तपासणी केली जाते. पुढील आवश्यक असणाऱ्या उपचारासाठी रुग्णांना शहरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये पाठविले जाते. त्याचा नाहक भूर्दंड नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे वायसीएम रुग्णालयात दंत उपचार उपलब्ध करुन द्यावेत, अशी मागणी आम आदमी पक्षाचे पदाधिकारी यलाप्पा वालदोर यांनी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. वायसीएममध्य दररोज कमीत कमी ५०-६० रुग्ण केवळ दंत उपचारसाठी येत असतात. मात्र याठिकाणी दातांच्या तपासणीसाठी एक्स-रे व ओपीजी एक्स -रे मशिन उपलब्ध नाहीत. मुख्य दंत-तज्ज्ञ येथे उपलब्ध नाहीत.अपुरी सुविधा, सक्षम यंत्रणा नसल्यामुळे त्या गरजू-गरीब रुग्णांना खाजगी हॉस्पिटलमध्ये पाठविले जात आहे. त्याचा आर्थिक भूर्दंड शहरातील या रुग्णांना सहन करावा लागत आहे. खाजगी रुग्णालयात यावर उपचार होतात; परंतु श्रीमंत महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात मात्र यावर उपचार का केले जात नाहीत, असा सवाल वालदोर यांनी उपस्थित केला आहे.

## पोलीस आयुक्तालयाला मिळाले सात पोलीस निरीक्षक

**पिंपरी :** एका पदावर तीन वर्ष पूर्ण झालेल्या मुंबई पोलीस दलातील १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी सात पोलीस निरिक्षकांची बदली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात करण्यात आली आहे. ज्योती घन:श्याम बागुल -भोपळे, भास्कर दत्तात्रय कदम, विक्रम साहेबराव बनसोडे, बिलाल अहमद अमिलद्दीन शेख, सचिन शिवाजी शिर्के, विनायक विलास पाटील व विशाल विलास पाटील या सात पोलीस निरिक्षकांची पिंपरी चिंचवड पोलीस दलात बदली करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने बदल्यांचे आदेश दिले होते. एका पदावर तीन वर्ष पूर्ण झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश होते. मात्र, यावर पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. ३१ जुलैला दिलेल्या आदेशाचा अनुपालन अहवाल २० ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश होते. तरी देखील बदल्या करण्यात आल्या नव्हत्या. मुंबईतील १३० पोलीस अधिकाऱ्यांची मध्यावधीत बदली करण्यास गृह खात्याने असमर्थता दर्शवली होती. मध्यावधी बदलीचा पोलीस अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची होती गृह खात्याने वर्तवली होती. मात्र वेळेत बदल्या न केल्याने निवडणूक आयोगाने पोलीस महासंचालकांची कानउघाडणी केली होती. राज्याच्या मुख्य सचिवांसह पोलीस महासंचालकांना निवडणूक आयोगाने कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यानंतर याप्रकरणी पोलीस महासंचालकांनी कार्यवाही केली आहे. पोलीस महासंचालकांनी 111 पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## नवरात्रोत्सवात फळांना वाढती मागणी



**पिंपरी :** नवरात्रोत्सवामुळे बाजारात विविध प्रकारच्या फळांची मागणी वाढली आहे. डाळिंब, पपई, पेरू, चिकू, सफरचंद, सीताफळ, संत्री व मोसंबी या फळांना जास्त मागणी आहे. तर डाळींब चिकू व संत्रीवगळता अन्य फळांचे भाव आवाक्यात असल्याचा दिलासा भाविकांना मिळाला आहे. याशिवाय सफरचंद व सिताफळची मोठी आवक झाली आहे. नवरात्रोत्सवात मागणी वाढल्याने पिंपरी फळ बाजारात फळांची मोठी आवक होत आहे. डाळिंबाचे भाव आधीपासूनच तेजीत आहेत. बाजारात दर्जानुसार २०० ते २५० रुपये असे एका किलोचे भाव आहेत. तर नवरात्र सुरू झाल्यापासून भाव २० टक्क्यांनी वाढले आहेत. मागील काही दिवसांपासून इतर फळांच्या तुलनेत सफरचंदाचे दर घसरले आहेत. काही दिवसांपूर्वी २०० ते २५० रुपये किलो असलेले सफरचंद आता १०० रुपये किलो दराने विकले जात आहेत. सध्या काश्मीर, सिमलाच्या सफरचंदांचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे तेथून आवक वाढली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये पुण्यातील मार्केटमधून शिमला, काश्मीरच्या सफरचंदांची आवक होत आहे. यामध्ये रेड गोल्डन, ग्रीन गोल्डन, रिचड, रॉयल असे सफरचंदाचे चार प्रकारयेत आहेत. काश्मीर येथून आलेल्या सफरचंदाची गोडी अधिक तर खायला नरम आहे. तर सिमला येथील सफरचंद खायला कडक आहेत. चिकूला मागणी जास्त असल्याने भावात तेजी आहे. पेरूच्या भावातही २० टक्के वाढ झाली आहे. दर्जानुसार ८० ते १०० रुपये भाव मिळत आहे. सीताफळालाही मागणी वाढली आहे. दर्जानुसार किलोस ५० ते ८० रुपये भाव मिळत आहे. मागणी वाढल्यामुळे भाव १० ते २० टक्क्यांनी वाढले आहेत. याशिवाय पपईला किलोला २० ते ५० रुपये भाव मिळत आहे. मागणी वाढल्याने मोसंबी आणि संत्र्याच्या भावात २० टक्के वाढ झाली आहे. संत्री प्रतिकिलो १०० ते १५० रुपये तर, मोसंबी दर्जानुसार ५० ते १०० रुपये किलो दराने विक्री होत आहे. केळीची ६० रुपये डझन प्रमाणे विक्री होत आहे. पेअरला मागणी असूनही प्रतिलिोचा दर २०० रुपयांवर स्थिर आहे.

## राजनिती...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते यांनी लांडगे यांना रामराम करत अजित गव्हाणे यांना पाठिंबा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण असते हे गव्हाणे यांच्या प्रचारात उतरल्याचे दिसते.

मोशी परिसरात अजित गव्हाणे यांची प्रचारात आघाडी

# आमदार लांडगे यांच्या गडाला सुरुंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** भोसरी विधानसभेचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पक्षाचे अजित गव्हाणे यांनी आणखी एक धक्का दिल्याचे दिसून आले. भाजपचे माजी क्रीडा सभापती लक्ष्मण सस्ते यांनी भाजपला 'रामराम' करत तुतारी फुंकण्याचा निर्धार केला आहे. याचीच परिणीती मोशी परिसरात दिसून आली. गव्हाणे यांच्या प्रचारात लक्ष्मण सस्ते यांनी पुढाकार घेतला असून, यामुळे मोशी परिसरात भाजपला मोठा धक्का बसणार असल्याचे मानले जात आहे.

भोसरी विधानसभेमध्ये प्रचाराचा वेग वाढला आहे. प्रचाराची रंगत वाढत असताना भाजपला मात्र मोठा धक्का बसला आहे. भोसरी विधानसभेचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक, क्रीडा समितीचे माजी सभापती व माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते यांनी लांडगे यांना रामराम करत अजित गव्हाणे यांना पाठिंबा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण असते हे गव्हाणे यांच्या प्रचारात उतरल्याचे दिसले.

मोशी भागामध्ये सस्ते कुटुंबीयांची मोठी ताकद आहे. सस्ते कुटुंबियांकडून गव्हाणे यांना पाठिंबा मिळाल्यामुळे या भागात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढल्याचे म्हटले जात आहे. लक्ष्मण सस्ते याप्रमाणेच आणखीही पदाधिकारी गव्हाणे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

याबाबत लक्ष्मण सस्ते म्हणाले अजित गव्हाणे हे सुसंस्कृत उच्चशिक्षित आणि या शहराशी नाळ जोडलेले व्यक्तिमत्व आहे. गव्हाणे कुटुंबातील तिसरी पिढी या भागाचे प्रतिनिधित्व करत असून, भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या गरजा नक्की कोणत्या आहेत हे त्यांना माहीत आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी शहरातील अनेक पूल, ग्रेड सेपरेटर, पाण्याच्या टाक्या, रस्ते यांचे नियोजन केले चाहे..

## फायरमन रेस्क्युअर पदाच्या परिक्षेचा निकाल जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिका अग्निशामक दलाच्या आस्थापनेवरील फायरमन रेस्क्युअर या पदाकरिता घेतलेल्या ऑनलाईन परिक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या परिक्षेची उत्तरतालिका जाहीर केल्यानंतर उमेदवारांकडून आलेल्या हरकती व आक्षेपांचे निरसन केल्यानंतर हा निकाल जाहीर केला आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर हा निकाल जाहीर करण्यात आला आहे. महापालिकेच्या अग्निशमन भरती अंतर्गत अग्निशमन विमोचक तथा फायरमन रेस्क्यूर पदाच्या एकूण १५० रिक्त जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्याकरिता उमेदवारांची २९ ऑगस्ट २०२४ रोजी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली होती. ही परिक्षा दिलेल्या १८३९ उमेदवारांचा निकाल जाहीर करण्या आला आहे. दरम्यान, या पदाकरता आवश्यक असलेली शारिरीक क्षमता मैदानी चाचणी घेण्याकरिता शैक्षणिक अर्हतेनुसार कागदपत्रांची पडताळणी करण्याकरिता आरक्षणनिहाय उमेदवारांचे नाव व वेळापत्रक कट ऑफ महापालिकेच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे.

एकमताने शहर कार्यकारणीचा ठराव

# तीनही विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने लढवाव्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात शरदचंद्र पवार यांना मानणारा मतदार मोठ्या प्रमाणात आहे. तीनही विधानसभेत पक्षाचे उमेदवार मोठ्या ताकदीने विजयी होऊ शकतात. शहरात शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन व्यापक आणि सर्वसमावेश वाढलेले आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात ठराव बैठक झाली. सदर बैठकीत शहरातील तीनही विधानसभा पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने लढाव्यात व निष्ठावंतांना प्रथम प्राधान्याने उमेदवारी देण्यात यावी असा सर्व प्रमुख शहर पदाधिकारी, सेल, फ्रंटल प्रमुख, पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकमताने ठराव मंजूर केला.



सदर ठराव पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि पक्ष संसदीय मंडळाला ठराव प्रत देण्यात येणार आहे.

यावेळी शहरातील सर्व मुख्य कार्यकारणी पदाधिकारी, सेल, फ्रंटल प्रमुख, पिंपरी चिंचवड, भोसरी विधानसभा प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. चिंचवड मतदार संघातून शहराध्यक्ष तुषार कामठे, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, पिंपरी मतदार संघातून माजी नगरसेविका डॉ. सुलक्षणा शिलवंत धर, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, सामाजिक न्याय विभाग प्रमुख मयूर जाधव, सचिन गायकवाड आणि भोसरी विधानसभेतून माजी स्थायी समिती सभापती अजित गव्हाणे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, दत्ता जगताप हे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने इच्छुक असून सदर उमेदवारांचे नावे पाठवण्यात येणार आहेत.

सदर बैठकीत पक्षाचे प्रदेश सचिव प्रशांत सपकाळ, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, कार्याध्यक्ष विशाल काळभोर, कार्याध्यक्ष संतोष कवडे, काशिनाथ जगताप (वरिष्ठ उपाध्यक्ष), वरिष्ठ उपाध्यक्ष धम्मराज साळवे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानेश आल्हाट, सूचक इम्रान शेख (युवक अध्यक्ष), अनुमोदक ज्योती निंबाळकर (महिलाध्यक्ष), राहुल आहेर (विद्यार्थी शहर अध्यक्ष), अरुण थोपटे (सेवादल अध्यक्ष), विशाल जाधव व इतर पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

नाना काटेंसाठी पिंपळे सौदागर ग्रामस्थांची एकजूट

# चला एकत्र येऊया.. आपल्या घरातील आमदार करूया"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिंचवड विधानसभा मतदारसंघात आपल्या घरातील माणूस मोठ्या पदावर गेल्यानंतर आपल्या गावाला व आपल्या चिंचवड विधानसभेला नक्कीच फायदा होणार आहे. यासाठी "चला एकत्र येऊया.. आपल्या घरातील आमदार करूया" या निर्धाराने माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांना आमदार करण्यासाठी पिंपळे सौदागर मधील सर्व ग्रामस्थ एकत्रित बैठक घेवून एकजुटीचा निर्धार केला आहे. रविवारी पिंपळे सौदागर येथील विमल हॉल येथे बैठक संपन्न झाली.



पिंपळे सौदागर परिसराचा विकास अतिशय नियोजनबद्ध झाला आहे. आपल्या पिंपळे सौदागर परिसराचा नावलौकिक शहरात नव्हे संपूर्ण देशात आपल्या नाना काटे यांच्या नेतृत्वाने मिळालेला आहे. कोणताही भेदभाव न राखता सामान्य माणसाची कामे करण्यासाठी नाना यांचा नेहमी पुढाकार राहिलेला आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या सुखदुःखात नाना काटे स्वतः उभे राहतात. दिवसातील २४ तासात केव्हाही गरजू लोकांच्या हाकेला धावतात. आपला परिसर सोडून संपूर्ण शहरातील कोणत्याही नागरिकांच्या समस्या नाना प्रत्यक्ष फोन द्वारे किंवा आपले कार्यकर्ते पाठवून सोडवतात. एखाद्या कौटुंबिक वादाला सोडवून समेट घडवून नाती घट्ट करतात. अनेकांची नाती तुटू नये यासाठी नाना काटे नेहमी पुढाकार घेतला आहे. आपल्या परिसरातील नव्हे घरातील माणूस "आपला माणूस" पोटनिवडणुकीत आमदार होण्यासाठी दोन पावले दूर राहिले होते. आता विधानसभेसाठी पुन्हा संधी आली आहे.

#रा

## निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती; पक्ष संघटन मजबूत करण्याच्या कार्यकर्त्यांना सूचना

# विधानसभेसाठी संघटनात्मक भाजपची मोर्चेबांधणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाने 'मायक्रो प्लानिंग' सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मंडल पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघात भाजपाची संघटनात्मक मोर्चेबांधणी सुरू असून, रविवारी (दि. 6) निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांना भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरामध्ये शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने संघटनात्मक मोर्चेबांधणी करून या संघटनाच्या माध्यमातून निवडणुकांना सामोरे जाण्याचे भाजपाचे धोरण आहे. त्यानुसार रविवारी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी भोसरी विधानसभा विस्तारक दीपक रजपूत, सरचिटणीस अजय पाताडे, माजी नगरसेवक उत्तम केंदळे, कमलताई घोलप, योगिता नागरगोजे, सुरेश म्हेत्रे, दिनेश यादव, पांडुरंग भालेकर, शांताराम बापू भालेकर, धनंजय वर्नेकर, अस्मिता भालेकर, कविता हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



निगडी चिखली मंडलाच्या रविवारी केलेल्या नियुक्त्यांमध्ये गिरीश देशमुख यांची युवा मोर्चा मंडल अध्यक्षपदी निवड केलेली आहे. उपाध्यक्षपदी रवी पाटोळे, अनिल वाणी यांचा समावेश आहे.

मंडलाच्या कामगार आघाडीपदी धनाजी मोरे, सरचिटणीसपदी चंद्रकांत शेडगे, प्रभाग अध्यक्षपदी रवींद्र कुकडे, उपाध्यक्षपदी अभिजीत जोशी, तर सरचिटणीस म्हणून सागर देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय मनीष चुडासमान यांची उपाध्यक्षपदी तर गोरख पाटील, अजिंक्य नलावडे, हरजीत बारडा यांची सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. मंडलाच्या चिटणीसपदी गणेश अवघडे आणि गणेश नागवडे यांची निवड करण्यात आली आहे. प्रभाग उपाध्यक्षपदी सुधीर कांबळे, सदस्य मंडल पदी सुनील कांबळे, उपाध्यक्षपदी दिलीप पवार तसेच ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी संतोष लष्करे यांची निवड करण्यात आली आहे.

मंडलाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी राकेश बावणे, उत्तर भारतीय आघाडीपदी कुंदन कुमार सिंह, उपाध्यक्षपदी प्रशांत कदम, चिटणीसपदी संतोष निकाळजे आणि सोमनाथ बिरजे यांची निवड केली आहे. सोमनाथ मेमाणे यांची प्रभाग 12 मध्ये अध्यक्षपदी, तर उपाध्यक्षपदी शिरीष उत्तेकर बापू मारणे यांची निवड करण्यात आली आहे.मनोज भालेकर हे सरचिटणीस म्हणून काम पाहणार आहेत.

> भारतीय जनता पार्टी ही संघटनात्मक पद्धतीने काम करते. सूक्ष्म नियोजन करून मंडल पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असतो. या माध्यमातून पक्षाची ध्येय धोरणे नागरिकांपर्यंत पोहोचतात. नागरिकांच्या समस्या जाणून घेता येतात. यातून संवाद घडतो. या दृष्टीने या सर्व मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या मंडल पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येय धोरणे जनमानसात पोहोचावी अशा सूचना या पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत. एकजुटीने, एक दिलाने भाजपासाठी प्रत्येकजण काम करणार आहे. प्रथम राष्ट्र, मग देश आणि नंतर आपण या धोरणानुसार झोकून देऊन पक्ष संघटना पक्ष मजबूत करायचा आहे, अशा सूचना या मंडल पदाधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, पिंपरी-चिंचवड.

# आपल्या पूर्वजांचा इतिहास नव्या पिढीला सांगा !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अग्र म्हणजे अति उत्तम, सर्वोत्तम असा अर्थ आहे. अग्र ही पदवी आहे.आपल्या आगरवाल पूर्वजांचा इतिहास महान आहे. आपला इतिहास आणि संस्कृती आपल्या नव्या पिढीपर्यंत पोचवले पाहिजेत. त्यामुळे समाजासोबत नव्या पिढीची नाळ जोडली जाईल.असे उद्गार अखिल भारतीय अग्रवाल कॉन्फरन्सचे अध्यक्ष अनुप गुप्ता यांनी काढले. श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरण यांच्या वतीने अग्रसेन महाराजांच्या जयंतीनिमित्त चिंचवड येथे 130 विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



यावेळी आहारतज्ज्ञ अतुल शहा, पंच समिती सदस्य वेदप्रकाश गुप्ता, रामअवतार आगरवाल, माजी अध्यक्ष प्रेमचंद मित्तल, राजकुमार गुप्ता, विनोद बन्सल, अशोक बन्सल, सुभाष बन्सल, श्री अग्रसेन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील आर. आगरवाल, सचिव सुनील जे. आगरवाल,

विनोद मित्तल, धर्मेंद्र आगरवाल, गौरव आगरवाल,आनंद आगरवाल, सागर आगरवाल, जोगिंदर मित्तल, सत्पाल मित्तल, संदीप गुप्ता, महिला अध्यक्ष मीनल जाजोदिया, अनिता जैन आदी मान्यवर उपस्थित होते. सुनील आगरवाल म्हणाले कि, पूर्वीच्या तुलनेते आज जयंती निमित्ताने सुमारे बाराशे ते दीड हजार समाज बांधव एकत्र येतात, ही आनंददायी बाब आहे, असे सांगत दुर्बल घटकातील नागरिकांसाठी आरोग्य विमा काढण्याकरिता ट्रस्टला दोन लाख रुपये देणगी जाहीर केली.

### शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत

- श्री अग्रसेन महाराज यांच्या प्रतिमेची शोभायात्राबिग इंडिया चौकामधून सुरू झही शोभायात्रा पायी भेळ चौक मार्गे निघाली. श्री अग्रसेन गार्डन,-भक्ती शक्ती जवळ असलेल्या अग्रसेन महाराज यांच्या पुतळ्या जवळ विसावा घेतला.
- यावेळी माजी उपमहापौर शैलेजा मोरे, माजी नगरसेविका सुलक्षणा धर, सामाजिक कार्यकत राजेंद्र बाबर, निलेश शिंदे, ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रेमचंद मित्तल, अध्यक्ष सुनील आगरवाल आदी मान्यवरांनी अग्रसेन महाराजांच्या पुतळ्यास हार अर्पण करून अभिवादन केले. ही शोभा यात्रा पुणेब -मुंबई महामार्गाने चिंचवड येथील अग्रसेन भवनकडे मार्गस्थ झाली.

## महिलांसाठी स्वच्छतागृह, हिरकणी कक्ष उभारावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भक्ती शक्ती उद्यानामध्ये महिलांसाठी उत्तम दर्जाचे स्वच्छतागृह व अद्ययावत स्वरूपाचे हिरकणी कक्षाची उभारणी करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष प्रवीण कदम यांनी केली आहे. या मागणीचे निवेदन महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना नुकतेच देण्यात आले. शहराच्या सौंदर्यामध्ये भक्ती शक्ती उद्यानाने भर घातली आहे. येथील छत्रपती शिवाजी महाराज व जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे शिल्प पाहण्यासाठी हे पाहण्यासाठी शहराच्या बाहेरून लोक येत असतात. शहरातीलही नागरिक रात्री उशिरापर्यंत भक्ती शक्ती परिसरात फेरफटका मारण्यासाठी येतात. यामध्ये महिला व लहान मुलांची संख्या मोठी असते. मात्र, या ठिकाणी चांगल्या स्वच्छतागृहांची सोय नाही तसेच स्तनदा मातांसाठी आवश्यक हिरकणी कक्ष नाही त्यामुळे महिलांची कुचंबणा होत आहे. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ स्वच्छतागृह बांधावे तसेच हिरकणी कक्ष उभारावा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.भक्ती शक्ती उद्यान उभारून अनेक वर्षे झाली मात्र महिलांच्या समस्येची दखल कोणीही घेतली नाही. आयुक्तांनी यावर तत्काळ अंमलबजावणी करून या कार्याची सुरूवात करावी. अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## Selected

## चिंचवडमध्ये निष्ठावंत उमेदवारालाच मिळणार संधी !

**पिंपरी :** चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अस्वस्थता प्रचंड वाढली आहे. महायुती प्रमाणेच महाआघाडीतही इच्छुकांची संख्या वाढल्याने गोंधळ सुरू आहे. दरम्यान, भाजपमधून जगताप कुटुंबाच्या उमेदवारीवर पक्षातून आणि महायुतीचा भागीदार पक्ष असलेल्या राष्ट्रवादीतूनही मोठा विरोध झाल्याने आता संघ, भाजपशी निष्ठा असलेल्या अत्यंत सर्वसामान्य इच्छुक कार्यकर्त्यांचे नावे चर्चेत आले आहे. दोन टर्म नगरसवेक असलेल्या शितल शिंदे यांचे नाव त्यात आघाडीवर आहे. एक निष्ठ पक्षाचा निर्धार विजयाचा,चिंचवडमध्ये भाजपचाच विजय अशा आशयाचे मोठे होर्डिंग्ज माजी नगरसेवक शितल शिंदे समर्थकांनी लावल्याने भाजपमध्येच मोठी खळबळ उडाली आहे. विधानसभा निवडणुकीचे बिगुल येत्या आठवड्यात वाजणार आहे. चिंचवड मतदारसंघात भाजपमधून पक्षाचे शहराध्यक्ष शंकरशेठ जगताप, मावळत्या आमदार अश्विनी जगताप, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, शत्रुघ्न काटे यांची नावे स्पर्धेत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून जेष्ठ माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नाना काटे, मोरेश्वर भोंडवे, मयूर कलाटे हे सर्वजण निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेतून एकमेव राहुल कलाटे यांचे नाव पुढे आहे, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे हे उमेदवारी मागत आहेत. दरम्यान, दोन्ही बाजुच्या सर्व इच्छुकांत गावकी भावकी असून एकमेव शिंदे यांचे नाव वेगळे असल्याने भाजपकडून धक्कातंत्राचा वापर होऊ शकतो, अशी चर्चा आहे. महायुतीच्या जागा वाटपात ही जागा भाजपकडे असल्याने तिथे शंकरशेठ जगताप यांना उमेदवारी मिळणार असे जवळपास निश्चित होते. प्रत्यक्षात त्यांच्या नावाला भाजपमधून आणि दादांच्या राष्ट्रवादीतूनही जोरदार विरोध झाल्याने पेच निर्माण झाला. शंकरशेठ नको तर दुसरे नाव आताच्या आमदार अश्विनी जगताप यांच्या नावाला पसंती आहे. दरम्यान, आता २२ वर्षे आमदारकी एकाच कुटुंबात असल्याने घराणेशाही नको या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणानुसार नवा चेहरा द्यायचा विचार सुरू आहे.



## किरकोळ भांडणाच्या कारणावरून पती पत्नीला बेदम मारहाण

**वाकड :** किरकोळ भांडणाच्या कारणावरून तिघांनी मिळून पती-पत्नीला बेदम मारहाण केली. रहाटणी येथे घडली. राहुल सुरेश गोळे (वय ४२, रा. रहाटणी) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रोहित सुभाष यादव (वय ३७), मोहित सुभाष यादव (वय 35), रोहन सुभाष यादव (वय २७ तिघे रा. रहाटणी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राहुल यांच्या घराच्या पार्किंग जवळ शनिवारी सकाळी भांडण झाले. त्या भांडणाच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादी यांना लोखंडी रॉड, पेंटच्या डब्याने मारहाण केली. हे भांडण सोडवण्यासाठी राहुल यांच्या पत्नी आल्या असता त्यांनाही आरोपींनी मारहाण केली. पोलिसांनी रोहित यादव आणि रोहन यादव यांना अटक केली आहे.

## सुरेश धोत्रे यांची नियुक्ती

**तळेगाव दाभाडे :** वृध्द साहित्यिक व कलावंताना मानधन देण्यासाठी महाराष्ट्र शासन जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीच्या अध्यक्षपदी अखिल भारतीय नाट्य परिषद तळेगाव शाखेचे अध्यक्ष सुरेश धोत्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुण्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांनी ही नियुक्ती केली. याबरोबरच तमाशा शाहीर, लोककला प्रतिनिधी म्हणून प्रदीप कुलकर्णी, भजन कीर्तन प्रतिनिधी म्हणून डॉ. शाम दलाल, नाट्य व चित्रपट प्रतिनिधी म्हणून कौस्तुभ कुलकर्णी, नृत्य व संगीत प्रतिनिधी म्हणून मोहित सावंत नारायणगावकर यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



नवरात्र निमित्त गरबा व दांडिया करून देवीचा जागर करणारे काटे वृंदावन दापोडी मधील महिला व कुमारिका.

पान १ वरून

## उमेदवारीसाठी पुणे भाजपात संघर्ष

शहराध्यक्ष म्हणून काम करताना कसबा मतदारसंघाशी घट्ट नाळ जुळल्याचे घाटे यांनी सांगितले. मेधा कुलकर्णी राज्यसभेच्या खासदार झाल्यानंतर चंद्रकांतदादा पाटील यांच्यासाठी मैदान साफ आहे असं वाटत होते. पण तो चंद्रकांतदादा समर्थकांचा भ्रम ठरला. भाजपच्या अमोल बालवडकर यांनी कोथरुडमध्ये आशीर्वाद यात्र सुरु केली आहे.बालवडकरांच्या यात्रांपासून बडे नेते लांब राहत असले तरी त्यांनी चंद्रकांतदादांना एकप्रकारे आव्हान दिल्याचं सांगण्यात येत आहे. पुण्यात भाजपमध्ये सर्वकाही अलबेल नाही हे मात्र सिद्ध झालंय. या अंतर्गत संघर्षाचे बंडखोरीत रुपांतर होणार नाही याची खात्री भाजपश्रेष्ठींना घ्यावी लागणार आहे.

## नाठाळ राजकारण्यांवर दबाव साहित्यिकांनी निर्माण करावा!

माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीपाल सबनीस, लक्ष्मीकांत देशमुख, प्रकाश पागे, गुरय्या स्वामी, डॉ. शैलेश पगारिया आदी मंचावर होते.

ठाकरे पुढे म्हणाले, महाराष्ट्र हा देशाला दिशा देणारा आहे, असे आपण म्हणत आलो आहोत पण सद्यस्थितीत महाराष्ट्रातील राजकारणाची भाषा अत्यंत खालच्या थराला गेली आहे. अशा परिस्थितीत साहित्यिकांनी सामाजिक चळवळ उभी करण्याची गरज आहे. साहित्यिकांनी ट्रोल होण्याचा विचार न करता अधिकारवाणीने बोलावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकात प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, वैचारिक मोकळेपणा, उदारमतवादी भूमिका घेणारी संस्था म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे बघितले जात आहे. 119 वर्षांच्या कार्यकाळात मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी परिषद कार्यरत असून लेखकांची खंबिरपणे पाठराखण करीत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी परिषदेच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी सांगितली. संजय नहार म्हणाले, परस्पर विरोधी विचारांच्या व्यक्ती साहित्य परिषदेत एकत्र येऊन समाजाची दिशा बदलण्याची क्षमता ठेवत कार्यरत असतात. विरोधकाला शत्रू मानायचे नसते अशी भूमिका घेणाऱ्या साहित्य परिषदेच्या वास्तूमध्ये राज ठाकरे यांच्या हस्ते बोधचिन्हाचे अनावरण होत आहे, ही आनंदाची बाब असल्याचे सांगितले.

## महायुतीला तीन अंकी संख्याही गाठता येणार नाही

कराड दक्षिण तालुका काँग्रेस कमिटी, पुणे पिंपरी चिंचवड रहिवासी यांच्यातर्फे निगडी प्राधिकरण या ठिकाणी असलेल्या ग.दि. माडगूळकर सभागृहात स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महाविकास आघाडी १८३ जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. ६५ टक्के जागा आम्ही जिंकलो. या गोष्टीचा विचार केला तर आम्ही विधासभा निवडणुकीत १८३ जागा जिंकू शकतो, महायुतीचा विचार केला तर ते तीन अंकी संख्याही गाठतील की नाही अशी स्थिती आहे." असे भाकीत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी वर्तवले.

## सत्तेची चावी नायब राज्यपालांच्या हाती

राज्यपालांनी याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस, एनसी व पीडीपी या पक्षांकडून करण्यात येत आहे.

भाजपने सर्वकाही नियमांनुसार होत असल्याचा दावा केला आहे. राज्यातून कलम ३७० हटवल्यानंतर केंद्र सरकारने नायब राज्यपालांच्या अधिकारांमध्ये वाढ केली होती. त्यानुसार त्यांना पाच आमदारांच्या नियुक्तीचे अधिकार देण्यात आले होते. या पाच आमदारांमध्ये दोन महिला, दोन कश्मीरी पंडित आणि एका पीओकेमध्ये नेत्याचा समावेश असेल. नायब राज्यपालांचे अधिकार वाढवल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. त्यामुळे बहुमताचा आकडा ४६ असेल की ४८ याबाबतही अद्याप संभ्रम आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निकालानंतर सरकार स्थापन करताना केंद्र सरकार आणि स्थानिक पक्ष आमनेसामने येऊ शकतात.



## थेरगांव परिसरात आई तुळजाभवानी माता महिला बचत गट उद्घाटन संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** थेरगाव परिसरातील माजी नगरसेविका मनिषा पवार, सामाजिक कार्यकर्त्या करिष्मा बारणे, नम्रता ताई भिलारे सुनीताताई मोळक विजयाताई बाबळे लक्ष्मीताई जंवजाळ, ललिता ताई जाधव यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. बचत गटाच्या अध्यक्षा वृषाली संदीप आमले यांच्या वतीने बचत गटाच्या माध्यमातून एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला वृषाली आमले यांच्या संकल्पनेतून बचत गटातील सर्व महिलांपैकी एक आदर्श महिला व एक आदर्श समाजसेविका लकी ड्रॉ द्वारे निवडण्यात आल्या. यामध्ये पद्मावती मुरुड यांना एक आदर्श गृहिणी म्हणून चांदीचे निरंजन व आदर्श समाजसेविका रितू कांबळे यांना हळदी कुंकवाचा चांदीचा करंडा बक्षीस म्हणून देण्यात आले. या आगळ्यावेगळ्या महिला बचत गटाच्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी सदर बचत गट कार्य करत असून यापुढे महिलांना सक्षम करण्याचे काम या बचत गटाच्या माध्यमातून होणार असल्याच्या प्रतिक्रिया याप्रसंगी उपस्थित महिलांनी दिल्या आहेत .

या कार्यक्रमाचे सर्व आयोजन बचत गटातील महिलांनी केले होते. आणि बक्षीस हे बचत गटाच्या अध्यक्षा सौ वृषाली संदीप आमले यांनी सर्व बक्षीस दिलेली होती. आई तुळजाभवानी माता बचत गटातील वृषाली आमले (अध्यक्ष), शितलताई मोरे (उपाध्यक्ष), स्वातीताई बडीगेर, (सचिव) शितलताई उदावंत, तेजश्रीताई उदावंत, शिल्पाताई जगताप, शितलताई लोढा, उत्कर्षा लोढा, यशोदा बडिगेर, लिलाबाई पवार, पद्मावती मुरुड, रेशमाताई जाधव, तेजश्री शिंदे, तारा धरपळे, राणी शिराळ, सविता मोतेकर, आशा माकर, सुनीता सूर्यवंशी, शोभाताई सुतार, अंजुषाताई कापसे, इतर महिला भगिनी राझिया शिलगार, स्वातीताई रोकडे, संगीता ताई लोहार, अर्चना लोढा, सुनीता सुतार या महिलांनी सहभाग घेतला.

## ॲड. अश्विनीकुमार उपाध्याय यांचे प्रतिपादन

# भ्रष्टाचारामुळे देशात घुसखोरीला प्रोत्साहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** भारतामध्ये सद्यस्थितीला सहा कोटी पेक्षा जास्त घुसखोरांची संख्या आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षितता, एकता, अखंडता धोक्यात आहे. याला व्यवस्थेतील भ्रष्टाचार हे मूळ कारण आहे. हा एक देशद्रोह व संघटित अपराध आहे. हे रोखण्यासाठी देशात पुरेसे कायदे आहेत, परंतु त्याची कडकपणे अंमलबजावणी होत नाही. आता सर्वसामान्य नागरिकांनीच लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण करून देशातील शिक्षण व कायदा व्यवस्था बदलण्यासाठी काम केले पाहिजे असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अश्विनीकुमार उपाध्याय यांनी केले. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सव व विजयादशमीनिमित्त हिंदू शौर्य दिन - विराट हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी स्व. संजय आर्य स्मृती दिनानिमित्त आद्य पत्रकार देवर्षी नारद राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांना आणि स्व. प्रा. एकनाथजी नाणेकर स्मृती समाजभूषण पुरस्कार शिवशंभो विचार मंचचे प्रांत संयोजक हभप शिरीष महाराज मोरे यांना ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. संजय उपाध्ये, हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, ॲड. उपाध्याय यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव उत्तम दंडीमे, समन्वयक कैलास बारणे, सुहास पोफळे, दत्तात्रय सूर्यवंशी, अतूल आचार्य, कुमार जाधव, नामदेव शिंत्रे, विजय गुंजाळ, दिगंबर रिद्धीवाडे, मनोज बोरसे, शिवाजी रेड्डी, मनोज गोबे, दिलीप कुलकर्णी, रमेश अर्धाले आदी उपस्थित होते.



#रा

## जेजुरीचे नूतन नाट्यगृह उद्‌घाटना आधीच वादाच्या भोवऱ्यात

# आमदाराच्या मनमानी कारभाराला भाजपाचा विरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुरंदर :** राज्यातील कुलदैवत असलेल्या खंडोबाच्या जेजुरीत सद्या श्रयेवादावरून वादळ निर्माण झाले असून केंद्र सरकारच्या वैशिष्टपूर्ण योजना आर्थिक निधीतून निर्माण केलेल्या मल्हार नाट्यगृहास आतील सभागृहास पुरंदर काँग्रेस आमदाराने संकल्पित स्वतःचे नाव दिल्याने नव्या वादाला वाट फुटली असून याचे उद्‌घाटन एवढ्या घाईने करण्याच्या निर्णयला भारतीय जनता पार्टी जेजुरीच्या कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध करीत निषेध व्यक्त केला तसेच अपुऱ्या सोयसुविधा असलेल्या भाजीमंडइचे घाई घाईने उद्‌घटना करण्याच्या मनमानी कारभाराला कडाडून विरोध दर्शवीला आहे. वास्तविक पाहता जेजुरी ही लोककलावतांची नगरीं म्हणून ही ओळखली जाते तसेच शिग्रकवी शाहीर सगनभाऊ जेजुरीकर यांच्या तीनशे वर्षाचा इतिहास लाभला असून या महान कवीचे नाव आतील सभागृहास न देता आमदारांनी स्वतःचे नाव का दिले असा सवाल भाजपने विचारला आहे त्याच बरोबर सिसीटीव्हीचा अभाव असलेल्या खंडोबा देवाची पगडी पब्लिक सिट कव्हरला लावून भविकांच्या भावना दुखावल्या असल्याचा आरोपही भारतीय जनता पार्टी तालुका सदस्य पुणे शहर प्रभारी अलका शिंदे यांनी केला आहे कै लावणी सम्रज्ञी रोशन सातारकर, जेष्ठ चित्रपट अभिनेत्री लीला गांधी, कै लोककलावंत हरिभाऊ कुदळे, लोककलावंत कै सुमंत लाखे, सारखे महान कलाकार या भूमीत जन्मलेले. त्यांचे नाव न देता आमदाराने स्वतःची टिमकी वाजवली हे निषेधार्थ असल्याचे भाजपा शहरअध्यक्ष गणेश भोसले यांनी म्हटले आहे. याच नाट्यगृहाचे जागी पूर्वी पंचक्रोशी तील गोर गरीब लोकांसाठी शुभकार्य होत होती. ते जुने सांस्कृतिक भवन पाडल्याने गोर गरीब नागरीक पोरके झाले, सदर नाट्यगृह हे जेजुरीकर नागरिकांची मालमत्ता असताना व या नवीन इमारती करिता आमदार निधीतून एकही रुपयाचे योगदान नसताना एकाच व्यक्तीच्या नावाचा अट्टाहास का व केंद्रातील निधीतून उभारलेल्या भावनला आपले नाव पुरंदरचे आमदार कसे देतात असा खडा पुरंदरचे माजी आमदार अशोक टेकवडे यांनी केला आहे. जेजुरीतील अपुऱ्या असलेल्या भाजी मंडई आणि नियोजित असलेल्या st बस स्थानकाचे काम शासकीय दृष्ट्या पूर्णत्वाकडे नसलेल्या वास्तूंचे उदघाटन व लोकार्पण सोहळा करण्यामागचे गौडबंगाल काय हा प्रश्न अधांतरी राहतो. या सर्व गोष्टींचा विचार करता काळे झेंडे दाखवून जाहीर निषेध करणार असल्याचे भाजपाचे जेष्ठ नेते व माजी आमदार पुरंदर अशोक टेकवडे यांच्यासह पुणे शहर प्रभारी प्रभारी अल्काताई शिंदे, जेजुरी शहराध्यक्ष भाजपा गणेश भोसले, वोक्रम माळवदकर, जेजुरी शहर उपाध्यक्ष भाजपा रवींद्र कोशे, शिवाजी झगडे सामाजिक कार्यकर्ते भाजपा उमा खुंटे सदस्य भाजपा, मंगल पवार तालुका महिला अध्यक्ष भाजपा यासर्व पदाधिकारी यांनी काळे झेंडे दाखवणार असल्याचे जाहीर केले.

» पुरंदर

# कोरेगाव भीमात वॉरंट द्यायला गेलेल्या पोलिसाला धक्काबुक्की

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरुर येथे जुन्या गुन्ह्यातील आरोपीला वॉरंट बजवायला गेलेल्या पोलिसाला जुन्या गुन्ह्यातील आरोपीने मी मी कोरेगाव भिमाचा जुना डॉन आहे असल्याचे म्हणत दमदाटी करुन धक्काबुक्की करत शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे रामदास दादाभाउ ढेंरगे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहें.

कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील रामदास ढेंरगे याच्या विरुद्ध यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यातील वॉरंट न्यायालयाकडून आलेले असल्याने पोलीस उपनिरीक्षक पंडित मांजरे व पोलीस शिपाई लखन शिरसकर सदर वॉरंट देण्यासाठी गेलेले असताना रामदास ढेंरगे याने आरडाओरडा करून आता पर्यत मला कोणी अटक केलेले नाही, तुम्ही मला ओळखले नाही, मी कोरेगाव भिमाचा जुना डॉन आहे, तुम्ही मला अटक केली तर मी भिंतीवर डोके आपटून घेवून तुम्ही मला मारहाण केली असा अर्ज करेल असे म्हणत स्वतःच्या हाताने तोंडावर हाणून घेवू लागला, दरम्यान रामदास याने पोलिसांशी हुज्जत घालून पोलिसांच्या अंगावर धावून जय शासकीय कामात अडथळा आणून पोलिसांना धक्काबुक्की करत शिवीगाळ, दमदाटी केली याबाबत पोलीस शिपाई लखन जर्नाधन शिरसकर वय ३० वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रामदास दादाभाऊ ढेंरगे रा. कोरेगाव भिमा ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली.

» शिरुर

## जागर नवदुर्गेचा...!

विजयकुमार हरिश्चंद्रे



**नवरात्री युवा महोत्सव :** नवरात्र युवा महोत्सव कार्यक्रमात जेजुरीच्या शरदचंद्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी नवं दुर्गा रूपे साकारून उपस्थितांची मने जिंकली

## राजगुरुनगर सहकारी बँकेस पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचा 'शून्य टक्के एनपीए' पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर :** येथील राजगुरुनगर सहकारी बँकेस पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचा 'शून्य टक्के एनपीए' पुरस्कार केंद्रीय सहकार व नागरी विमान उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. याप्रसंगी सहकार आयुक्त दीपक तावरे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, असोसिएशनचे अध्यक्ष अँड. सुभाष मोहिते, उपाध्यक्षा साहेबराव टकले, राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल, उपाध्यक्ष अविनाश कहाणे, संचालक किरण आहेर, राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, राजेंद्र वाळुंज, अरूण थिगळे, विनायक घुमटकर, समीर आहेर, सचिन मांजरे, अश्विनी पाचारणे, रामदास धनवटे, तज्ञ संचालक अँड. धर्मेंद्र खांडरे, गौतम कोतवाल, दीपक वारुळे, प्रकाश डोळस, मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे उपस्थित होते.

रिझर्व्ह बँकेने 'फिनान्शियली साउंड अँड वेल मॅनेज्ड' बँकेसाठी ठरवून दिलेले निकषांमध्ये एनपीए हा मुख्य घटक असतो. त्यासंदर्भातील निकष पूर्ण करण्यासाठी बँक कसोशीने प्रयत्न करत असल्यामुळे बँकेस निव्वळ एनपीए शून्य टक्क्यांवर आणणे शक्य झाले. बँकेने कर्जवाटपामध्ये नुकताच १ हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. तर ठेवींनी १७०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे.

# अनोखी घटस्थापना

## गेली दहा वर्षे सातत्याने मांडीवर घेऊन घट बसवणारा देवीचा अवलीया भक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** ता पुरंदर येथील संजय सुधाकर गरुड हे आपल्या मांडीवर घटस्थापना करीत आहेत गेल्या दहा वर्षांपासून ही परंपरा कायम ठेवली असुन देवीचा घटस्थापना करण्या पूर्वी हळुहळू जेवण व पाणी कमी प्रमाणात घेत होते जेव्हा घटस्थापना करण्यात आली तेव्हा पासून अन्न पाणी दहा दिवस काहीच घेत नाहीत

या दहा दिवसात देवीची आरती करण्यात येते घरातील सुवासिनी देवीला पाणी हाराची माळ घालतात गरुड हे एकाच जागेवर बसून असतात या कालावधीत कोणत्याही प्रकारची नैसर्गिक विधी करत नाहीत हा उपक्रम सुरू करून दहा वर्षे झाली असल्याचे त्यांनी सांगितले चौथ्या ते पाचव्या माळे नंतर मौन वृत धारण करून देवीचा जप करत असतात

सासवड येथील अंबोडी रोडवरील एका शोरूमच्या मागे त्यांचे निवासस्थान आहे या निवासस्थानी प्रत्यक्ष भेट दिली असता मांडीवर घटस्थापना करुन गरुड हे बसले होते ही एक आगळीवेगळी देवीची भक्ती म्हणावी लागेल



# विलास तांबे महिला महाविद्यालयामध्ये 'महिला प्रशिक्षण केंद्राची' स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे विलास तांबे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व ग्रामपंचायत डुंबरवाडी तालुका जुन्नर आणि त्याचबरोबर "परी" फॅशन डिझायनिंग इन्स्टिट्यूट अँड लेडीज ब्युटी अकॅडमी,राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधत "महिला सबलीकरण" या विषयाअंतर्गत महीलांसाठी मोफत प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन करण्यात आले.महिलांचे आर्थिक दृष्ट्या सबलीकरण,सशक्तिकरण आणि स्वावलंबी निर्माण करण्यासाठी या केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

या महिला सबलीकरण केंद्रांतर्गत शिवणकला प्रशिक्षण, ब्युटी पार्लर कोर्स, बेकरी मेकिंग अँटम आणि इतर विविध प्रकारचे प्रशिक्षण केंद्र मोफत स्वरूपामध्ये राबवण्याबाबतचा विचार संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे आणि सचिव वैभव तांबे यांनी व्यक्त केला. सदर उदघाटन प्रसंगी डुंबरवाडी ग्रामपंचायत सरपंच शितलताई गोरे, उपसरपंच अजित डुंबरे तसेच "परी" फॅशन डिझाइनिंग इन्स्टिट्यूट अँड लेडीज ब्युटी अकॅडमी यांच्या संस्थापिका व अध्यक्ष पल्लवी औटी, आयसीडीएस अंगणवाडी उपक्रम ओतुर विभाग शुभांगी शेटे, डुंबरवाडी येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.प्राचार्य डॉ.संजय देवकर यांनी डुंबरवाडी ग्रामपंचायत व पंचक्रोशीतील महिला व तसेच बी.एड.प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-शिक्षिका यांच्यासाठी सदर कोर्स हा मोफत स्वरूपामध्ये राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. या कार्यक्रमा दरम्यानच महाविद्यालयामध्येच तयार करण्यात आलेले "गांडूळ खत" हे परस बागेसाठी उपस्थित महिला भगिनींना वाटप करण्यात आले.जैविक शेती अंतर्गत दशपर्णी अर्क निर्मितीचे उपक्रम बाबतची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक अभिजीत दांगट व चैताली विधाटे यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाची माहिती पुस्तिकेचे देखील प्रकाशन सोहळा यानिमित्त संपन्न झाला.

# मराठीला अभिजात दर्जा दिल्याबद्दल अभिनंदन !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** गेली अनेक वर्षांच्या मागणीनंतर आणि पाठपुराव्याने मराठी भाषेला केंद्र सरकारने नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिला त्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड शाखेने अभिनंदनाचा ठराव पास केला आहे सासवड येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित परिषदेच्या मासिक सभेत अध्यक्ष अँड दिलिप निरगुडे यांनी हा ठराव मांडला व सर्वानुमते मंजूर करण्यात आला. साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष अँड आण्णासाहेब खाडे यांसह अनेक साहित्य प्रेमी या प्रसंगी उपस्थित होते. या लढ्यासाठी ज्यांनी म्हणून काम केले त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

साहित्य परिषदेचे सदस्य डॉ जगदीश शेवते यांनी यावेळी अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत अभिजात दर्जा मिळाल्याने होणारे फायदे यावर भाष्य केले. मराठी भाषा संशोधन केंद्रे, प्राचीन ग्रंथांचे जतन, भाषांतर, डिजिटायझेशन,, ग्रंथालये, विविध भाषा पुरस्कार आदींना गती मिळणार आहे


## पुरातत्त्व विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी प्रयत्न आवश्यक

# पाबळच्या ऐतिहासिक मस्तानी स्मृतिस्थळाची दुरवस्था खेदजनक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पाबळ ता. शिरुर येथील थोरले बाजीराव यांचे शौर्य, मस्तानीचे सौंदर्य आणि बाजीराव मस्तानी यांची प्रेम कहाणी जगाने अनुभवली असून थोरले बाजीराव यांच्या नावापुढे मस्तानीच्या नावाचा उल्लेख करून प्रत्येकजण बाजीराव मस्तानी असा उल्लेख करतो मात्र येथे असलेल्या मस्तानीच्या कबरेच्या वास्तू व स्मृतिस्थळाच्या परिसराची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असल्याने संबधित विभागाने दुरूस्ती व स्वच्छता करून ऐतिहासिक ठेवा जतन करण्याची मागणी नागरिक करत आहे.

पाबळ ता. शिरुर येथे सण १७४० मध्ये बाजीरावांच्या मृत्यूनंतर मस्तानीने हिरा गिळून आत्महत्या केल्याचे इतिहास अभ्यासकांकडून सांगितले जाते. तर काही अभ्यासक बाजीरावांच्या मृत्यूची बातमी कळाल्याने धक्क्याने मस्तानीचा मृत्यू झाल्याचे सांगतात दरम्यान पाबळमध्ये मस्तानीचे दफन केले, हिरा व काही दागिने मिळतील या उद्देशाने १९९७ व २००९ मध्ये काही अज्ञात चोरट्यांनी कबर खोदली मात्र त्यांच्या हाती काही लागले नसल्याचे सांगितले जाते. कबरीची मोडतोड झाल्याने



पुरातत्त्व विभागाने किरकोळ डागडुजी करून कबर पुन्हा उभी केली. त्यानंतर पुरातत्त्व विभाग व स्थानिक प्रशासनाला स्मृतिस्थळाचा विसर पडल्याचे चित्र दिसत आहे, काही दिवसांपासून पुरातत्त्व विभागाने स्मृतिस्थळाची किरकोळ डागडुजीचे काम हाती घेतले व ते संथगतीने सुरू आहे. सध्या स्मृतिस्थळाचा परिसर व भाग गवताने वेढला असून सर्वत्र कचरा पडला आहे. तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी कोणतीही सुविधा नाही. अनेकदा स्मृतिस्थळ बंद तर लाईटची सोय नसल्याने रात्री पूर्णपणे अंधार असतो. पुरातत्त्व विभागाने मस्तानीच्या ऐतिहासिक स्मृतिस्थळाचे मूळ स्वरूप परत निर्माण करून ऐतिहासिक ठेवा जतन करण्याची अपेक्षा पर्यटक व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### मस्तानी कबर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित

● पाबळ येथील मस्तानीच्या कबरेची वास्तू आयताकृती असून त्यास पूर्व, उत्तर व दक्षिण अशा तीन दिशांना प्रवेशद्वार आहेत. वास्तूच्या मध्यभागी मुख्य कबर व शेजारी तुळशी वृदांवन आहे. मस्तानी कबर ही शासनाने १९ सप्टेंबर १९९६ च्या शासन निर्णयानुसार राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करत त्यानुसार या स्थळाची देखभाल दुरुस्ती ही पुरातत्त्व विभागाकडे देण्यात आली आहे.

### स्मृतिस्थळाची झालेली दुरवस्था खेदजनक

● पाबळ गावाला मस्तानीच्या स्मृतिस्थळाचा ऐतिहासिक ठेवा असून सध्या स्मृतिस्थळाची झालेली दुरवस्था खेदजनक आहे. पुरातत्त्व विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे बाजीराव मस्तानी सांस्कृतिक प्रतिष्ठान पाबळचे कार्याध्यक्ष चंद्रशेखर वारघडे यांनी सांगितले.

## » Selected



### कु.प्राप्ती शिवाजी वाळुंजची महसूल सहाय्यकपदी निवड

**शिरोली :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत राक्षेवाडी (ता.खेड) येथील कु.प्राप्ती शिवाजी वाळुंज हिची 'महसूल सहाय्यक' या पदावर निवड झाली. निवडीबद्दल राक्षेवाडी ग्रामस्थांनी प्राप्तीला फेटा बांधून शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून भव्य सत्कार केला. राक्षेवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात प्राप्ती हिचा सत्कार जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जितेंद्र राक्षे,पंचायत समितीचे माजी उपसभापती सतीश राक्षे,गावच्या सरपंच सविता राक्षे,माजी सरपंच सुरेखा राक्षे,ग्रामपंचायत सदस्य श्रद्धा सांडभोर,सेवानिवृत्त कृषी अधीकारी राम वाळुंज,एलआयसी अधीकारी सुरेश वाळुंज, रोहिदास वाळुंज, शिवसेना नेते अशोक वाळुंज, वैभव राक्षे, तंटामुक्तीचे उपाध्यक्ष बाळासाहेब फदाले,बँकचे अधिकारी इंद्रजित राक्षे,उद्योजक पांडुरंग राक्षे आदींचे उपस्थितीत झाला.

घरच्यांचे मिळालेले पाठबळ व अभ्यासासाठी असलेली वातावरण निर्मिती आणि अधिकारी होण्याचे मनाशी बाळगलेले स्वप्न हे प्रत्यक्षात उतरावे म्हणून सतत अभ्यास केला.जिद्द,मेहनत आणि अभ्यासाच्या जोरावर लोकसेवा आयोगाचे परीक्षेत यश मिळविले.



### राष्ट्रवादी सोशल मीडीया सरचिटणीसपदी नितीन कामठे

**शिक्रापूर :** धानोरे ता. शिरुर येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन शिवाजी कामठे यांची नुकतीच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार सोशलमिडीयाच्या शिरुर तालुका सरचिटणीसपदी निवड करण्यात आली असून आमदार अशोक पवार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. धानोरे ता. शिरुर येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन शिवाजी कामठे यांनी राष्ट्रवादी पक्षाशी एकनिष्ठ राहून शिरुर तालुक्यात पक्ष वाढीसाठी विशेष मोहीम राबवत पक्षाबाबतची माहिती सोशल मीडियातून सर्वसामान्यांपर्यत पोहचवण्याचे काम केले असल्याने त्यांची नुकतीच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार सोशल मिडीयाच्या शिरुर तालुका सरचिटणीसपदी निवड करण्यात आली असून याबाबतचे पत्र आमदार अशोक पवार, उद्योजक हरिष येवले पाटील, सोशल मिडीया तालुकाध्यक्ष प्रशांत पवार, चेअरमन ज्ञानेश्वर थेऊरकर, भानुदास भोसुरे यांसह आदींच्या हस्ते नितीन कामठे यांना देण्यात आले असून निवडीनंतर बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ध्येय धोरणे नागरिकांपर्यंत पोहचवणार असल्याचे नितीन कामठे यांनी सांगितले.



### म.ए.सो.पूर्व प्राथमिक शाळेत वैदिक पद्धतीने विद्यारंभ संस्कार

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक शाळेत "ललिता पंचमी" निमित्त "विद्यारंभ संस्कार" देण्यात आला. यानिमित्ताने मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडी काढली. पाद्यपूजन व ग्रंथ पूजन करून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जांभळे मॅडम व ज्येष्ठ शिक्षिका कु. संगीता राऊत यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे स्वागत करण्यात आले. ग्रंथ पूजन व सरस्वती पूजन प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री. नरेंद्र महाजन व मुख्याध्यापिका सौ. जांभळे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील सहशिक्षिका सौ. काळाने व कोल्हाळे यांनी होम हवन विधीने मातांद्वारे मंत्रोच्चार करून घेतले. माता पालक व मुलांच्या हस्ते ग्रंथ पुस्तिकेचे पूजन करून पुस्तकातील " श्री ", "श्री गणेशाय नमः" इत्यादी अध्यायांचे वाचन संस्कार व लेखन संस्कार करून घेण्यात आले. ग्रंथ व पाटी पूजन करून बुद्धिवर्धक प्रसादाचा नैवेद्य दाखवून, मुलांना तो ग्रहण करावयास दिला. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथांना नमस्कार करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

#रा

## सकल हिंदू समाज व रामगिरी महाराज यांची मागणी

# दौंड शहरातील कत्तलखाना बंद झालाच पाहिजे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** दौंड शहरातील कत्तलखाना हा बंद झालाच पाहिजे तसेच सरकारने देशी गाईंना गोमातेचा दर्जा दिला आहे. त्यामुळे त्यांचे संरक्षण झालेच पाहिजे. दौंड मधीलच नव्हे तर महाराष्ट्राचे सर्वच कत्तलखाने शासनाने बंद करावे, अशी मागणी रामगिरी महाराज यांनी शिवाजी चौकात जाहीर सभेत बोलताना केली.

रामगिरी महाराज म्हणाले की आई आणि गाई या माता आपले आहेत. आपण त्यांनी सर्वांचे रक्षण करणे गरजेचे आहे राज्यात जे कत्तलखाने चालतात हे राजकारणाच्या आशीर्वादाने चालतात तसेच दौंड मधील कत्तलखाना हा भीमा नदीच्या तीरी आहे येथील सर्व दूषित पाणी व घाण हे आपल्या पवित्र भीमा नदीत जाऊन मिळते ती पुढे चंद्रभागाहून पंढरपूरला जाते तसेच या गंगेचे तीर्थ म्हणून आपण हे पाणी पितो म्हणून सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे हा कत्तलखाना ताडताडीने बंद करावा. मुख्यमंत्र्यांनी तीन महिन्यापूर्वी जे आश्वासन दिले होते त्याची अंमलबजावणी अद्यापही झालेले नाही, असेही ते म्हणाले.

मागील काळात मी जे बोललो, त्याचा चुकीचा अर्थ काढून माझ्या विरोधात अनेक ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, जे सत्य आहे, ते मी बोलणारच, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. मला माझ्या मरणाची भीती वाटत नाही कारण मी महाराज असून, माझे पिंडदान मी स्वतःच केले आहे, असेही त्यांनी सांगितले.



देशी गाई ह्या जगल्याच पाहिजेत देशी गाई यांच्या शेणापासून व गोमूत्रापासून अनेक प्रकारचे औषधे तयार होतात यावर कॅन्सर सारखे औषध व कोड फुटी वर जे औषध वापरले जाते याच्यामध्ये गाईच्या गोमूत्राचा समावेश असतो, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

तसेच जगद्गुरु तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह भ प शिरीष महाराज मोरे म्हणाले की दौंड मधील कत्तलखाना हा २०१६-१७ पासून बांधण्यात येत आहे त्याला या सरकारने मंजुरी दिलीच कशी, अशी विचारणा त्यांनी केली.

शासनाने त्वरित हा कत्तलखाना रद्द करत असल्याचा आदेश काढावा व त्या जागी बहुउद्देशीय इमारत उभारावी. सरकारने असे केले नाही, तर येणाऱ्या काळात सर्व वारकरी समाज व हिंदू समाज मिळून हा कत्तलखाना पाडू, असा इशारा त्यांनी दिला. वारकरी म्हणून आम्ही शासनाचा निषेध करतो शासनाने राष्ट्रहिताचे कायदे करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

हभप काका पाहणे, मनोज फडतरे, प्रवीण परदेशी आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. दौड मधील जनतेने याला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

## शरद पवार यांचे मंत्रीपद देण्याचे संकेत

# हर्षवर्धन पाटलांना राज्याची जबाबदारी देतो!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** दिवंगत खासदार शंकरराव पाटील यांच्या प्रमाणेच हर्षवर्धन पाटलांची देखील राजकारणातील स्वच्छ प्रतिमा आहे. हर्षवर्धन हे सुसंस्कृत राजकारणी असून त्यांना शेतकऱ्या व कामगारांच्या प्रश्नांची जाण आहे त्यामुळे त्यांना लोकांच्या हिताचं काम, कठीण कामे हर्षवर्धन पाटील यांच्याकडे द्यायला पाहिजेत. त्यासाठी, तुम्ही त्यांना महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये पाठवा. मला स्वतः साठी काहीही मागायचं नाही, तुम्ही त्यांना निवडून आणा मी त्यांना राज्याची जबाबदारी देण्याचे काम करतो असे म्हणत महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर मंत्रिपद देण्याचे संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) चे अध्यक्ष शरद पवार यांनी इंदापुरात दिले.





भाजप नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह सोमवारी शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. डॉ. अमोल कोल्हे, उत्तमराव जानकर, नारायण पाटील, ॲड तेजसिंह पाटील, महारुद्र पाटील, अंकिता पाटील, राजवर्धन पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

हर्षवर्धन पाटील आणि आमचा पक्ष वेगळा होता. पण, धोरणात कधी मतभेद नव्हते. जेव्हा नवीन काही करायचे असेल आणि जबाबदारी द्यायची असेल तर हर्षवर्धन यांचे नाव पहिलं यायचं. साखर कारखान्या संदर्भात ज्यावेळेस अडचण यायची त्यावेळेस मी हक्काने सांगायचो की हर्षवर्धन आपला माणूस आहे, तिथं पक्ष वेगळा असला तरी देखील. हर्षवर्धन पाटील यांच्याकडे बघून मला सारखं वाटायचं हा रस्ता चुकला. शंकरराव भाऊंनी आपल्याला दाखवले तेच आपलं घर, निर्णय घ्यायला वेळ लागला पण निर्णय घेतला. हा फक्त इंदापूर पुरता मर्यादित नाही, परंतु साखर व्यवसायाला चांगला दिवस आणणारा निर्णय असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले.

खासदार सुप्रियाताई आमच्या भगिनी आहेत, ताई तुमचा आम्हाला अभिमान आहे. तुम्ही चारवेळा खासदार झाला. तीनवेळा आमचा प्रत्यक्ष थोडाफार सहभाग होता. आणि कालच्या लोकसभा निवडणुकीत आमचा अदृश्य सहभाग होता, असं विधान माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले. यावर जाहिर सभेत चांगलाच हशा पिकला. माझी कामाची पद्धत अशी आहे की व्यक्तिगत मी कधी निर्णय घेत नाही. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आपण राष्ट्रवादीत प्रवेश केला असेही हर्षवर्धन पाटील म्हणाले.

# कृषीविषयक संशोधन शेतकऱ्यांपर्यत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ होऊन त्यांच्या शेतमालाला योग्य प्रकारे भाव मिळण्यासोबतच नैसर्गिक आपत्तीच्या काळात पिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता कृषी विषयक संशोधन अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

कृषी विकास ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र माळेगाव येथे 'रोटरी क्लब'च्यावतीने आयोजित 'ग्रीन गोल्ड' दोन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण शिबीराच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या शिबीरास पालघर, ठाणे, पुणे जिल्ह्यातील शेतकरी तसेच रोटरीच्या प्रकल्प संचालक मनीषा कोंडसकर, विभागीय व्यवस्थापक रश्मी कुलकर्णी, प्रतीक्षा माई, वृषाली खिरे, डॉ. संजीव जैन, डॉ. सुनीता जैन आदी उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, केंद्र व राज्य शासनाच्यावतीने शेतकरी कल्याणाच्या वीज देयकात माफी, महिलांना कृषी विषयक बाजारपेठेत स्थान मिळण्याकरीता लखपती दीदी योजना आदी योजना राबविण्यात येत आहे. त्याकरीता पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कृषी विभाग, ॲग्रोवन, कृषी विषयावर काम करणाऱ्या संघटनेच्यामार्फत या योजनांबाबत जनजागृती केली जात आहे. शासनाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी आठवडी बाजारामुळे शेतकरी ग्राहकाला थेट शेतमाल विक्री करता येते. शेतकरी आठवडी बाजारापेठेत पूर्व मागणी (प्री-आर्डर) घेण्याबाबत विचार करण्यात यावा.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कृषी विषयक कामाबाबत केंद्र सरकारच्यावतीने पुरस्कार प्रदान केला आहे. कृषी विषयक प्रकल्प, संशोधन, कृषी उद्योग तसेच बियाणे, खते, औषधामधील भेसळ आदीबाबत जनजागृती करण्याकरीता प्रशिक्षणार्थी आणि शेतकऱ्यांचे मंच, व्यासपीठ निर्माण झाले पाहिजेत, कृषी पर्यटन क्षेत्रातही काम करावे. पशु आरोग्य महत्त्वाचे असून याबाबत शेतकऱ्यांसाठी शास्त्रशुद्ध दृष्टीकोनाचे व्याख्यान आयोजित करावे. आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात यावी, कृषी वाचनालये स्थापन करण्याबाबत पुढाकार घ्यावा. या बाबींचा कृषी क्षेत्राला लाभ होण्यास मदत होईल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाही, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले.



# एक कोटी तीस लाख सी एस आर फंड मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर व ॲप्टीव्ह कंपोनेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून झित्राई मळा जिल्हा परिषद शाळेला तीन वर्ग खोल्या, तसेच टाकळकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला तीन वर्ग खोल्या बांधून देण्यात येणार आहेत. सदर २कामांसाठी रू .एक कोटी तीस लाख सी एस आर फंड मंजूर करण्यात आला आहे. या खोल्यांचा भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या हस्ते नुकताच पार पडला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने चाकण नगर परिषदेचे मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र गोरे यांनी संबोधित करताना या दोन्हीही शाळांना मंजूर केलेल्या खोल्यांना प्रत्येकी २० बेंचेस, संपूर्ण इलेक्ट्रिसिटी, फॅन, तसेच अत्याधुनिक पद्धतीचा शैक्षणिक कामासाठी उपयोगी पडणारा स्मार्ट टीव्ही संच देण्यात येणार आहे असे सांगितले.

ॲप्टीव्ह कंपनी चे प्लांट हेड रघु कौशिक यांनी शाळांच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी कंपनी वचनबद्ध राहील असे आश्वासन दिले. रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर चे अध्यक्ष श्री राजन जांभळे यांनी ॲप्टीव्ह कंपनीच्या शैक्षणिक कामाबद्दल व श्री राजेंद्र गोरे साहेब यांच्या प्रयत्नाने मिळालेल्या सीएसआर फंडा बद्दल दोघांचेही आभार मानले.





# बारामतीजवळच्या मोढवे गावात गुलीगत जल्लोष

## “मला घर बांधायचंय



“मला घर बांधायचंय त्यामुळे ही रक्कम मी घर बांधण्यासाठी वापरणार आहे. त्या घराला म्हणजेच घर बांधून झाल्यावर मी माझ्या घराला ‘बिग बॉस’चं नाव देणार आहे,”
सूरज चव्हाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वाचा ग्रँड फिनाले मोठ्या जल्लोषात पार पडला. बारामतीजवळच्या मोढवे गावातील रीलस्टार सूरज चव्हाण या पर्वाचा विजेता ठरला. सूरजने ७० दिवसांच्या प्रवासात इतर सर्व स्पर्धकांना मागे टाकत या शोची ट्रॉफी जिंकली.

सूरज चव्हाण ‘बिग बॉस मराठी ५’ जिंकल्यावर चाहते, सेलिब्रिटी आणि राजकीय नेतेमंडळी त्याचं अभिनंदन करत आहेत. सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार यांनी बारामतीच्या सूरजचे सोशल मीडिया पोस्टद्वारे कौतुक केले. उपमुख्यमंत्री अजित पवारांनीदेखील सूरज चव्हाण विजेता झाल्यावर पोस्ट केली आहे. यात त्यांनी सूरजच्या संघर्षाचा उल्लेख केला आहे. “आमच्या बारामतीचा सुपुत्र सूरज चव्हाण बिग बॉस मराठीचा विजेता ठरला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत सूरजनं हे यशोशिखर गाठलं आहे. सूरज आपल्या मेहनतीच्या आणि प्रतिभेच्या जोरावर महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचला.

## आमदार अतुल बेनके यांना उमेदवारी द्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** बेनके कुटुंब व पवार कुटुंब यांचे संबंध गेले अनेक वर्षाची असून जुन्नर चे आमदार अतुल बेनके यांना राष्ट्रवादी काँग्रेस हरिश्चंद्र पवार या पक्षात घेऊन जुन्नर विधानसभेचे उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी जुन्नर तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी शरद पवार यांच्याकडे पुणे येथे केली. या शिष्टमंडळामध्ये जुन्नर नगरपालिकेचे माजी नगरसेवक फिरोज पठाण यांनी केले.ते म्हणाले की, माजी आमदार स्व. वल्लभ बेनके कुटुंब व पवार कुटुंब यांचे कौटुंबिक संबंध गेले अनेक वर्षाचे राहिले आहेत. विद्यमान आमदार अतुल बेनके हे सुद्धा पवार कुटुंबासोबत आहेत. आमदार बेनके यांना आपल्या पक्षात घेऊन जुन्नर विधानसभेची उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## Selected



### जयश्री राजेंद्र सातव यांना राज्यस्तरीय जिजाऊ गौरव पुरस्कार

**वाघोली:** वाघोलीच्या माजी आदर्श सरपंच जयश्री राजेंद्र सातव पाटील यांना शंभू राज्याभिषेक ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय जिजाऊ गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.त्यामुळे वाघोली उपनगराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या एतिहासिक आग्रा सुटकेला ३५८ वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने शिवसन्मान सोहळ्याचे आयोजन पुणे येथील लाल महलात करण्यात आले होते.यामध्ये आजवर केलेल्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल शंभू राज्याभिषेक ट्रस्ट महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शेखर पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते. वाघोलीच्या सरपंच असताना जयश्री राजेंद्र सातव पाटील यांनी अनेक सार्वजनिक व लोकहिताची विकासकामे मार्गी लावत गावचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम केले आहे. तसेच समाजसेवेच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात लोकउपयोगी कामे केली आहेत. त्यांच्या कुटुंबाची ओळख एक दानशूर कुटुंब म्हणून जिल्ह्यात आहे. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांची मदत असते.



### व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्त दूत म्हणून सतीश राक्षे यांचा गौरव

**शिरोली :** खेड तालुक्यातील अनेक मधुमेह रुग्णांची औषधोपचारानंतर मधुमेहमुक्ती झाली. याची नोंद घेऊन समर्थ फाउंडेशन कोल्हापूर यांच्याकडून खेड पंचायत समितीचे माजी उपसभापती सतीश राक्षे यांना 'राज्यस्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्त दूत पुरस्कार' देऊन सत्कार करण्यात आला. कोल्हापूर येथील समर्थ सोशल फाउंडेशन जनरल हॉस्पिटल व न्यूट्रीफिल हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लि.यांच्या वतीने सतीश राक्षे यांना कोल्हापूरच्या सयाजी इंटरनॅशनल हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात प्रमाणपत्र,सन्मानचिन्ह,शाल व श्रीफळ आणि फेटा बांधून राक्षे यांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. यावेळी समर्थ सोशल फाउंडेशन,न्युट्रीफील हेल्थ प्रॉडक्ट्सचे अध्यक्ष सादिक शेख,संचालक सुहास पाटील,सागर देसाई, अस्लम शेख, विभागीय ऑफिसर सय्यद रफिक,शरीफ मुलाणी आदी उपस्थित होते. राक्षेवाडी गावच्या माजी सरपंच विद्या राक्षे,मुख्याध्यापक राजेश लाडके,काँग्रेस वाहतूक सेलचे तालुकाध्यक्ष बाबा पवळे हे हजर होते. व्यसनमुक्ती,मधुमेह मुक्ती,रोगमुक्ती सारखे भरीव कार्य केल्याने त्यांना पुरस्कार मिळाला.



### कान्हूर मेसाईची शेतकरी कन्या पोलीसदलात भरती

**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई (ता. शिरुर) येथील शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता पुंडे नुकतीच पोलीस दलात भरती झाली असल्याने ग्रामस्थांनी सदर शेतकरी कन्येची गावातून मिरवणूक काढून तिचा सन्मान केला आहे. प्राजक्ता फक्कड पुंडे हिने परिस्थितीची जाणीव ठेवत आपल्या आई वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करत आई वडिलांना शेतातील कामाला हातभार लावत बारावी पर्यंतचे शिक्षण गावातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्ण केला. पोलीस बनण्याचे ध्येय ठेवून श्रीनाथ करिअर ॲकॅडमी मध्ये तयारी केली. पोलीस दलात निवड झाली हे ऐकून तिच्या आई वडिलांना अत्यानंद झाला. ग्रामस्थांनी तिची गावातून मिरवणूक काढत गावातील मेसाई देवी मंदिरात विद्या विकास मंडळाचे संचालक विलास पुंडे, बबन शिंदे, समाजसेवक शहाजी दळवी, दिपक तळोले, बंडू पुंडे, वंदना पुंडे, रमेश खर्डे याच्या हस्ते प्राजक्ता सह तिचे वडील फक्कड पुंडे व आई मनिषा पुंडे यांचा सन्मान करण्यात केला.

## दौंड शहरात प्रवाशांना रात्रीच्या वेळेस रस्त्यात अडवून मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** दौंड शहरात प्रवाशांना रात्रीच्या वेळेस रस्त्यात अडवून मारहाण करून रोख रक्कम व मौल्यवान ऐवज लुटणाऱ्या आरोपींना दौंड पोलिसांनी काही तासातच बेड्या ठोकल्याने, त्यांचे कौतुक होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दौंड कॉर्ड लाईन येथे रात्री अडीचच्या सुमारास गोरखपुर पुणे ही गाडी आली. यातून आलेल्या सामु सदन निषाद (२३) हे मनोहर अली, हमसूद्दीन अली, नितीन सहानी यांच्यासह जात असता, त्यांना दुचाकीवरून आलेल्या चौघांनी गाडी आडवी लावून त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. मनोहर अलीचा मोबाईल व रोख दोनशे रुपये हे त्यांनी मारहाण करून काढून घेतले. तसेच त्याचा साथीदार नितीन साहनी यांच्या गळ्यातील चांदीची चेन रोख ७०० रुपये, घड्याळ असे काढून घेतले व फिर्यादीकडे पैसे नसल्याने तो म्हणाला माझ्याकडे पैसे नाहीत तर एका आरोपीने त्याच्या कपाळावर दगडाने मारहाण केली.

एवढ्यात दौंड पोलीस स्टेशनचे हवालदार बापू रोटे यांची नजर या चौघाकडे गेली. त्यांनी विचारपूस केली असता, चार जणांनी मारहाण करून लुबाडल्याचे सांगितले. पोलीस हवालदार बापू रोटे यांनी आपल्या चार-पाच सहकारी बोलून घेतले व आजूबाजूच्या परिसरात पाहणी करून, चारही आरोपी सिद्धार्थ सुरेश थोरात, ओमकार तुकाराम कांबळे, बबल्या कांबळे, अनिकेत लबडे पकडले. त्यांच्या या कामगिरीचे दौंड शहरातून कौतुक होत आहे. यापूर्वीही अशा घटना शहरात घडल्या आहेत.

### शिंदे गटाच्या नेत्याचे महायुतीतील 'महाभारता'चे संकेत

# महायुतीची पहिली यादी दसऱ्याला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा आता आठवड्याभरात होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागा वाटपची चर्चा सुरू आहे. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांसह महायुतीमधील छोट्या पक्षांनाही स्थान देण्यात येणार आहे. महायुतीमधील पक्षांनी जिंकलेल्या जागा अपवाद वगळता त्यांच्याकडे ठेवण्यात येणार आहेत. महायुतीमधील तिन्ही पक्षांची उमेदवार यादी एकत्रित जाहीर करण्यात येणार आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर महायुतीची पहिली यादी जाहीर होणार आहे. दरम्यान, शिंदे गटाच्या नेत्याने जागावाटपावरून महायुतीत 'महाभारत' होण्याचे संकेत दिले आहेत.

दसऱ्याच्या दिवशी जाहीर होणाऱ्या या यादीत तिन्ही पक्षाच्या जास्तीत जास्त उमेदवारांचा समावेश करण्यात येणार आहे. ज्या जागांवर वाद आहेत, तेथील उमेदवार नंतर जाहीर करण्यात येणार आहे. लोकसभेसारखी परिस्थिती होऊ नये, म्हणून महायुतीने विधानसभेसाठी जोरदार तयारी केली आहे. अनेक जागांवर उमेदवारांची नावेसुद्धा निश्चित झाली आहेत. लोकसभेत उमेदवारी जाहीर होण्यास उशीर झाल्यामुळे काही जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा पराभव झाला. ऐनवेळेस उमेदवारी जाहीर झाल्यामुळे प्रचारास वेळ मिळाला नाही. तोपर्यंत विरोधी उमेदवाराचे प्रचाराचे दोन, तीन टप्पे पूर्ण झाले होते. या पार्श्वभूमीवर आता काळजी घेण्यात आली आहे.

दिल्लीत गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची केमिस्ट्री जुळून आली. दिल्लीत नक्षलीग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक होती. या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खुर्ची अमित शहा यांच्या खुर्चीजवळ होती. शाह यांच्या एका बाजूला शिंदे, तर दुसऱ्या बाजूला जे. पी. नड्डा यांची खुर्ची होती. यापूर्वीही अनेक वेळा शाह आणि शिंदे यांची केमिस्ट्री राजकीय वर्तुळात चर्चेची ठरलेली होती. नक्षलग्रस्त राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या बैठकीनंतर फोटोसेशन करण्यात आले.

विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली असताना सत्ताधारी महायुतीत जागावाटपाच्या मुद्यावरून महाभारत रंगण्याची चिन्हे आहेत.

**शाह-शिंदे यांची दिल्लीत चर्चा**

● महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शाह आणि शिंदे यांची बैठक झाली. नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीनंतर दोन्ही नेत्यांची बैठक झाली. राजधानी दिल्लीतल्या विज्ञान भवनात दोन्ही नेत्यांमध्ये बैठक झाली. त्यावर जागा वाटपावर चर्चा झाली असल्याची शक्यता आहे.

## » Selected

### फडणवीसांच्या ताफ्यातील वाहनाला अपघात



**नागपूर :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने आज नागपुरात होते. हे कार्यक्रम आटोपल्यानंतर ते दुपारी सोलापूरच्या दिशेने रवाना झाले. दरम्यान, उपमुख्यमंत्र्यांचा ताफा रवाना झाल्यानंतर याच ताफ्यातील पोलिसांचे एक वाहन उलटल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही. सोमवारी सकाळी ९.३० वाजता आरोग्य आपल्या दारी फिरता डिजिटल दवाखाना लोकार्पण सोहळा, यानंतर अवादाच्या सुपर फॅक्टरीचे भूमिपूजन, एमआयडीसी, बुटीबोरी, पर्नॉड रिकार्डच्या प्रकल्पाचे भूमिपूजन, एमआयडीसीत आटोपल्यानंतर दुपारी ३ वाजता विविध विकासकामांचे लोकार्पण/भूमिपूजन, मंगळवेढा, सोलापूर येथे असल्याने उपुख्यमंत्री फडणवीस रवाना झाले. याचवेळी ही अपघाताची घटना घडली.

### मुंबईत भूमिगत मेट्रो सुरू



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेतील आरे ते बीकेसी टप्प्याचे लोकार्पण शनिवारी झाले. कुलाबा ते आरे मेट्रो ३ मार्गिकेचा पहिल्या टप्प्यातील १२.६९ किलोमीटर लांबी हा मार्ग आहे. आजपासून म्हणजेच सात ऑक्टोबरपासून हा टप्पा प्रवाशांसाठी खुला झाला आहे. सकाळी ११ वाजता बीकेसी मेट्रो स्थानक आणि आरे जेव्हीएलआर मेट्रो स्थानकावरून पहिली भुयारी मेट्रो गाडी सुटली आहे. मेट्रो ३ मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यामुळे रस्त्यावरील कोंडीतून या प्रवाशांची सुटका होण्याची शक्यता आहे. तसेच प्रवाशांच्या वेळीचीही बचत होणार आहे. आरे-बीकेसी अंतर आता भुयारी मेट्रोमुळे केवळ २२ मिनिटांत पार करता येणार आहे.

### बुद्ध लेण्यांच्या पायथ्याच्या विहार आणि विपश्यना केंद्राला नोटीस

# बौद्ध भिख्खू, उपासकांचा मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या बुद्धलेणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार आणि विपश्यना केंद्राला अतिक्रमित असल्याचे सांगत नोटीस देण्यात आल्याने भिक्खू संघ, उपासक आणि आंबेडकरी समुदाय आक्रमक झाला. शहरातील क्रांती चौक ते विभागीय आयुक्तालयापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शहरातील शाळांना सुट्टी देण्यात आली होती. विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांनाही आज सुट्टी जाहीर करण्यात आली होती. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. छत्रपती संभाजीनगरच्या बुद्धलेणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार आणि विपश्यना केंद्र हे अतिक्रमित असल्याचे सांगत महानगरपालिकेने नोटिस बजावली होती. हे स्थळ तमाम बौद्ध अनुयायी आणि आंबेडकरी समुदायासाठी पवित्र स्थान आहे. महापालिकेच्या कारवाईचा विरोध दर्शवण्यासाठी आज हजारोंच्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले होते.

हा लढा केवळ एका कारवाई विरोधातील नाही, तर आमच्या अस्तित्वाचा असल्याचे सांगत आज मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला होता.



छत्रपती संभाजीनगर: बुद्धलेणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार आणि विपश्यना केंद्राला नोटीस बजावल्याच्या निषेधार्थ भव्य मोर्चा काढण्यात आला.

### नागपूर रेल्वे स्थानकावर मनोरुग्णाचा चौघांवर जीवघेणा हल्ला


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूरमधून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. याठिकाणी रेल्वे स्थानकावर हत्येचा थरार पाहायला मिळाला. एका व्यक्तीने चार जणांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या दोघांचा मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. नागपूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म नंबर सातवर ही धक्कादायक घटना घडली.नागपूर लोहमार्ग पोलिस याप्रकरणाचा तपास करत आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, "नागपूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म नंबर सातवर एका मनोरुग्ण व्यक्तीने चौघांवर हल्ला केला. आरोपी मनोरुग्ण या चौघांनाही मारत सुटला होता.

### विष्णुदास भावे गौरवपदक पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मानाचा समजला जाणारा नाट्य क्षेत्रातील विष्णुदास भावे गौरवपदक २०२४ श्रीमती सुहास उर्फ सुहासिनी जोशी यांना जाहीर झाला. सुहास जोशी यांचे मराठी चित्रपट, दूरदर्शन, नाट्य क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री, नाट्य प्रशिक्षिका अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. यंदा दिले जाणारे हे ५७वे भावे गौरव पदक आहे. गौरवपदक, रोख रक्कम २५ हजार, स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ असे गौरवपदकाचे स्वरूप आहे. ५ नोव्हेंबर रोजी रंगभूमीदिनी हा पुरस्कार जब्बार पटेल यांच्या हस्ते वितरण होणार आहे.

# तुळजापूरदर्शन करून परतताना अपघात; दोघांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** नवरात्रोत्सवानिमित्त तुळजापुरात तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन गावी परत जाताना तरुण भाविकांच्या मोटारीला अपघात होऊन त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य तिघेजण जखमी झाले. सोलापूर-कोल्हापूर महामार्गावर सांगोला तालुक्यातील चिंचोली बाह्यवळणावर पहाटे हा अपघात झाला. यातील मृत व जखमी सर्वजण कोल्हापूर जिल्ह्यातील राहणारे आहेत.

सुखदेव बामणे (वय ४०) आणि नैनेश कोरे (वय ३१, दोघे रा. नांदणी, जि. कोल्हापूर) अशी दोघा मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये सुरज विभूते (रा. कुठली, जि. कोल्हापूर), शिवानंद कोरे (वय ३५, रा. वडगाव, जि. कोल्हापूर) आणि सुधीर चौगुले (वय ३५, रा. नांदणी) यांचा समावेश आहे. जखमींना वैद्यकीय उपचारासाठी सांगोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या जोराच्या अपघातात सुखदेव बामणे आणि नैनेश कोरे हे दोघे मृत मोटारीतून बाहेर फेकले गेले. हे सर्वजण नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून रविवारी रात्री कोल्हापूरहून तुळजापुरला तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी गेले होते.

### खोटी याचिकाकर्त्याचे ठाकरेंना दोन लाख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शिवसेना पक्षप्रमुख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बंजारा समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याची याचिका करणाऱ्या मोहन चव्हाण यांना उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दोन लाख रुपयांचा दंड ठोठावला. बंजारा समाजाच्या महंतांनी ठाकरे यांना प्रसाद आणि विभूती दिली. ठाकरे यांनी प्रसाद आणि विभूती स्वीकारल्यानंतर ती शेजारी उभ्या असलेल्या व्यक्तीकडे दिली. त्यामुळे आपल्या धार्मिक भावना दुखावल्याची तक्रार नांदेडमधील डॉ. मोहन चव्हाण याचिकेद्वारे केली होती. या सुनावणीवेळी औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती एस.जी. मेहरे यांनी निरीक्षण नोंदवत याचिकाकर्त्यांची कानउघडणी केली. या प्रकरणी ठाकरे यांना मातोश्रीवर जाऊन दोन लाख रुपये द्यावेत, किंवा ड्राफ्टद्वारे द्यावेत, असे आदेशही दिले होते. त्यामुळे चव्हाण यांनी अखेर पोस्टाद्वारे डीडी पाठवला आहे.

# मी तरुणपणी नक्षलवादी चळवळीत होतो- गडकरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** कोणाचाही मुलाहिजा न बाळगता रोखठोक बोलण्यासाठी प्रसिद्ध असलेले भाजपचे नेते नितीन गडकरी हे कायमच चर्चेत असतात. आतादेखील ते अशाच एका वक्तव्यामुळे चर्चेत आले आहेत. राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार असताना सरकारी अधिकारी काम करत नव्हते. त्यावेळी आपण अधिकाऱ्यांना काम करुन घेण्यासाठी धमकावले होते. मी पूर्वी नक्षलवादी चळवळीत होतो, आता पुन्हा मी चळवळीत गेलो तर तुम्हाला गोळ्या घालेन, असा सज्जड दम आपण सरकारी अधिकाऱ्यांना भरल्याचा किस्सा नितीन गडकरी यांनी सांगितला. ते रविवारी नागपूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी नितीन गडकरी यांनी मनोहर जोशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानाचा एक किस्सा उपस्थितांना सांगितला. त्यांनी म्हटले की, त्यावेळी डॉ. अलेक्झांडर महाराष्ट्राचे राज्यपाल होते. त्यावेळी मी राजदूत दुचाकीवरुन मेळघाटातील गावांमध्ये फिरलो. तेथील रस्त्यांची परिस्थिती खराब होती. तरीही वनखात्याचे अधिकारी रस्ते बांधायचे काम करुन देत नव्हते. याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सुनावले. एवढी लहान मुलं कुपोषणाने मरत आहेत, तुम्हाला काही वाटत कसे नाही? तुम्ही रस्ते बांधायला परवानगी का देत नाही?, असे मनोहर जोशींनी वनखात्याच्या अधिकाऱ्यांना विचारले. त्यानंतर मी मनोहर जोशी यांना म्हटले की, तुम्ही हा विषय माझ्यावर सोडा, मी बघतो काय करायचंय ते. त्यावेळी मी वनखात्याच्या अधिकाऱ्यांना सांगितलं की, मी तरुणपणी नक्षलवादी चळवळीत होतो. मी चुकून राजकारणात आलो. परंतु, आता मी पुन्हा नक्षलवादी चळवळीत गेलो तर तुम्हाला गोळ्यांनी फुंकल्याशिवाय राहणार नाही. त्यानंतर मी वनखात्याच्या अधिकाऱ्यांसोबत जे जे केलंय, ते इकडे सांगू शकणार नाही. या सगळ्यानंतर मेळघाटातील रस्त्यांचे काम पूर्ण झाले, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

सरकारी प्रक्रियेत एखाद्याला अधिकाऱ्याला शिक्षा करायची असली की ते फार कठीण काम आहे. कारण एखाद्याने ती फाईल दाबून धरली ती फाईल वर जात नाही, असे नितीन गडकरी यांनी म्हटले. यावेळी त्यांनी सरकारची व्याख्याही सांगितले.

## आजी-माजी खासदारांत जुंपली

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» **तासगाव :** नगरपालिकेच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमात खासदार विशाल पाटील आणि माजी खासदार संजय पाटील यांच्यात थेट वादावादी झाली. या वादावादीचे पर्यवसान कार्यकर्ते अंगावर धावून जाण्यात झाले. या घटनेचे जोरदार पडसाद उमटले आहेत.

### ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्याचे आदेश

# सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिनांक १ ऑक्टोबरपासून सुरु केलेल्या २९ हजार ४२९ सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहिर केला. त्यामध्ये राज्य सरकारने सोमवारी (दि.७) सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका ज्या टप्प्यावर असतील, त्या टप्प्यावर स्थगित करुन ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्याचे आदेश जारी केले आहेत. म्हणजेच सहकारी संस्थांच्या निवडणुका तीन महिने लांबणीवर पडल्या आहेत.

प्रलंबित असलेल्या सहकारी संस्थांपैकी ७ हजार १०९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु झाली होती. मात्र, राज्यातील २५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच ज्या प्रकरणी सर्वोच्च व उच्च न्यायालयाने सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याचे आदेशीत केले आहे, अशा सहकारी संस्था तसेच निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केवळ संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड बाकी आहे, अशा सहकारी संस्था वगळून अन्य सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्याचेही आदेशात नमूद केले आहे.

आदेशात असेही नमूद केले आहे की, विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने विधानसभा निवडणुक पुर्वतयारीसाठी तसेच प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सहकार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची सेवा अधिग्रहित केल्यास सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडण्यात अडचणी येणार आहेत. त्यामुळेही राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलणे उचित होईल, अशी शासनाची धारणा झाल्याने निवडणुका पुढे ढकलण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

### शिक्षण-विभागाकडून शाळांची कानउघाडणी

# विद्यार्थ्यांची ऑनलाईन हजेरी १०० टक्के नोंदवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन पद्धतीने हजेरी नोंदवण्याच्या उपक्रमाला गेल्यावर्षी सुरूवात झाली. परंतु सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून नियमित आढावा न घेतल्याने शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याकडून ऑनलाईन हजेरी नोंदविण्याच्या उपक्रमाची नियमित अंमलबजावणी होत नसल्याचे उघडकीस आले आहे.

राज्याच्या अनेक जिल्ह्यांमधील विविध प्रकारच्या शाळांमधील शिक्षक विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाईन नोंदवित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात शिक्षण विभागाकडून शिक्षकांना वारंवार सूचनावजा आदेश देण्यात येतात. परंतु या आदेशाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. याकडे पुन्हा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परीषदेकडून लक्ष वेधले आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून नियमित आढावा घेऊन सर्व शाळांमध्ये १०० टक्के विद्यार्थी उपस्थिती ऑनलाईन नोंदविली जाईल याची खात्री करावी, असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परीषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या समग्र शिक्षा अंतर्गत विद्या समीक्षा केंद्राद्वारे पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन हजेरी नोंदविण्याच्या उपक्रमाला १ डिसेंबर २०२३ पासून सुरूवात झाली. या उपक्रमात जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसोबतच, अनुदानित शाळांना ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी नोंदवायची आहे. त्यानुसार शाळांमधील शिक्षकांनी विद्या समिक्षा केंद्राच्या स्विफ्टचॅट या ॲप्लिकेशनमधील बॉटव्दारे विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाईन पद्धतीने नोंदविणे गरजेचे आहे. या प्रयोगामुळे वर्गात प्रत्यक्षात किती विद्यार्थी उपस्थित असतात, याची माहिती उपलब्ध होणार आहे. शिवाय, या उपक्रमामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रातील माहिती संकलन आणि विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ करण्यात येणार आहे.

#रा

# ४१ कोटी लोकांनी पाहिली रामलीला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अयोध्या :** नवरात्र उत्सवात ठिकठिकाणी रामलीलाचे कार्यक्रम होत असतात. अयोध्येतील रामलीला देशात नाही तर विदेशातही प्रसिद्ध आहे. देश-विदेशातील रामभक्तांना ही रामगाथा आकर्षित करत असते. रामलीला दूरदर्शनसोबत ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर लाईव्ह प्रसारित करण्यात आली. त्याला दर्शकांचा मोठ्या प्रमाणावर पडसाद मिळाला. तीन दिवसांत ४१ कोटी लोकांनी ही रामलीला देश-विदेशात पाहिली. ४० देशांतील २६ भाषांमध्ये तिचे प्रसारण झाले आहे. 'फिल्मी रामलीला समिती'चे अध्यक्ष सुभाष मलिक यांनी सांगितले, की अयोध्येत फिल्मी कलाकारांची रामलीला २०२० मध्ये सुरू झाली. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर या रामलीलास प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी ऑनलाईन रामलीला पाहणाऱ्या प्रेक्षकांची संख्या वाढत आहे. मागील वर्षी ४० कोटी लोकांनी रामलीला पाहिली. तो विक्रम यंदा मोडण्यात आला. यंदा ४१ कोटी लोकांनी ही रामलीला देश-विदेशात पाहिली. दूरदर्शनवर आतापर्यंत २२ कोटी तर यू ट्यूबवर १७ कोटी आणि इतर प्लॅटफॉर्मवर दोन कोटी लोकांनी रामलीला पाहिली.

रामलीलाचे निर्देशक शुभम मलिक यांनी सांगितले, की रामलीलाचे २६ भाषांमध्ये लाईव्ह प्रसारण होते. दूरदर्शन-यूट्यूबसह अन्य 'सोशल प्लेटफॉर्म'वर रामलिला दाखवली जाते. रामभक्त घरी बसून भगवान रामची गाथा पाहतात. रामलीला अमेरिका, ऑस्ट्रेलिया, थायलँड, त्रिनिडाड, श्रीलंका, मलेशिया, फिजी, रूस, दक्षिण कोरियासह जगातील ४० देशांमध्ये दाखवली जाते.



### रामलीलातील कलाकार

● रामलीलामध्ये अभिनेता बिंदु दारा सिंह, मनीष पाल, अवतार गिल, रजा मुराद, राकेश बेदी, वेद सागर, अनिमेष मिढ़ा, विनय सिंह हे कलाकार वेगवेगळी भूमिका साकारत आहे. तसेच प्रसिद्ध अभिनेत्री भाग्यश्री, शीबा, ऋतु शिवपुरी, अमिता नागिया, मैडोना, पायल गोगा कपूर यांच्याही भूमिका आहेत. मालिनी अवस्थी शबरीच्या भूमिकेत आहे.

### अशी वाढली प्रेक्षक संख्या

२०२०- १६ कोटी, २०२१- २२ कोटी २०२२- २५ कोटी,
२०२३- ४० कोटी, २०२४- ४१ कोटी.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# शेअर बाजारातील घसरण कायम

**अर्थकारण**

**आणखी एका** अत्यंत अस्थिर सत्रात भारतीय निर्देशांक घसरणीसह बंद झाले आणि माहिती तंत्रज्ञानाचा अपवाद वगळता सर्वच



क्षेत्रांतील विक्रीमुळे सलग सहाव्या सत्रात घसरण कायम राहिली. मध्यपूर्वेतील संघर्ष वाढण्याच्या चिंतेचा परिणाम गुंतवणूकदारांच्या भावनांवर झालेला दिसून आला. निर्देशांक ६३८.४५ अंकांनी घसरून ८१,०५० वर, तर निफ्टी २१८.८० अंकांनी घसरून २४,७९५.८० वर बंद झाला. सकारात्मक जागतिक संकेतांमुळे बाजार तेजीसह उघडला, परंतु सुरुवातीच्या काही तासांतील सर्व तेजी पुसून टाकली आणि संपूर्ण सत्रात नफा-तोटा यांच्यात अडकून दिवसाच्या नीचांकी पातळीवर बंद झाला. आजच्या घसरणीत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ८.९९ लाख कोटी रुपयांची घट झाली असून, बीएसईमध्ये सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४५२.२७ लाख कोटी रुपयांवर आले. निफ्टीमध्ये एनटीपीसी, अदानी पोर्ट्स, अदानी एंटरप्रायझेस, एसबीआय, कोल इंडिया यांचे समभाग घसरले, तर आयटीसी, भारती एअरटेल, ट्रेंट, महिंद्रा अँड महिंद्रा आणि इन्फोसिसचे समभाग वधारले. आयटी निर्देशांक (०.६ टक्के) वगळता इतर सर्व क्षेत्र निर्देशांक घसरणीत बंद झाले असून, पीएसयू बँक, हेल्थकेअर, कॅपिटल गुड्स, रियल्टी, मेटल, पॉवर, ऑइल अँड गॅस, मीडिया आणि टेलिकॉम १ ते ३ टक्क्यांनी घसरले. बीएसईमिडकॅप निर्देशांक २ टक्के तर स्मॉलकॅप निर्देशांक ३ टक्क्यांनी घसरला. व्होडाफोन आयडिया, झी एंटरटेनमेंट एंटरप्रायजेस, आयडीएफसी फर्स्ट बँक, आरबीएल बँक, गुजरात अंबुजा एक्सपोर्ट्स, इझी ट्रिप प्लॅनर्स सह १३० समभागांनी ५२ आठवड्यांच्या नीचांकी पातळी गाठली.

**» Selected**

## आता वीज मीटरही जोडणार आधार कार्डाशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिमला :** आता रेशनकार्डसोबतच वीज मीटरही आधार क्रमांकाशी लिंक होणार आहे. वीज मंडळ व्यवस्थापन घरांमध्ये बसवलेल्या मीटरचे ई-केवायसी करणार आहे. त्यासाठी कर्मचारी घरोघरी जाऊन काम करतील. हिमाचल प्रदेशातील चारही झोनचे मुख्य अभियंता, ऑपरेशन सर्कल, सीई इलेक्ट्रिक उपविभाग आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. ई-केवायसी प्रक्रिया विद्युत मंडळाच्या मोबाईल ॲपद्वारे केली जाईल. सुरुवातीच्या टप्प्यात घरगुती ग्राहक आणि हॉटेल मालकांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यामुळे वीज मंडळाला किती मीटर बसवले आहेत आणि प्रत्येक मीटर कोण वापरत आहे हे कळू शकेल. घरमालक आणि भाडेकरूंच्या मीटरचीही वेगळी ओळख असेल. या सर्वेक्षणांतर्गत सरकारकडून ग्राहकांना ३०० युनिट मोफत वीज दिली जाणार आहे.

## लालू कुटुंबियांचा जामीन मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू यादव यांना मोठा दिलासा मिळाला आहे. लालू यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांना राऊस ॲव्हेन्यू कोर्टातून एक लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मिळाला आहे. या प्रकरणात लालू यादव आणि तेजस्वी यादव यापूर्वीच हजर झाले होते; पण तेज प्रताप यादव पहिल्यांदाच दिसले. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दोन महिन्यांपूर्वी ६ ऑगस्ट रोजी ११ आरोपींविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले होते.

पाकिस्तानमध्ये चीनी नागरिक लक्ष्य

# कराची आंतरराष्ट्रीय विमानतळावर बॉंबस्फोट; दोन ठार, ११ जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कराची :** कराची येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ रविवारी मध्यरात्री भीषण बॉम्बस्फोट झाला. त्यात दोघांचा मृत्यू झाला असून, ११ जण गंभीर जखमी झाले. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, बॉम्बस्फोटामुळे आगीचे लोळ दूरपर्यंत दिसत होते. कराचीच्या उत्तर भागातील नाजिमाबाद, द्वितीय चुंदरीगर रोड व करिमाबाद या भागापर्यंत स्फोटाचे आवाज गेले. हा भाग भूकंपासारखा हादरला.



सिंध प्रांताचे गृहमंत्र्यांनी सांगितले, की विदेशी नागरिकांच्या वाहनांवर हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हा स्फोट आयईडी बॉम्बचा असावा, असा संशय आहे. दरम्यान, मृतांमध्ये चीनमधून आलेल्या दोन नागरिकांचा समावेश असल्याची पुष्टी रात्री उशिरा झाली. पाकिस्तानात बंदी घालण्यात आलेल्या बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

चीनमधून आलेले इंजिनिअर व गुंतवणूकदार यांच्या वाहन ताफ्यावर बॉम्बस्फोट केल्याचे त्यांनी 'सोशल मीडिया'वरून जाहीर केले आहे. या वाहनांतील ११ जखमींना जिन्हा मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली आहे.

## 'आप'च्या खासदारा घरी 'ईडी'चे छापे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** 'आम आदमी पक्षा'चे राज्यसभा सदस्य संजीव अरोरा आणि इतरांविरुद्ध जमीन 'फसवणूक' प्रकरणाच्या संदर्भात अंमलबजावणी संचालनालयाने सोमवारी जालंधर, लुधियाना, गुरुग्राम आणि दिल्ली येथे अनेक ठिकाणी छापे टाकले. खासदाराच्या घरासह लुधियाना, पंजाब आणि गुरुग्राममध्ये जवळपास १६-१७ ठिकाणी छापे टाकण्यात आले. रिअल इस्टेट व्यावसायिक हेमंत सूद आणि चंद्रशेखर अग्रवाल यांच्या जालंधरमधील घरी आणि अन्य ठिकाणी छापे टाकण्यात आले.

भाजपच्या खासदारांनीच घेतला आक्षेप

# राष्ट्रपतींच्या दौऱ्यावरून वाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जयपूर :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या राजस्थान दौऱ्यावरून वाद सुरू झाला आहे. राजसमंद येथील भाजप खासदार महिमा कुमारी आणि त्यांचे पती नाथद्वाराचे भाजप आमदार विश्वराज सिंह मेवाड यांनी राष्ट्रपतींच्या भेटीवर आक्षेप घेतला आहे.



उदयपूर येथे राष्ट्रपतींनी भेट दिली. तिथल्या समारंभाला हजेरी लावली; परंतु राष्ट्रपती जिथे गेल्या, त्या मालमत्तेचा वाद न्यायप्रविष्ट आहे. विश्वराज म्हणाले, की जेव्हा त्यांना आणि त्यांच्या पत्नीला सिटी पॅलेसमध्ये राष्ट्रपतींच्या भेटीची माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहिले. सिटी पॅलेस ही आमची कौटुंबिक मालमत्ता असून त्यावर न्यायालयाची स्थगिती आहे, असे आम्ही पत्रात नमूद केले आहे. मालमत्तेच्या काही भागासाठी सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिकाही प्रलंबित आहे. ही मालमत्ता कर विभाग आणि जिल्हा न्यायालयाने हिंदू अविभक्त कुटुंब म्हणून घोषित केली आहे. हे प्रकरण उच्च न्यायालयातही प्रलंबित आहे.

खासदार आणि आमदारांनी मुर्मू यांना कार्यक्रम रद्द करण्याची विनंती केली होती; परंतु तरीही त्यांनी कार्यक्रम घेतला. खासदार महिमा कुमार म्हणाल्या, की मुर्मू यांच्या भेटीची माहिती मिळताच त्यांनी राष्ट्रपतींचे सचिव, विशेष कर्तव्य अधिकारी आणि त्यांच्या उदयपूर कार्यक्रमाचे प्रभारी यांना या संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. राष्ट्रपतींची ही वैयक्तिक भेट असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

## लँड फॉर जॉब' प्रकरणी लालू यादव आणि मुलांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बिहार :** राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) प्रमुख लालू प्रसाद, त्यांची मुले तेजस्वी यादव आणि तेज प्रताप यादव यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने सोमवारी मनी लॉंड्रिंग प्रकरणात त्यांना जामीन मंजूर केला. यादव रेल्वेमंत्री असताना रेल्वेच्या विविध विभागांमध्ये अपात्र उमेदवारांना नोकऱ्या देण्याच्या मोबदल्यात त्यांच्या कुटुंबीयांनी कथितरित्या जमिनी मिळवल्याचा आरोप आहे.

सोमवारी सकाळी लालू प्रसाद यादव त्यांच्या दोन्ही मुले, सोबतच खासदार मुलगी भारती यांच्यासह कोर्टात दाखल झाले होते. सीबीआयच्या प्रकरणा लालू, राबडी देवी आणि मीसा भारती यांना मागच्या वर्षी जामीन मिळाला होता.

दिल्लीतील राउज एव्हेन्यू कोर्टाने लालू आणि त्यांच्या मुलांना एक-एक लाख रुपयांच्या बॉन्ड वर जामीन दिला आहे. सीबीआय कोर्टाने ऑक्टोबर २०२३ मध्ये लालू, राबडी देवी आणि मीसा यांना ५०-५० हजार रुपयांच्या बॉन्डवर जामीन दिला होता.

# सरकार टोमॅटो विकणार ६५ रुपये किलो दरात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. बटाटे, टोमॅटोसह सर्वच भाज्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. वाढत्या किमतींपासून ग्राहकांना दिलासा देण्यासाठी, ग्राहक व्यवहार मंत्रालयाने किरकोळ बाजारात स्थिरता आणण्यासाठी 'एनसीसीएफ' द्वारे बाजार हस्तक्षेप सुरू केला आहे. ग्राहक मंत्रालयाने टोमॅटोचे दर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्यांना दिलासा देत ग्राहक मंत्रालयाने टोमॅटो स्वस्त दरात विकण्याची तयारी केली आहे. सरकारी आऊटलेटस्वर टोमॅटो ६५ रुपये किलोने मिळतील.

केंद्र सरकार स्वस्त दरात टोमॅटोची विक्री सुरू करणार आहे. टोमॅटोचे दर ११० रुपये किलोवर पोहोचल्याने सरकारने टोमॅटो ६५ रुपये किलोने विकण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम दिल्ली-एनसीआर आणि नंतर संपूर्ण देशात स्वस्त दरात पाठवले जातील. टोमॅटो व्यतिरिक्त डाळी, मैदा, कांदा, टोमॅटो स्वस्त दरात देण्यासाठी सरकार वेळोवेळी निर्णय घेत असते. टोमॅटोच्या गगनाला भिडलेल्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या काही आठवड्यांत टोमॅटोच्या दरात झपाट्याने वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सरकारला आशा आहे, की या पावलामुळे किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

## योगींचा मास्टर स्ट्रोक...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**लखनऊ:** उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लखनऊमधील एकना स्टेडियमवर ३६ व्या अखिल भारतीय वकील क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना फलंदाजी केली. त्यांनी खेळातील सांघिक भावना आणि विजय-पराजयाचे महत्त्व सांगितले.

भाजपची मदार पुन्हा 'माधव'वर

# विधानसभा जिंकण्यासाठी ओबीसींना सोबत घेण्याची रणनीती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी जातीय समीकरणे सोडवण्याचे प्रयत्न जोरात सुरू झाले आहेत. भारतीय जनता पक्षही आपल्या पातळीवर मतदारांना आकर्षित करण्यात गुंतला आहे. कांद्याच्या निर्यात मूल्यात कपात करणे, बंजारा हेरिटेज संग्रहालयाचे उद्घाटन करणे आदींतून भाजप शेतकरी, बंजारा, ओबीसी अशा विविध घटकांना आपलेसे करीत आहे. राज्यातील सत्ताधारी महायुतीतील भाजप आता 'माधव फॉर्म्युला'ही अजमावत आहे. तो तीन ओबीसी जातींचा समुदाय आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मराठवाड्यात भाजपचे खातेही उघडले नव्हते, तर पश्चिम महाराष्ट्रात हा पक्ष केवळ दोन जागा जिंकू शकला. अशा परिस्थितीत भाजप पुन्हा एकदा माळी, धनगर आणि वंजारी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आपल्या जुन्या आणि प्रभावी 'माधव' सूत्रावर भर देत आहे. या तिन्ही जाती ओबीसी अंतर्गत येतात. तसेच महाराष्ट्राच्या निवडणुकांमध्ये या जात समूहाने नेहमीच निर्णायक भूमिका बजावली आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांना 'माधव' म्हणजेच माळी, धनगर आणि वंजारा मतदारांना आकर्षित करायचे आहे.

भाजप नेत्यांचे मत आहे, की या जातींमधील भाजपची पकड कमकुवत झाली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीबाबत राज्य सरकारच्या अनिश्चित वृत्तीचा परिणाम झाला आहे. ओबीसी मतदार भाजपपासून दूर जात असल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले, की विधानसभा निवडणुकीत पक्षाला आपली कामगिरी सुधारायची आहे. त्यासाठी तिकीट वाटपात या तिन्ही जातींच्या नेत्यांना प्राधान्य देता येईल. आम्हाला आशा आहे, की यामुळे ओबीसी मतदारांमध्ये आमची पकड मजबूत होईल.



### उच्च वर्णीयांनाही बरोबर घेण्याचा प्रयत्न

● राज्य सरकारने ब्राह्मण आणि राजपूत समाजाच्या आर्थिक विकासासाठी दोन महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून उच्चवर्णीयांमध्ये आपले अस्तित्व बळकट करण्याचा प्रयत्न आहे.

# यती नरसिंहानंदांच्या विधानावरून भाजप नेत्याचीही नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील दसना देवी मंदिराचे पुजारी यती नरसिंहानंद यांच्या वक्तव्यावरून वाद सुरूच आहे. आता भारतीय जनता पक्षाचे नेते नाराजी व्यक्त करत आहेत. नरसिंहानंद यांना 'शांतीचे शत्रू' म्हटले आहे. या संदर्भात जम्मू-काश्मीरच्या मुत्ताहिदा मजलिस-ए-उलेमाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे.



'एमएमयू'ने प्रेषित मोहम्मद यांच्यावरील टिप्पणीबद्दल शाह यांना पत्र लिहिले आहे. नरसिंहानंद यांच्या प्रक्षोभक वक्तृत्वामुळे मुस्लिमांमध्ये भावनिक संकट निर्माण झाल्याचे सांगण्यात आले आहे. शिवाय यामुळे मोठ्या प्रमाणावर अशांतता निर्माण होण्याची भीतीही निर्माण झाली आहे. 'एमएमयू' म्हणते, की कोणत्याही लोकशाही समाजात भाषण स्वातंत्र्य आहे; परंतु ते द्वेष पसरवण्यास आणि धार्मिक भावना दुखावण्याचा परवाना देत नाही. 'यती नरसिंहानंद यांच्या द्वेषपूर्ण भाषणामुळे आम्ही भारत सरकारकडे योग्य कायदेशीर कारवाईची मागणी करतो' असे या पत्रात म्हटले आहे. या प्रकरणी तात्काळ आणि कठोर कारवाई केल्यास द्वेषयुक्त भाषण आणि हिंसाचाराला या समाजात स्थान नाही, असा एक मजबूत संदेश जाईल. हे मुस्लिम समुदायालादेखील आश्वासन देईल, की त्यांच्या धर्माचा आणि मूल्यांचा आदर आणि कायद्यानुसार संरक्षण केले जाते. जम्मू-काश्मीरमधील भाजपचे ज्येष्ठ नेते दरख्शन अंद्राबी यांनी नरसिंहानंद यांच्या विधानाचा निषेध केला आणि त्यांना 'परजीवी' 'जो शांतीचा शत्रू आहे' असे संबोधले. त्यांनी कोट्यवधी भाविकांच्या भावना दुखावल्या असल्याने त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे', असे ते म्हणाले. अंद्राबी या जम्मू-काश्मीर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष आहेत.


'गुजरात एटीएस' आणि 'नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो' संयुक्त कारवाई

# मध्य प्रदेशात १८०० कोटींचे ड्रग्ज जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोपाळ :** 'गुजरात एटीएस' आणि 'नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो'ने संयुक्त कारवाईत भोपाळच्या बाहेरील एका कारखान्यातून १,८१४ कोटी रुपयांचे मेफेड्रोन ड्रग्ज जप्त केले आणि दोन जणांना अटक केली. याबाबत मध्य प्रदेश काँग्रेसने मोहन यादव सरकारला धारेवर धरले आहे.

मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी यांनी एका निवेदनात म्हटले आहे, की भोपाळमध्ये १८०० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. मेफेड्रोन (एमडी) हे औषध बनवण्याचे काम एका कारखान्यात केले जात होते. राजधानीतच अंमली पदार्थांचा कारखाना सुरू असेल, तर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून तुम्ही काय करत आहात? तरुण पिढीला ड्रग्जच्या आहारी ढकलण्याचे हे षडयंत्र कोणाच्या आश्रयाने रचले जात आहे? मध्य प्रदेशातील परिस्थिती पंजाबपेक्षाही वाईट आहे.



**भोपाळ:** 'गुजरात एटीएस' आणि 'नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो' ने केलेल्या संयुक्त कारवाईत १८१४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले आणि कारखाना सील केला.

या घटनेत मध्य प्रदेश सरकार, पोलिस आणि गुप्तचर विभागाची झोप उडाली असल्याचा आरोप त्यांनी केला. समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते यश भारतीय म्हणाले, की मोहन यादव सरकार गेल्या १० महिन्यांपासून सत्तेत आहे; परंतु राज्य पोलिसांना या कारखान्याची कोणतीही माहिती नाही. मध्य प्रदेश सरकार इतर राज्य आणि केंद्रीय एजन्सींच्या समन्वयाने अशा गुप्त कारवाया करत असते.

### आतापर्यंतचा सर्वांत मोठा साठा

● भोपाळजवळील बागरोडा 'इंडस्ट्रियल एरिया'मध्ये असलेल्या कारखान्यात टाकलेल्या छाप्यात घन आणि द्रव अशा दोन्ही प्रकारातील ९०७.०९ किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले. गुजरात 'एटीएस'ने पकडलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा अवैध कारखाना आहे. या कारखान्यात दररोज २५ किलो एमडी ड्रग तयार करण्याची क्षमता होती.

#रा



"अशा कठीण वेळेत कर्णधाराला कठोर राहणे गरजेचे असते. कारण ज्याप्रमाणे खेळ चालत होता, कधी विकेट्स पडत होते तर कधी मोठी भागिदारी होत होती. अशावेळी तणाव घेऊन चालणार नव्हते. ''सातव्या क्रमांकापर्यंत दक्षिण आफ्रिकेची तगडे फलंदाजी होती. त्यामुळे आम्हाला मिलर किंवा क्लासेनपैकी एकाला काहीही करून बाद करायचे होते. ३० चेंडूंमध्ये ३० धावांची गरज असताना रिषभ पंतने शक्कल लढवली आणि खेळ थांबवला. त्यामुळे सामन्याची लय तुटली आणि हार्दिक पांड्याच्या गोलंदाजीवर क्लासेन माघारी परतला. ''त्यानंतर आम्ही सर्वांनी एकत्र येऊन आफ्रिकेच्या फलंदाजाना चिडवण्याचा प्रयत्न केला. जेणे करून त्यांच्यावर दबाव निर्माण होईल. असे करणे गरजेचे होते कारण हा सामना आम्हाला काहीही करून जिंकायाचा होता आणि त्यासाठी आम्हाला दंड द्यावा लागला असता तरी काही हरकत नव्हती. — रोहित शर्मा

## दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस बॅडमिंटन साखळी स्पर्धेत
# फाल्कन्स संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत अंतिम फेरीत फाल्कन्स संघाने कॉमेट्स संघाचा ४-२ असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्ट येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीच्या लढतीत फाल्कन्स संघाने कॉमेट्स संघाचा ४-२ असा पराभव केला. गोल्ड खुल्या दुहेरी १ मध्ये फाल्कन्सच्या सारंग आठवलेने सुधांशू मेडसीकरच्या साथीत कॉमेट्सच्या अदिती रोडे व बिपिन चोभे यांचा २१-१२, १६-२१, १५-०२ असा पराभव करून संघाचे खाते उघडले.

त्यानंतर खुल्या दुहेरी ३मध्ये कॉमेट्सच्या पराग चोपडा व निलेश केळकर यांनी अभिजित राजवाडे व विनित रुकारी यांचा २१-२०, २१-१२ असा तर, महिला दुहेरी ४ मध्ये कॉमेट्सच्या दिप्ती सरदेसाई व संध्या भट या जोडीने फाल्कन्सच्या चैत्रा आपटे व वैजयंती मराठे यांचा २१-११, १८-२१, १५-११ असा पराभव करून संघाला आघाडी प्राप्त करून दिली. पण वाईजमन दुहेरीत फाल्कन्सच्या जितेंद्र केळकर व प्रशांत वैद्य यांनी कॉमेट्सच्या श्रीदत्त शानबाग व देवव्रत शहाणे यांचा २१-१४, २१-१८ असा पराभव करून संघाला बरोबरी साधून दिली. खुल्या दुहेरी 6मध्ये अमर श्रॉफ व सोहम कांगो यांनी कॉमेट्सच्या सोहम जोशी व यश मेहेंदळे यांचा ०७-१५, १५-११, १५-१२ असा पराभव करून संघाची आघाडी ३-२ ने वाढवली. खुल्या दुहेरी ७मध्ये चैतन्य वाळिंबे व रिआन करंदीकर या जोडीने कॉमेट्सच्या प्रीती सप्रे व गौतम लोणकर यांचा १५-१३, १५-०९ असा पराभव करून संघाचा विजय सुकर केला.

स्पर्धेतील विजेत्या फाल्कन्स संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, पीवायसी हिंदू जिमखानाचे मानद सचिव दिपक गाडगीळ, पीवायसी हिंदू जिमखानाचे सहसचिव सारंग लागुआणि ट्रूस्पेसचे मालक अश्विन त्रिमल यांच्या हस्ते करण्यात आले.

## पाकिस्तानविरुद्ध विजय, पण कर्णधार कौरला दुखापत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महिला टी२० वर्ल्ड कप २०२४ स्पर्धेत पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यात कर्णधार हारमनप्रीत कौर भारताला विजयाच्या दिशेने घेऊन जात असताना तिच्या मानेला दुखापत झाली. जिंकण्यासाठी अवघ्या २ धवांची गरज असताना कौर दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट होऊन माघारी परतली.

यावेळी तिच्या चेहऱ्यावर होणारा त्रास आणि डोळ्यांमध्ये अश्रू दिसत होते. त्यामुळे तिच्या पुढील सामन्यातील खेळाबाबद संभ्रम निर्माण झाला आहे. हरमनप्रीत भारतीय कर्णधार आणि आघाडीची फलंदाज असून तिला पुढील सामने खेळणे भारतासाठी अत्यंत गरजेचे आहे. एकीकडे भारतीय संघाला उपांत्य फेरीत प्रवेश करणे आव्हानत्मक असताना भारतीय कर्णधारने मैदानाबाहेर जाणे धोकादायक ठरू शकते.

## नवरात्र उत्सव उपवास रेसिपी
### उपवासाचे आप्पे




**साहित्य :** 1 कप वरई (भगर)
१/२ साबुदाणा
२ वाटी दही
१/२ चमचा जीरे
१ चमचा बारीक केलेली मिरची
१ चिमूट खायचा सोडा

**कृती :** प्रथम साबुदाणा आणि वरई (भगर) पाच मिनिटं भाजून घ्यावेत. नंतर मिक्सरमधून बारीक करून घ्यावे. जाडसर दळावे खूप बारीक करू नये . नंतर हे दोन्ही पीठ दह्यामध्ये अर्धा तास भिजत ठेवावे. थोडेसे पाणी घालावे. अर्धा तासाने यामध्ये मीठ, जिरे, बारीक केलेली मिरची आणि खायचा सोडा हे सर्व मिक्स करावे. हे मिक्स केल्यानंतर परत पाच मिनिटं भिजत ठेवावे. नंतर गॅसवर आप्पे पात्र गरम करत ठेवावे व हळूहळू आप्पेपात्रात हे पीठ टाकून आपले सुंदर असे अप्पे तयार करून घ्यावे.

-प्राजक्ता वाघ

## रोहीत, निमिष, अमरदीप घोडके यांची विजयी आगेकूच

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित राज्य निवड चाचणी स्नुकर स्पर्धेत लोकेश दिवाणे, सिद्धांत फाटे, रविराज शितोळे, रोहीत लोणकर, निमिष कुलकर्णी आणि अमरदीप घोडके यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून संघर्षपूर्ण विजय मिळवत दुसरी फेरी गाठली. कॉनर्र पॉकेट (कँप), द क्यु कल्चर (वानवडी), क्यु क्लब (अ.नगर रस्ता) आणि रोड हाऊस क्लब (येरवडा) या चार क्लबमध्ये ही राज्य निवड चाचणी ६-रेड स्नुकर स्पर्धा सुरू आहे. लोकेश दिवाणे याने रोहन साकळकर याचा ०६-४८, २६-१७, ५२-११, १०-३७, ४८-१२ असा संघर्षपूर्ण पराभव करून बाद फेरीच्या पुढील फेरीत प्रवेश केला. सिद्धांत फाटे याने हिसान सय्यद याचा ४६-०८, ०१-५१, २२-२६, ३७-१६, ३६-१७ असा पराभव करून आगेकूच केली. रविराज शितोळे याने धवल गढवी याचा ५४-२९, ४१-०७, १९-३२, २२-३४, ५०-३६ असा पराभव केला आणि पुढील फेरी गाठली. रोहीत लोणकर याने अमर राईकर याचा ५६-१०, १२-५२, १४-४९, ५०-३१, ४६-३५ असा पराभव करून आगेकूच केली. पीवायसी हिंदू जिमखानाच्या निमिष कुलकर्णी याने पुरूषोत्तम पांडे याचा १२-३४, ५०-०८, ३९-१०, ४७-२७ असा पराभव करून पुढील फेरी गाठली. अमरदीप घोडके याने बलराज सिंग याचा २४-२८, ३३-११, ३६-०६, २२-२१ असा पराभव करून पुढील फेरी गाठली.



## प्रीती झिंटाच्या संघाची ट्रॉफीची प्रतीक्षा संपली

**नवी दिल्ली :** कॅरेबियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेचा अंतिम सामना प्रोव्हिडन्स येथे गयाना ऍमेझॉन वॉरियर्स विरुद्ध सेंट लुसिया किंग्स संघात पार पडला. या सामन्यात सेंट लुसियाने ६ विकेट्सने विजय मिळवत पहिल्यांदाच सीपीएलचे विजेतेपद जिंकले आहे. या संघाची सहमालकी प्रीती झिंटा, नेस वाडिया यांच्याकडे असून आयपीएलमधील पंजाब किंग्स संघाची ही सिस्टर फ्रँचायझी आहे. दरम्यान, सेंट लुसिया किंग्सने हे विजेतेपद मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमीच्या मार्गदर्शनाखाली आणि कर्णधार फाफ डू प्लेसिसच्या नेतृत्वाखी पहिल्यांदाच सीपीएलचे विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात सेंट लुसियाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे ऍमेझॉन वॉरियर्स संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. ऍमेझॉन वॉरियर्स प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ बाद १३८ धावाच केल्या. त्यांच्याकडून ड्वेन प्रीटोरियसने सर्वाधिक २५ धावा केल्या. तसेच शाय होपने २२ धावांची खेळी केली. बाकी कोणालाही २० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही.

## साबळे फार्मसी महाविद्यालय सासवड येथे पुणे जिल्हा विभागीय महिला
# व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या संयुक्त विद्यमाने व्हॉलीबॉल महिला स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महिलांच्या खेळातील सहभागाला चालना देणे आणि युवा महिला खेळाडूंमध्ये स्पर्धा, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीची भावना वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी केले, याप्रसंगी बोलताना त्यांनी शिक्षणातील खेळाच्या महत्त्वावर भर दिला आणि संपूर्ण स्पर्धेत योग्य खेळ, शिस्त आणि समर्पणाचे प्रदर्शन करण्यासाठी सहभागी खेळाडूंना प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या विविध महाविद्यालयांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक महिला व्हॉलीबॉल संघांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसून आला. प्रत्येक संघात अत्यंत कुशल खेळाडूंचा समावेश होता आणि ही स्पर्धा ऊर्जा आणि सांघिक कार्याचे प्रदर्शन करताना दिसून आली. या स्पर्धेमध्ये प्रथम स्थान शारदाबाई पवार महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शारदानगर, माळेगाव बी.के., द्वितीय स्थान श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर व तृतीय स्थान आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिघी यांनी पटकावले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सुमित मुसळे, महाविद्यालयाचे सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.तसेच या स्पर्धेसाठी डॉ. ऋषिकेश कुंभार सहसचिव पुणे जिल्हा क्रीडा विभाग यांचे सहकार्य लाभले.

## कारभारी जिमखाना ॲकॅडमी संघाचे सलग दोन विजय





**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'मान्सुन करंडक' १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत कारभारी जिमखाना ॲकॅडमी संघाने पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि टेंभेकर फार्म्स क्रिकेट ॲकॅडमी या संघांचा पराभव करून सलग दोन विजयांची नोंद केली. मुकूंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या कटारीया हायस्कूल मैदानावर झालेल्या सामन्यात पार्थ शिंदे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर कारभारी जिमखाना ॲकॅडमीने पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा ४४ धावांनी पराभव केला. कारभारी जिमखाना ॲकॅडमीने पहिल्यांदा फलंदाजी करताना १८२ धावांचे आव्हान उभे केले. सार्थक ढमढेरे याने ५८ धावांची तर, सृजन बिचकुले याने ३४ धावांची आणि अर्थव जाधव याने ३२ धावांची खेळी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १३८ धावांवर मर्यादित राहीला. सार्थक ढमढेरे याने केलेल्या ११६ धावांच्या खेळीमुळे कारभारी जिमखाना ॲकॅडमीने टेंभेकर फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीचा १५६ धावांनी पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला.

## एफएसआय आंतर-विभागीय फुटबॉल : दक्षिण विभाग अ गटात अव्वल
# पात्र होण्यासाठीच्या लढतीत ईशान्यचा पश्चिम विभागावर विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दक्षिण विभागाने मुख्यालय संघाचा पराभव करताना ५३व्या अखिल भारतीय एफएसआय आंतर-विभागीय फुटबॉल स्पर्धेत अ गटात अव्वल स्थान मिळवत उपांत्य फेरी निश्चित केली.

एकही विजय मिळवलेला पूर्व विभाग (२ गुण) हा अ गटातून उपांत्य फेरी गाठणारा दुसरा संघ आहे. अंतिम चार संघांत स्थान मिळविण्यासाठी ईशान्य विभागाला पश्चिम विभागाविरुद्ध विजय आवश्यक होता. त्यात ३-१ अशा विजयासह सेमीफायनलवर शिक्कामोर्तब केले.

श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे सुरू असलेल्या स्पर्धेत दक्षिण विभागाने दुसऱ्या हाफमध्ये जास्तीत जास्त गोल करताना मुख्यालयाला ३-१ असे हरवले. दक्षिण विभागाने (४ गुण) एका सामना बरोबरीत सोडवताना एका विजयासह अ गटामध्ये अव्वल स्थानी झेप घेतली. दक्षिण विभागाकडून गेराल्ड मॅथ्यूने (३३') पहिला गोल केला. त्याच्या जोरावर मध्यंतरापर्यंत १-० अशी आघाडी राखली.

उत्तरार्धात, विनीत कुमारने (४४व्या') दक्षिण विभागाची आघाडी वाढवली. मात्र, ४ मिनिटांच्या फरकाने मुख्यालय संघाच्या अजय बिश्तने (४८') प्रतिस्पर्ध्यांची आघाडी थोडी कमी केली. मो. लियाकथने (५५') दक्षिण विभागाचा तिसरा गोल केला. त्यावेळची ३-१ आघाडी कायम राखताना दक्षिण विभागाने आगेकूच केली. ब गटातील सामन्यात, ईशान्य विभागाने पश्चिम विभागाला ३-१ असे पराभूत केले. ईशान्य विभागाने ३ गुणांसह ब गटात दुसरे स्थान मिळवले. या गटात उत्तर विभाग अव्वल स्थानी आहे. सामन्यातील सर्व गोल दुसऱ्या सत्रात झाले.

एस. चिनमुअनथांगने (४०') ईशान्य विभागाचे गोल खाते उघडले. बॅनपिन्खराव खोंजीने (७०') त्यात भर घालताना आघाडी वाढवली. पश्चिम विभागाच्या हाफिज उर रहमानने (७०+४') पेनल्टी किकचे गोलामध्ये रूपांतर करून आघाडी कमी केली. त्रिदेव बोरोने (७०+५') ईशान्य विभागाने पुन्हा आघाडीवर नेले. ही आघाडी विजयासाठी पुरेशी ठरली.

## अजित वाडेकर व बिलियंट्स स्पोर्टस यांच्यात अंतिम लढत





**पुणे :** धीरज जाधव क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित पूना वेस्टर्न करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत अजित वाडेकर क्रिकेट अकादमी व बिलियंट्स स्पोर्टस अकादमी या संघांनी अनुक्रमे धीरज जाधव क्रिकेट अकादमी व विराग क्रिकेट अकादमी संघाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. भुगाव येथील द पूना वेस्टर्न क्लब या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत पहिल्या लढतीत अर्णव नन्ना (५-१५) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर बिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाने धीरज जाधव क्रिकेट अकादमी संघाचा ९७ धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात अलंकार पारवे (१४२ धावा) याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीसह स्वरीत(६-७) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर अजित वाडेकर क्रिकेट अकादमी संघाने विराग क्रिकेट अकादमी संघाचा १७२ धावांनी धुव्वा उडवत दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली.

## हार्दिक अन् नितीशने केलं भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या टी२० सामन्यात दणदणीत विजय मिळवला. ग्वाल्हेरला झालेल्या सामन्यात भारताने ७ विकेट्सने विजय मिळवत तीन सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे.

या सामन्यात बांगलादेशने भारतासमोर विजयासाठी १२८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग भारताने ११.५ षटकात ३ विकेट्स गमावत पूर्ण केला.

भारताकडून यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी डावाची सुरुवात केली होती. या दोघांनीही सुरुवात आक्रमक केली. मात्र दुसऱ्याच षटकात ७ चेंडूत १६ धावांवर असताना अभिषेक धावबाद झाला. पण त्यानंतर संजू सॅमसनला कर्णधार सूर्यकुमार यादवची साथ मिळाली. सूर्यकुमारनेही सुरुवातीपासूनच आक्रमक सुरुवात केली. त्यांनी भारताला ५ षटकांच्या आतच ६० धावांचा टप्पा पार कडून दिला होता.

पण त्यांची भागीदारी रंगत असतानाच सूर्यकुमारला मुस्तफिजूरने जाकर अलीच्या हातून झेलबाद केले. त्यामुळे सूर्यकुमार १४ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह २९ धावा करून बाद झाला.

## १२००० हून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होतील अशी अपेक्षा
# ३८वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन रविवार १ डिसेंबरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन यंदा ३८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यंदाची ३८वी मॅरेथॉन रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे ३:०० वाजता सुरू होईल. सणस मैदान येथील हॉटेल कल्पना व विश्व चौकातून या ४२.१९५ किलोमीटरच्या पुरुष व महिला मॅरेथॉनला पहाटे ३:००वा. झेंडा दाखवून सुरुवात करण्यात येईल.

या मॅरेथॉन मध्ये १२००० हून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होतील अशी अपेक्षा आहे .यांच्या प्रवेशाची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंतwww.Marathon Pune.com येथे प्रवेश अर्ज भरता येऊ शकेल. या स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे ३५लाख रुपयांची बक्षिसे दिली जातील. पुरुष व महिला मॅरेथॉन ,व अर्ध मॅरेथॉन गटातील पहिल्या ३ भारतीय क्रमांकांच्या स्पर्धकांना विशेष पारितोषिके देण्यात येतील.

यंदा इथोपिया, केनिया टाझानिया, मोरीसिस इत्यादी देशातून आत्तापर्यंत६० हून अधिक स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. याशिवाय सेनादल, रेल्वे, पोलीस, आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट बॉम्बे सपर्स, एसआरपीएफ, एनडीए,यांच्याही प्रवेशिका येत आहेत. त्याच बरोबर लडाख - कारगिल संघ ही सहभागी झाला आहे.

#रा